नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २१५ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे     POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. १६ जुलै २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## माऊलींच्या पालखीचे सातार्‍यात आगमन



**सातारा : (स. गांवकरी)**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज टाळ मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात मोठ्या आनंदाने आणि भक्तीमय वातावरणात सातारा जिल्ह्यात पाडेगाव येथे आगमन झाले. फडफडणाऱ्या भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर आणि हरिभजनात तल्लीन होऊन संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा भक्तीरसात चिंब न्हाऊन निघाला. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होताच जिल्ह्याच्यावतीने पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्रिया शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे जिल्हा परिषदेत उपाध्यक्ष राजू भोसले, वाईचे प्रांताधिकारी योगेश खरमाटे यांनी पुष्प अर्पण करुन स्वागत केले, पोलीस बँड पथकामार्फतही विविध वाद्यांची धून वाजून स्वागत करण्यात आले.

नीरा नदीतील स्नानानंतर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यातील पाडेगाव येथे मान्यवरांनी तसेच लाखो भाविकांनी दर्शन घेतले. माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांनी एकच गर्दी केली होती. माऊलीची पालखी पालखी सोहळ्याने सातार्‍यात प्रवेश करतात सातारा पोलीस दलाच्या वतीने माऊलींना मानवंदना देण्यात आली.

प्रशासनाने वारकऱ्यांसाठी ठिकठिकाणी पिण्याचे पाण्याचे टँकर, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच जागोजागी स्वच्छतागृहांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या सुरक्षेतेसाठी चोख पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आलेला आहे. जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेल्या सुविधांबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

पालखी सोहळा चार दिवसाच्या सातारा भेटीसाठी दाखल झाला आहे. खंडाळा आणि फलटण येथे चार मुक्काम आहे रविवारी पालखी सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. चार दिवसात ६५ किलोमीटरचे अंतर पालखी सोहळा कापणार आहे. सातारा प्रशासनाच्या वतीने वारकऱ्यांची उत्कृष्ट सोय करण्यात आली आहे. पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातील वाल्हे येथे असताना मंगळवारी रात्री च मोठ्या संख्येने वारकरी सातार्‍या दाखल झाले होते. त्यांच्या राहण्याची सोय सातारा प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. शिवमकुमार, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, जेजुरीचे पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, बांधकाम सभापती दीपाली हुलावळे, प्रमोदकाका काकडे, दत्ताजीराव चव्हाण, तेजश्री काकडे, राजेश काकडे, राजेश चव्हाण, विराज काकडे, विजय शिंदे, आरोग्य उपसंचालक भगवान पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी माऊलींच्या पालखीला पुणे जिल्ह्याच्या वतीने भावपूर्ण निरोप दिला.

## दस्तनोंदणीसाठी 'आधार' बंधनकारक

### गैरव्यवहार रोखण्यासाठी मुद्रांक शुल्क विभागाचा निर्णय

**पुणे : (स. गांवकरी)**

सदनिका वा कोणत्याही व्यवहाराची दस्तनोंदणी करताना दस्ताबरोबर आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने राज्य शासनाकडे पाठविला आहे. दस्तनोंदणीतील गैरप्रकार रोखण्यासाठी मुद्रांक शुल्क विभागाने हे पाऊल उचलले आहे. राज्यात मोकळ्या जागा, सदनिकांच्या दस्तनोंदणीचे लाखो व्यवहार दर वर्षी होतात. त्यातून राज्य शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूलदेखील मिळतो. मात्र, दस्तनोंदणी करताना आतापर्यंत आधार कार्ड जोडणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे खरेदीदार आणि विक्रेता यांची ओळख पटविण्यासाठी कोणताही ठोस पर्याय नव्हता. त्यातून बनावट आधार कार्ड जोडून फसवणूक होत होती.

तसे काही प्रकारही उघडकीस आले होते. त्यामुळे नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी आधार कार्ड जोडणे ऐच्छिक असल्यामुळे दुय्यम निबंधकांनाही दस्त नोंदवून घेताना 'स्किप'चा पर्याय वापरण्याचा अधिकार देण्यात आला होता. त्यामुळे शासकीय जमिनींचा गैरव्यवहार झाल्याची प्रकरणे पुढे आली. मुंढवा आणि ताथवडे येथील शासकीय जमिनींचा परस्पर खरेदी-विक्री व्यवहार झाल्यानंतर दस्तनोंदणी करताना आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यानुसार नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने या बाबतचा प्रस्ताव राज्य शासनाला दिला आहे. राज्य शासनाच्या मंजुरीनंतर या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी होणार आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र रजिस्ट्रेशन ॲक्टमध्ये बदल करावा लागणार आहे.




- दस्तनोंदणी प्रणालीतील 'स्किप' पर्याय कायमचा बंद होणार
- खरेदीदार आणि विक्रेत्याची बायोमेट्रिक ओळख पटवणे होणार सुलभ

दस्तनोंदणी करताना आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्याचा निर्णय नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने घेतला आहे. तसा प्रस्ताव राज्य सरकारला दिला आहे. सरकारच्या मान्यतेनंतर या प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी होईल. त्यामुळे दस्तनोंदणीतील गैरव्यवहार रोखणे शक्य होणार आहे.

**- रवींद्र बिनवडे, नोंदणी महानिरीक्षक**

## थोडक्यात...

### अनधिकृत डेब्रीज बाबत दिल्ली पॅटर्न

मुंबई (स. गांवकरी) : मुंबई शहरात वेगाने सुरू असलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प, रस्ते काँक्रीटीकरण, इमारत पुनर्विकास आणि शासकीय व खासगी बांधकामांमुळे निर्माण होणाऱ्या बांधकाम व पाडकामाच्या अनधिकृत डेब्रीजच्या घटनांना आता चाप लागला जाणार आहे. यासाठी महापालिकेने दिल्लीच्या धर्तीवर यावर नियंत्रण मिळवण्यासाठी 'एकात्मिक बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन पोर्टल' विकसित करत असून यासाठी ट्रेस रिसोर्स मॅनेजमेंट प्रा. लि. या कंपनीची निवड करण्यात आली. या बाबतच्या प्रस्तावाला बुधवारी झालेल्या बैठकीत स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी मंजुरी दिली.

### बाधित होणारी झाडे लावणार मुंबईतच

मुंबई (स. गांवकरी) : मुंबईतील विविध प्रकल्प कामांमध्ये बाधित होणाऱ्या झाडांच्या बदल्यात लावण्या येणारी झाडे ही मुंबईत जागा नसल्याने पनवेल तसेच इतर ग्रामीण भागातील वन विभागाच्या जमिनींवर लावण्यात येत आहे. परंतु याला स्थायी समिती सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतला. मुंबई प्रकल्पातील बाधित होणाऱ्या झाडांच्या बदल्यात पर्यायी लावण्यात येणारी झाडे ही मुंबईतच लावली जावी, आरे कॉलनीसह ज्या जागांवरील झाडे पडली आहेत तिथे ती लावली जावी अशी मागणी सदस्यांनी केली आहे. त्यामुळे यापुढे मुंबईतील झाडे कापल्यास ती मुंबई बाहेर लावली जावू नये असे निर्देशच प्रशासनाला स्थायी समिती अध्यक्षांनी दिले आहे. त्यावर अखेर प्रशासनाने आता नगरसेवकांनी जागा सुचवल्यास तिथे प्रकल्पांमधील बाधित झाडे किंवा अन्य प्रकारचे वृक्षारोपण केले जाईल असे स्पष्ट केले.

### १ हजार ८०० मेट्रिक टन केला कचरा गोळा


मुंबई (स. गांवकरी) : मुसळधार पाऊस आणि त्यामुळे समुद्रात वाहून गेलेला तसेच भरतीच्या लाटांमुळे पुन्हा किनाऱ्यावर येणाऱ्या कचऱ्याचे संकलन आणि विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने जुहू समुद्र किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम अधिक तीव्र केली आहे. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून जुहू समुद्र किनाऱ्यावरून दररोज सुमारे १८० मेट्रिक टन कचरा हटविण्यात येत आहे. मागील दहा दिवसात सुमारे १ हजार ८०० मेट्रिक टन कचरा हटवून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे. ही स्वच्छता मोहीम अधिक तीव्र करून जुहू समुद्र किनारा स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी स्थानिक आमदार अमित साटम यांनी विशेष लक्ष घातले आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त किरण दिघावकर यांनी अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री तैनात केली आहे.

### मेस्सी चमकला

अटलांटा (स. गांवकरी) : लिओनेल मेस्सी यांच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने पुन्हा एकदा दमदार कमबॅक करत इंग्लंडचा २-१ असा पराभव केला आणि सलग दुसऱ्यांदा फिफा वर्ल्ड कप फायनल गाठली. आता न्यू जर्सी येथे होणाऱ्या अंतिम लढतीत अर्जेंटिनाचा सामना स्पेनशी होणार आहे. इंग्लंडने दुसऱ्या हाफच्या ५५व्या मिनिटाला अँथनी गॉर्डन याच्या गोलमुळे आघाडी घेतली होती. मात्र सामना संपण्यास अवघी काही मिनिटे शिल्लक असताना अर्जेंटिनाने अप्रतिम पुनरागमन केले. ८५व्या मिनिटाला एन्झो फर्नांडिझ याने मेस्सीच्या अचूक पासवर गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर स्टॉपेज टाइममध्ये लाऊटारो मार्टिनेझ याने मेस्सीच्या शानदार क्रॉसवर हेडर करत विजयी गोल नोंदवला.

## 'डिजीटल अरेस्ट' करून १४ लाखांचा गंडा; दोन दिवस ठेवले डांबून

**नांदेड : (स. गांवकरी)**



नांदेडच्या पवननगर भागात एका सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्याला केंद्रीय तपास यंत्रणेचे अधिकारी असल्याचे भासवून तब्बल १४ लाख १५ हजार रुपयांना लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तुमचे दहशतवाद्यांशी संबंध असून मुंबईत गुन्हा दाखल झाल्याची भीती दाखवत सायबर भामट्यांनी वृद्ध अधिकाऱ्याला चक्क दोन दिवस घरातच 'डिजीटल अरेस्ट' करून ठेवले होते. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून नांदेडमधील डिजीटल अरेस्टची ही अवघ्या काही दिवसांतील दुसरी मोठी घटना असल्याने खळबळ उडाली आहे. शिवाजी संभाजीराव तुंबलवाड (वय ६७, रा. पवननगर, नांदेड) असे फसवणूक झालेल्या सेवानिवृत्त कोषागार अधिकाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी सायबर पोलिसांनी 'प्रिया मॅडम', अमित चौधरी, संदीपराव, प्रदीप जयस्वाल आणि अन्य एका अशा पाच जणांविरोधात फसवणूक व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. हा थरार ३० जून ते ४ जुलै २०२६ दरम्यान घडला. सेवानिवृत्त अधिकारी तुंबलवाड यांना सुरुवातीला एका महिलेचा फोन आला. तिने आपण केंद्र शासनाची अधिकारी 'प्रिया मॅडम' बोलत असल्याचे सांगितले. त्यानंतर एकापाठोपाठ एक अशा काही फोन कॉलवरून अमित चौधरी, संदीपराव, प्रदीप जयस्वाल यांनी पोलीस अधिकारी बनून तुंबलवाड यांच्याशी संपर्क साधला व "तुमच्या सिमकार्डचा वापर देशविरोधी कारवायांसाठी झाला असून तुमचे दहशतवाद्यांशी संबंध आहेत.

## उजनी धरणातून गुरुवार पासून भीमा-सीना बोगद्यात पाणी

### राजकीय नेत्यांमध्ये मात्र 'श्रेयवादाची' लढाई

**सोलापूर : (स. गांवकरी)**

सोलापूर जिल्ह्यातील पावसाची ओढ आणि लोकप्रतिनिधींनी लावलेला तगादा या पार्श्वभूमीवर, उजनी धरणातून सीना नदीसाठी भीमा-सीना जोडकालव्यातून (बोगदा) अखेर गुरुवारपासून पाणी सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. मात्र, पाणी प्रत्यक्ष सुटण्यापूर्वीच जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये याचे श्रेय लाटण्यासाठी जोरदार स्पर्धा सुरू झाली असून, समाजमाध्यमातून 'श्रेयवादाचे लोट' वाहू लागले आहेत.



पुणे जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे उजनी धरणाची पाणीपातळी ५० टक्क्यांच्या पुढे गेली आहे. सध्या धरणात ५३ टक्के उपयुक्त पाणीसाठा असून एकूण साठा ९२ टीएमसीवर पोहोचला आहे. यापैकी उपयुक्त साठा २८.५० टीएमसी इतका आहे. दुसरीकडे, दौंडवरून धरणात येणारा विसर्ग सध्या ४,६०५ क्युसेकवर स्थिरावला आहे. पुणे जिल्ह्याच्या बाजूने पाण्याची आवक समाधानकारक असल्याने सोलापूर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची चिंता तूर्त मिटली आहे. तसेच, वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडलेल्या पावसामुळे नीरा नदीत पाणी सोडण्यात आले होते. हे पाणी नीर-नरसिंगपूर येथील संगमातून भीमा पात्रात आल्याने आषाढी वारीसाठी उजनी धरणातून स्वतंत्र पाणी सोडण्याची गरज भासली नाही. त्यामुळे शिल्लक पाणी सीना नदीत सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लावून धरली होती. नदीकाठच्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न गंभीर बनल्याने लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. आमदार अभिजीत पाटील, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार नारायण पाटील आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी पाणी सोडण्याची मागणी लावून धरली होती. खासदार प्रणिती शिंदे यांनी नुकतीच जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची भेट घेऊन पाणी सोडण्याचे साकडे घातले होते, तर जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनीही विखे-पाटील यांच्याकडे सीना-भीमा जोडकालव्यातून पाणी सोडण्याचा आग्रह धरला होता. या सर्व प्रयत्नांनंतर प्रशासनाने अखेर पाणी सोडण्याचे आदेश दिले. मात्र, आदेश निघताच 'आमच्याच प्रयत्नांमुळे पाणी सुटले' असे सांगणारी प्रसिद्धीपत्रके आणि समाजमाध्यमातून विविध नेते व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून प्रसारीत केले जात आहेत. त्यामुळे पाणी सुटण्याआधीच जिल्ह्यात राजकीय श्रेयवादाचे राजकारण तापले आहे.

प्रशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भीमा-सीना जोडकालव्याच्या बोगद्यातून सुरुवातीला २०० क्युसेक वेगाने पाणी सोडले जाईल. त्यानंतर पाण्याची मागणी आणि आवश्यकतेनुसार हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवण्यात येणार आहे. हे आवर्तन मूळ नियोजनानुसार १५ जुलैपासून सुरू होणार होते, मात्र काही तांत्रिक कारणांमुळे त्यात बदल करून आता ते गुरुवार सकाळपासून प्रवाहित केले जात आहे. या निर्णयामुळे सीना नदीकाठच्या गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## लांज्यात अपघात : भरधाव क्रेटा डंपरवर आदळली

### नवविवाहितेचा, आईसह चौघांचा जागीच मृत्यू

**रत्नागिरी : (स. गांवकरी)**

मुंबई-गोवा महामार्गावर लांजा येथील शांतीनगर परिसरात बुधवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात भरधाव वेगाने जाणारी क्रेटा कार महामार्गावर उभ्या असलेल्या डंपरच्या पाठीमागे जोरदार धडकली. या भीषण धडकेत कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून, नवविवाहित महिलेसह चौघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, मुंबईतील नागपाडा जंक्शन परिसरात राहणारे कुरेशी कुटुंब दोन दिवसांपूर्वी गोवा येथे सहलीसाठी गेले होते. सहल आटोपून बुधवारी पहाटे ते मुंबईकडे परतत असताना हा काळजाचा ठोका चुकवणारा अपघात घडला.

अपघातग्रस्त कारमध्ये अनस इरफान कुरेशी (वय ३१), त्यांची आई यास्मिन इरफान कुरेशी (वय ५४), महिनाभरापूर्वी विवाह झालेली पत्नी फिजा अनस कुरेशी (वय २७), महम्मद इरफान कुरेशी (वय१५) आणि चालक मुस्तफा अल्फाज काझी (वय २४) प्रवास करत होते. लांजा शांतीनगर परिसरात भरधाव वेगातील कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या डंपरच्या पाठीमागे जाऊन धडकली. धडकेनंतर कार डंपरला घासत पुढे जाऊन महामार्गाच्या दुभाजकावर आदळली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, कारचा अक्षरशः चुराडा झाला. या दुर्घटनेत यास्मिन कुरेशी, फिजा कुरेशी, महम्मद इरफान कुरेशी आणि चालक मुस्तफा काझी यांचा जागीच मृत्यू झाला. अनस कुरेशी गंभीर जखमी असून त्यांच्यावर रत्नागिरी येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच लांजा पोलीस निरीक्षक निळकंठ बगळे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली.

कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना बाहेर काढण्यासाठी नगरसेवक वैभव जोईल, युगंधर जोईल, वैभव गांधी, भास्कर तिखे, प्रताप जेधे आणि स्वरूप एकलुरे यांनी मदत केली. या भीषण अपघातात मृतदेहांची अवस्था अत्यंत विदारक झाली होती. घटनेची माहिती मिळताच कुरेशी कुटुंबीय दुपारी लांजा येथे दाखल झाले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी लांजा पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून, पोलिस निरीक्षक निळकंठ बगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.



या अपघातातील सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे अनस इरफान कुरेशी आणि फिजा यांचा विवाह अवघ्या महिनाभरापूर्वी झाला होता. नव्या आयुष्याची स्वप्ने पाहणाऱ्या या दाम्पत्यावर नियतीने क्रूर घाला घातला. सहलीच्या आनंदाचा प्रवास काही क्षणांतच शोकांतिकेत बदलला आणि एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

## अजित पवारांची जयंती साजरी होणार; थोर व्यक्तींच्या यादीत समावेश

**पुणे : (स. गांवकरी)**



महाराष्ट्र सरकारने राज्याचे नेते स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीचा समावेश सन २०२६ मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे. सामान्य प्रशासन विभागाने आज (१५ जुलै) रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. अजित पवारांच्या जयंतीच्या निमित्ताने २२ जुलै रोजी राज्यभर होणार भरगच्च कार्यक्रम आयोजन केले जाणार आहे. यामुळे अजित पवारांच्या राज्याच्या विकासातील योगदानाचा शासनाकडून गौरव करण्यात आला आहे.

परिपत्रकात दिलेल्या माहितीनुसार, २२ जुलै, २०२६ रोजी अजित पवार यांची जयंती राज्यभर साजरी केली जाईल. या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये अजित पवारांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले जाईल. हा आदेश केवळ मंत्रालयापुरता मर्यादित नसून, राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांसह सर्व शाळा व महाविद्यालयांनाही लागू करण्यात आला आहे.विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या भागातील सर्व यंत्रणांमध्ये या कार्यक्रमाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शासनाने या निर्णयाच्या माध्यमातून अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाला आणि त्यांच्या अविरत कार्यपद्धतीला दिलेली ही एक मोठी आदरांजली मानली जात आहे.

**राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून स्वागत :** अजित पवारांची जयंती राज्यभर साजरी करण्याचा राज्य सरकारने घेतलेल्या निर्मयाचे राष्ट्रवादीकडून (अजित पवार) स्वागत करण्यात आले आहे. पक्षाचे सरचिटणीस सूरज चव्हाण, विधानपरिषदेचे माजी आमदार अमोल मिटकरी, सुनीर टिंगरे यासह पक्ष्या आमदारांनी आणि विविध नेत्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे विमान अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला होता.

# आमदार डॉ. किरण लहामटे यांच्यावर बाजीराव दराडे यांचा हल्लाबोल

- 'विकासकामांचे खोटे श्रेय घेऊ नका'; बाजीराव दराडे यांचे आमदार किरण लहामटे यांना खुले आव्हान!
- पिंपळदरावाडी धरणावरून राजकारण तापले; बाजीराव दराडे यांचा आमदार लहामटे यांच्यावर निशाणा!
- 'ठेकेदारांना पाठीशी का घालता?' बाजीराव दराडे यांचा आमदार लहामटे यांच्यावर थेट सवाल?
- अकोल्यात राजकीय संघर्ष तीव्र; बाजीराव दराडे यांची आमदार किरण लहामटे यांच्यावर आरोपांची तोफ!
- 'कागद घेऊन अगस्ती मंदिरात या'; आमदार लहामटे यांना बाजीराव दराडे यांचे खुले आव्हान!
- पत्रकार परिषदेत बाजीराव दराडे आक्रमक; आमदार किरण लहामटे यांच्यावर भ्रष्टाचारासह अनेक गंभीर आरोप!

## पिंपळदरावाडी साठवण तलाव, निकृष्ट काम, ठेकेदार आणि विकासकामांच्या श्रेयावरून आरोप-प्रत्यारोप!




अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून माजी जिल्हा परिषद सदस्य तथा ज्येष्ठ नेते बाजीराव दराडे यांनी पत्रकार परिषद घेत आमदार डॉ. किरण लहामटे यांच्यावर गंभीर आरोपांची सरबत्ती केली. पिंपळदरावाडी साठवण तलावाच्या कामापासून ते विकासकामांच्या श्रेयापर्यंत, ठेकेदारांवरील कारवाईपासून प्रशासनाच्या भूमिकेपर्यंत आणि तालुक्यातील राजकीय वातावरणापर्यंत अनेक मुद्द्यांवर दराडे यांनी आमदारांवर थेट निशाणा साधला. दराडे म्हणाले की, काही दिवसांपूर्वी पिंपळदरावाडी परिसरातील दौऱ्यादरम्यान आमदारांनी केलेल्या वक्तव्यामध्ये सुरुवातीला कोणाचेही नाव घेतले नव्हते. त्यामुळे त्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली नव्हती. मात्र एका वर्तमानपत्रात नावासह बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर स्पष्टीकरण देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत दराडे यांनी आमदारांच्या माहितीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "एकदरा आणि पिंपळदरावाडी या दोन स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. मात्र आमदारांनी या दोन्ही गावांबाबत चुकीची माहिती दिली. लोकप्रतिनिधीने वस्तुस्थिती जाणून बोलणे आवश्यक असते," असे ते म्हणाले.

दराडे यांनी दावा केला की, पिंपळदरावाडी साठवण तलावाच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याबाबत त्यांनी संबंधित विभागाला लेखी तक्रार केली आहे. आरएमसी प्लांटमध्ये दर्जेदार सिमेंटऐवजी कमी प्रतीचे साहित्य वापरले जात असल्याने भविष्यात धरणाला गळती लागू शकते, असा आरोप त्यांनी केला. या संदर्भातील पत्रव्यवहाराची प्रतही पत्रकारांना देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संबंधित ठेकेदारावर सुमारे ३ कोटी २५ लाख रुपयांचा दंड तहसीलदारांनी लावल्याचा उल्लेख करत दराडे म्हणाले की, "मी तक्रार केली हे खरे आहे. मात्र दंड प्रशासनाने तपास करून लावला आहे. आमदारांनी या कारवाईला विरोध करण्याऐवजी शासनाच्या निर्णयाचा आदर करायला हवा होता." त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, "आमदारांना त्या ठेकेदाराबद्दल एवढा पुळका का? शासनाचा महसूल वाचविण्याऐवजी ठेकेदाराची बाजू का घेतली जाते?"

पिंपळदरावाडी प्रकल्पाचे श्रेय घेतल्याबद्दलही दराडे यांनी आमदारांवर टीका केली. त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी दिवंगत मधुकर पिचड यांनी २०१३ पासून प्रयत्न सुरू केले होते. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी स्वतः पाठपुरावा केला. पुढे त्यांच्या पत्नी जिल्हा परिषद सदस्या असताना देखील हा पाठपुरावा सुरूच होता.

२०१९ मध्ये तत्कालीन जलसंधारण मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे पत्रव्यवहार झाला. त्यानंतर विविध तांत्रिक अडचणींमुळे प्रस्ताव रखडला. शिंदे सरकार सत्तेत आल्यानंतर तत्कालीन जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या काळात प्रस्तावाला मंजुरी मिळाली, असा दावा दराडे यांनी केला.

"आमदारांच्या कार्यकाळात या प्रकल्पासाठी त्यांनी केलेला कोणताही ठोस पत्रव्यवहार दाखवावा. अन्यथा या कामाचे श्रेय घेणे चुकीचे आहे," असे त्यांनी म्हटले. धरणामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आपण शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला असल्याचा दावा दराडे यांनी केला. भूसंपादन पूर्ण होईपर्यंत काम थांबविण्याचे आदेशही शासनाने दिल्याचे त्यांनी सांगितले.

तालुक्यातील अनेक स्थानिक ठेकेदारांना तीन वर्षांपासून कामांची बिले मिळालेली नाहीत, त्यामुळे ते आर्थिक अडचणीत सापडले असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**पत्रकार परिषदेत दराडे यांनी आमदारांवर अनेक गंभीर आरोप केले. त्यांनी म्हटले की,**

- तालुक्यातील विकासकामांचे चुकीचे श्रेय घेतले जाते.
- ठेकेदारांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जातो.
- प्रशासनावर विश्वास नसल्यासारखी वक्तव्ये केली जातात.
- जातीचे राजकारण करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.
- विरोधकांविरोधात अपमानास्पद भाषा वापरली जाते.

"पालकमंत्र्यांच्या बैठकीत हा विषय मांडल्यानंतर मुख्यमंत्री स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन मिळाले. मात्र आमदारांनी स्थानिक ठेकेदारांची बाजू कधी घेतली नाही," असे ते म्हणाले.

दराडे यांनी आमदारांनी वापरलेल्या कथित आक्षेपार्ह शब्दांचाही निषेध केला आणि सार्वजनिक जीवनात संयमित भाषा वापरण्याचे आवाहन केले.

आपल्या दाव्यांबाबत आपण कागदपत्रांसह तयार असल्याचे सांगत दराडे यांनी आमदारांना अगस्ती मंदिरात येऊन संबंधित विकासकामांची कागदपत्रे जनतेसमोर ठेवण्याचे आणि शपथ घेण्याचे खुले आव्हान दिले.

आढाळा खोऱ्यात पाण्याची टंचाई नसल्याच्या आमदारांच्या दाव्यालाही दराडे यांनी फेटाळले. या भागाला आवश्यक असलेली तीन रोटेशनची पाणीपुरवठा योजना प्रत्यक्षात होत नसल्याचा दावा त्यांनी केला. पत्रकार परिषदेत शेवटी दराडे म्हणाले की, "आजपर्यंत आम्ही संयम बाळगला. मात्र यापुढे चुकीची विधाने आणि खोटे श्रेय घेण्याचा प्रयत्न झाला, तर आम्ही प्रत्येक आरोपाला पुराव्यासह उत्तर देऊ. जनतेची दिशाभूल होऊ देणार नाही." दरम्यान, या पत्रकार परिषदेमुळे अकोले तालुक्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे असून, आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याकडून या आरोपांना काय उत्तर दिले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**(टीप : या वृत्तातील आरोप व दावे हे पत्रकार परिषदेत बाजीराव दराडे यांनी केलेल्या वक्तव्यांवर आधारित असून संबंधित पक्षाची बाजू मिळाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल.)**

# थोडक्यात पण महत्वाचे



## मोडी लिपीच्या अभ्यासाने इतिहासाचे नवे दार उघडेल : नरेंद्र चव्हाण

मुदखेड (स. गांवकरी) : शिवशाही व पेशवाई काळातील अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक दस्तऐवज मोडी लिपीत लिहिलेले असून त्या काळाचा खरा इतिहास जाणून घेण्यासाठी मोडी लिपीचा अभ्यास अत्यावश्यक आहे. मोडी लिपीचे ज्ञान इतिहासाचे नवे दार उघडेल , असे प्रतिपादन नरेंद्र चव्हाण (सदस्य, व्यवस्थापन परिषद स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड तथा कार्यकारी सदस्य शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड ) यांनी केले. शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेडच्या रोप्य महोत्सवानिमित्त आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. यावेळी प्रशिक्षण मार्गदर्शक अमोल महल्ले व स्वप्नील गावडे (संशोधन सहाय्यक, पुराभिलेख संचालनालय, मंत्रालय, मुंबई) तसेच प्रमुख पाहुणे माधव कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

## शासकीय कामकाजात अडथळा प्रकरणी कारवाईची प्रक्रिया सुरू

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड ग्रामीण मंडळाचे मंडळ अधिकारी अनिरुद्ध जोंधळे यांनी महसूल न्यायालयातील प्रकरण क्र. आरटीएस-59 (मौजे म्हळजा) सर्वे नं. 12/1, क्षेत्र 0 हे. 13.50 आर संदर्भात कायद्यानुसार निर्णय दिल्यानंतर संबंधित पक्षाच्या विरोधात निकाल गेल्याने एका महिलेकडून तहसील कार्यालयात शासकीय कामकाज सुरू असताना गैरवर्तन करून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाल्याची घटना घडली. या प्रकरणाची महसूल प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया वजीराबाद पोलीस ठाणे येथे सुरू आहे. महसूल अधिकारी व कर्मचारी हे कायद्याच्या चौकटीत राहून उपलब्ध पुरावे, नोंदी व लागू असलेल्या कायद्याच्या आधारे निर्णय देत असतात. एखाद्या पक्षास निर्णयाविषयी असहमती अथवा नाराजी असल्यास अपील, पुनर्विलोकन किंवा इतर कायदेशीर उपाययोजना उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत कायदा हातात घेणे, शासकीय कार्यालयात गैरवर्तन करणे, शासकीय कर्मचाऱ्यांवर दबाव आणणे किंवा शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणे हे कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरले जाणार नाही. महसूल प्रशासन अशा कृत्यांचे कोणत्याही स्वरूपात समर्थन करणार नाही तसेच आवश्यक त्या सर्व कायदेशीर कारवाया करेल. यासोबतच, शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध खोट्या, सूडबुद्धीने किंवा दबावतंत्राचा भाग म्हणून गुन्हे दाखल करण्याचे प्रकार वाढत असल्याबाबत महसूल कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने प्रभावी संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महसूल अधिकारी व कर्मचारी संघटनांनी शासकीय कामकाज बंदसह तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून, त्यास शासन व संबंधित जबाबदार व्यक्ती उत्तरदायी राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.हे निवेदन प्रसारमाध्यमांसाठी योग्य असून त्यात घटना, प्रशासनाची भूमिका आणि संघटनेचा इशारा स्पष्टपणे मांडला आहे.

## शेतकऱ्यांनो संधी सोडू नका! फक्त १० टक्के खर्चात बसवा सूक्ष्म सिंचन संच

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : सन 2026-27 या आर्थिक वर्षात राष्ट्रीय कृषि विकास योजना "प्रति थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन)" अंतर्गत अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. मा.कृषि आयुक्तांच्या आदेशानुसार, ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा लाभ मिळवून देण्यासाठी 1 ते 31 जुलै 2026 या कालावधीत जिल्ह्यात विशेष मोहीम राबवली जात आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त गरजू शेतकऱ्यांनी घ्यावा. इच्छुक पात्र शेतकऱ्यांनी राज्य शासनाच्या अधिकृत महाडीबीटी पोर्टलवर खालील संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी व अर्ज सादर करावे, त्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin या संकेतस्थळावर भेट द्यावी. शेतकऱ्यांनी अर्ज सादर करताना सर्व माहिती अत्यंत अचूक भरावी, अन्यथा अर्ज रद्द होण्याची शक्यता असते. या पोर्टलवर 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

# पालिकेकडून अतिक्रमण हटाव मोहिमेला पुन्हा वेग; अंतर्गत रस्ते मोकळे, अतिक्रमणधारकांची पळापळ!

### कारवाईचा 'फार्स' की आश्वासनांची पूर्तता? सातत्य राहिल्यासच शहराला मिळणार अतिक्रमणमुक्तीचा दिलासा!

संगमनेर : (स. गांवकरी)




संगमनेर नगरपालिकेने शहरातील अतिक्रमणांविरोधात बुधवारी पुन्हा एकदा धडक मोहीम राबवत चावडी परिसरापासून बुलडोझर कारवाईला सुरुवात केली. मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या नेतृत्वाखाली पालिकेचे अधिकारी, कर्मचारी, दोन जेसीबी, चार ट्रॅक्टर, मजूर आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा पोलीस बंदोबस्त ठेवून ही कारवाई करण्यात आली. अचानक सुरू झालेल्या या मोहिमेमुळे शहरातील अतिक्रमणधारक, फेरीवाले, हातगाडीधारक आणि पथारी व्यावसायिकांची अक्षरशः धावपळ उडाली. अनेकांनी स्वतःहून आपले साहित्य हटविल्याने अनेक वर्षांनंतर संगमनेरच्या अंतर्गत रस्त्यांची खरी रुंदी नागरिकांना पाहायला मिळाली. संगमनेर शहरातील गावठाण भाग हा ऐतिहासिक रचनेचा असून येथील अंतर्गत रस्ते तुलनेने अरुंद आहेत. वाढत्या लोकसंख्येसोबत व्यापार आणि व्यावसायिक स्पर्धाही वाढली. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानांसमोर माल मांडणे, ओटे वाढविणे, पायऱ्या रस्त्यावर आणणे, फलक उभारणे, तसेच फेरीवाले, पथारीधारक आणि हातगाड्यांनी रस्त्यांवर अतिक्रमण करणे ही बाब दिवसेंदिवस गंभीर होत गेली. अनेक चौकांमध्ये अनधिकृत रिक्षा थांबे निर्माण झाल्याने वाहतुकीची कोंडी, अपघातांचा धोका आणि नागरिकांची गैरसोय वाढली. महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना या परिस्थितीचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. संगमनेर सेवा समितीने नगरपालिकेच्या निवडणुकीत शहर अतिक्रमणमुक्त करण्याचे, सुरक्षित रस्ते उपलब्ध करून देण्याचे आणि वाहतूक शिस्तबद्ध करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेत आल्यानंतर सात महिन्यांत प्रत्यक्ष कारवाईला सातत्य नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. यापूर्वी मार्च महिन्यात सुरू करण्यात आलेली अतिक्रमण हटाव मोहीम काही अंतरापर्यंतच मर्यादित राहिली. काही भागांत कारवाई झाली, तर इतर ठिकाणी अतिक्रमण कायम राहिल्याने दुजाभाव झाल्याचा आरोपही करण्यात आला. त्यामुळे पालिकेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते.

# लोकन्यायालय व कायदेविषयक शिबिरे आवश्यक

### दिवाणी व फौजदारी न्यायाधीश आर. जी. कुंभार




**पालकांनी मुला-मुलींवर लक्ष ठेवावे**

ॲड. विश्वजीत कदम यांनी विविध सामाजिक आणि कौटुंबिक प्रकरणांची उदाहरणे देत पालकांनी आपल्या मुला-मुलींकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. योग्य मार्गदर्शन आणि संवादामुळे अनेक समस्या टाळता येऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले.

शिवनेरी : (स. गांवकरी)

सर्वसामान्य नागरिकांना कायद्याची माहिती मिळावी, न्यायप्रक्रियेची जाणीव व्हावी तसेच न्यायालयातील प्रकरणे सामोपचाराने व तडजोडीने निकाली निघावीत यासाठी लोकन्यायालय आणि कायदेविषयक शिबिरांचे मोठे महत्त्व असल्याचे प्रतिपादन तृतीय सहदिवाणी न्यायाधीश तथा न्याय दंडाधिकारी आर. जी. कुंभार यांनी केले. कुमशेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित कायदेविषयक जनजागृती शिबिरात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. त्यांनी नागरिकांना न्यायालयीन प्रक्रिया, लोकन्यायालयाची भूमिका आणि कायदेशीर हक्कांविषयी सविस्तर माहिती दिली. कायद्याचे ज्ञान असल्यास अनेक वाद न्यायालयात जाण्यापूर्वीच मार्गी लागू शकतात, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी ॲड. राम कर्पे यांनी शेतकरी बांधवांच्या अडचणी मांडताना सांगितले की, कायदेविषयक शिबिरे अत्यंत उपयुक्त असली तरी सकाळच्या वेळेत शेतकऱ्यांची शेतीच्या कामासाठी मोठी धावपळ असते. दुसरीकडे वकिलांनाही न्यायालयीन कामकाजासाठी उपस्थित राहावे लागते. त्यामुळे वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून अशा शिबिरांची वेळ बदलण्यात यावी. हा कार्यक्रम न्यायालयासाठी नसून सामान्य जनता व नागरिकांसाठी असल्याने त्यांच्या सोयीचा विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ॲड. यू. सी. तांबे यांनी नागरिकांना न्यायालयीन खटले शक्य तितक्या सामोपचाराने व तडजोडीने मिटविण्याचे आवाहन केले. त्यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक ताण कमी होतो. खटला सामोपचाराने मिटला तर दोन्ही पक्षांचा विजय झाल्यासारखे असते, असे त्यांनी सांगितले. ॲड. अविनाश थोरवे यांनी कायद्याचे ज्ञान आणि योग्य दृष्टीकोन असल्यास अनेक वाद न्यायालयापर्यंत जाण्याची गरज भासत नाही, असे सांगितले. महात्मा गांधी तंटामुक्ती अभियानाच्या माध्यमातून गावातील तंटे गावातच सोडविता येतात आणि सामाजिक सलोखा टिकविता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी ॲड. अरुण गाडेकर, ॲड. करमेश गाडेकर आणि ग्रामपंचायत सदस्य अंबादास डोके यांनीही मनोगत व्यक्त केले.

# थेरबन ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या संयुक्त चौकशीचे आदेश

- १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश

भोकर : (स. गांवकरी)

थेरबन ग्रामपंचायतीतील सन २०२१ ते २०२५ या कालावधीत झालेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत ग्रामस्थ सुरेश जयवंतराव मुपडे व पुरुषा गंगाराम सुदेवाड यांनी पंचायत समिती कार्यालय, भोकर समोर सुरू केलेले आमरण उपोषण आज तिसऱ्या दिवशीही कायम आहे. उपोषणकर्त्यांनी भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे. उपोषणकर्त्यांनी यापूर्वी ३ जुलै व १३ जुलै रोजी पंचायत समितीकडे सविस्तर तक्रारी सादर करून थेरबन ग्रामपंचायतीत २०१५ ते २०२६ या कालावधीत मंजूर झालेल्या विविध विकासकामांची आर्थिक व तांत्रिक तपासणी करण्याची मागणी केली होती. या तक्रारींमध्ये मंदिरे, समाजमंदिर, पशुवैद्यकीय दवाखाना, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी, चिल्ड्रन पार्क, रेन हार्वेस्टिंग तसेच इतर विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, उपोषण सुरू झाल्यानंतर प्रशासनानेही या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. गटविकास अधिकारी, पंचायत समिती भोकर यांनी १५ जुलै २०२६ रोजी विस्तार अधिकारी (पंचायत), कनिष्ठ अभियंता पंचायत समिती आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांना संयुक्त चौकशीचे आदेश दिले आहेत. आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीतील सर्व मुद्द्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आर्थिक व तांत्रिक बाबींची संयुक्त चौकशी करावी तसेच १५ दिवसांच्या आत सविस्तर अहवाल पंचायत समितीकडे सादर करावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

# लैंगिक अत्याचार; जाब विचारणाऱ्या आईलाही जीवे मारण्याची धमकी

संगमनेर : (स. गांवकरी)



संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागात १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (ता. १५) पहाटे उघडकीस आली. या प्रकरणात मुलीचा शोध घेत घटनास्थळी पोहोचलेल्या आईने आरोपीला जाब विचारला असता, त्याने उलट तिलाच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलिसांनी आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या ३३ वर्षीय आईने दिलेल्या फिर्यादीनुसार मंगळवारी रात्री कुटुंबीय नेहमीप्रमाणे जेवण करून झोपले होते. बुधवारी पहाटे सुमारे चार वाजता संबंधित महिलेला जाग आली असता तिची १५ वर्षीय मुलगी बिछान्यावर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सुरुवातीला मुलगी नैसर्गिक विधीसाठी घराबाहेर गेली असावी, असा त्यांचा समज झाला. मात्र बराच वेळ उलटूनही ती परत न आल्याने त्यांनी परिसरात शोध सुरू केला.

घरालगतच्या शेताच्या दिशेने शोध घेत असताना मुलगी आणि आरोपी एकत्र असल्याचे त्यांना दिसून आले. घडलेल्या प्रकाराचा जाब विचारताच आरोपीने आक्रमक भूमिका घेत पीडित मुलीला आईकडे जाऊ नकोस, तसेच "कोण काय करते ते मी पाहतो," अशा आशयाची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे पीडित आई हादरून गेली.

सकाळी संबंधित महिलेने संगमनेर शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी पीडितेचे जबाब, वैद्यकीय तपासणी आणि अन्य पुरावे संकलित करून आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४, ३५१(२) तसेच पोक्सो कायद्यातील कलम ४, ६, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला. आरोपीला तातडीने अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष पगारे करीत आहेत.

घटनेमुळे संगमनेर तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अल्पवयीन मुलांच्या अज्ञानाचा किंवा विश्वासाचा गैरफायदा घेणाऱ्या आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करून अशा गुन्ह्यांचा जलदगतीने तपास पूर्ण व्हावा आणि दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अल्पवयीन मुलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांकडे केवळ गुन्हा म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक कारणांचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आज शिक्षण, माहिती आणि संवादासाठी मोबाईल व इंटरनेट अपरिहार्य झाले असले, तरी त्याच माध्यमांद्वारे अयोग्य माहिती आणि मजकूरही मुलांपर्यंत सहज पोहोचत आहे. त्यामुळे अनेक मुला-मुलींमध्ये नातेसंबंध आणि लैंगिकतेबाबत चुकीच्या समजुती निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

मुलांना मोबाईल देणे ही समस्या नसली, तरी त्याच्या वापरावर नियंत्रण नसणे ही चिंतेची बाब आहे. पालकांनी मुलांच्या ऑनलाइन सवयी, मित्रपरिवार, सामाजिक माध्यमांवरील संपर्क आणि वागणुकीतील बदल यावर लक्ष ठेवण्याबरोबरच त्यांच्याशी विश्वासाचे नाते निर्माण करणे आवश्यक आहे. शाळा, पालक आणि समाज या तिन्ही घटकांनी बालसुरक्षा, 'गुड टच-बॅड टच', इंटरनेट सुरक्षितता आणि कायदेशीर परिणाम याबाबत सातत्याने जनजागृती करणे ही काळाची गरज बनली आहे.

अल्पवयीन मुलांशी संबंधित प्रत्येक घटना ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून संपूर्ण समाजासाठी धोक्याचा इशारा आहे. त्यामुळे दोषींना कठोर शिक्षा देण्याबरोबरच प्रतिबंधात्मक उपाययोजना, पालकांचे मार्गदर्शन आणि मुलांमध्ये योग्य मूल्यसंस्कार रुजविण्यावर भर देणे हीच भविष्यात अशा घटनांना आळा घालण्याची प्रभावी दिशा ठरू शकते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मुलभूत सुविधा अंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्त्यांचा कामाचा शुभारंभ

नवीन नांदेड (स. गांवकरी) : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक 19 मधील मुलभूत सुविधा अंतर्गत असलेल्या निधीतून 1कोटी 60 लक्ष रूपयाचा कामांचा शुभारंभ जैन को-ऑप हाऊसिंग सोसायटी येथे बॉम्ब शोध पथक ते जैन को ऑप सोसायटी पर्यंत सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याच्या शुभारंभ माजी नगरसेवक राजू पाटील काळे, नगरसेवक प्रतिनिधी विनोद काकडे व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत 14 जुलै रोजी करण्यात आला. मनपा हद्दीतील नवीन कौठा भागातील प्रभाग क्रमांक 19 मधील गेल्या अनेक वर्षांपासून मुख्य रस्ता प्रलंबित होता तर पावसाळ्यात या भागात नागरीकाची व विध्यार्थी सह वाहनधारकांची गैरसोय होत गेली परिसरातील नागरिकांनी या गैरसोयी बदल माजी नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या कडे केली होती अखेर या मुख्य रस्त्यासाठी मुलभूत सुविधा अंतर्गत 1 कोटी 60 लक्ष रूपये निधी उपलब्ध झाला असून बॉम्ब शोध पथक ते जैन को.ऑप सोसायटी पर्यंत 461 लांबी व 7 मिटर रूंदी कामाचा शुभारंभ माजी नगरसेवक राजू पाटील काळे, नगरसेवक प्रतिनिधी विनोद काकडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला, यावेळी अध्यक्ष विजय(मुन्ना) कासलीवाल,अमितकासलीवाल,उपनिरीक्षक संजय केंद्रें,सुनील काला,अनिल कासलीवाल, किशोर कासलीवाल, बाबूरावजी धूमाल ,गुत्तेदार शिंदे,मारुती भारती,प्रदीप बाबले,कामाजी आणि संजय जाधव यांच्या सह परिसरातील नागरिक उपस्थित होते.





### राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे बळ

संगमेश्वर (स. गांवकरी) : हातिव मोहल्ला (ता. संगमेश्वर) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पक्षप्रवेश व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत युवक रेहान गडकरी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने युवक, महिला आणि ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करत पक्षाला भक्कम पाठबळ दिले. त्याचबरोबर विविध शैक्षणिक व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात आमदार शेखर निकम यांनी पक्षप्रवेश केलेल्या सर्वांचे स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी राजकारणाचा केंद्रबिंदू हा केवळ निवडणुका नसून जनतेचा सर्वांगीण विकास असल्याचे स्पष्ट केले. गावागावांत मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांवर भर देत विकासकामांना प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.



### एसआयआर गणना पत्र मोहीमेला नागरीकांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद

नवीन नांदेड (स. गांवकरी) : महसूल ,मनपा प्रशासन यांच्या वतीने व मनपा प्रभाग क्रमांक 19 नगरसेवक यांच्या सहकार्याने आयोजित एस आय आर मोहीम अंतर्गत 15 जुलै रोजी आयोजित कॅम्पला जुना कौठा नांदेड येथील विविध भागातील बुथ वाईज मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला यावेळी मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे,उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड यांनी भेट देऊन प्रशंसा केली. 15 जुलै रोजी आयोजित एस आय आर मोहीमे अंतर्गत गनना पत्र नोंदणी अभियानाचे आयोजन नगरसेवक प्रतिनिधी गणेश काकडे ,विनोद काकडे आणि राजू पाटील काळे यांच्या पुढाकाराने नरोबा मंदिर (कौठा) परिसरात नुकतेच 'एस आय आर शिबिर'चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला असून, सकाळ पासूनच लोकांनी शिबिराच्या ठिकाणी मोठी गर्दी केली होती. अनेक नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घेत आपले फॉर्म भरून घेतले.या शिबीराला मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, उपायुक्त गढवे, उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड,मनपा सिडको सह आयुक्त डॉ मिर्झा बेग, यांनी भेट देऊन पाहणी करून बुथ वाईज बिलओ यांच्या सह मतदार नोंदणी साठी टेबल व्यवस्था केल्या बदल नगरसेवक प्रतिनिधी यांच्यी प्रशंसा करून अभिनंदन केले,यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत नगरसेवक प्रतिनिधी राजूपाटील काळे,गणेश काकडे,विनोद काकडे यांनी केले. निवडणूक अधिकारी अविनाश शिनगारे बिएलओ म्हणून बकवाड,वाखडकर,वलसे,भोकरे,वानखेडे,नव्हारे यांच्या सह तलाठी श्रीरामे,वसुली लिपिक मारोती सारंग ,मोहन आसुरे यांनी सहकार्य केले. लोक प्रतिनिधींच्या या जनहिताच्या उपक्रमाचे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### नांदेड जिल्हा पोलीस दलांचे नाव जागतिक पातळीवर पोहचवणारे

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा पोलीस दलांचे नाव जागतिक पातळीवर पोहचवणारे अर्धापूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत अंमलदार चंद्रकांत पुलकुटवार. यांनी जागतिक शालेय व्हॉलीबॉल क्रिडा स्पर्धा शियागुंल चायना यशस्वी पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप व जिल्हा पोलीस अधीक्षक निलभ रोहन यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. जागतिक शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा 2026 शियांगलू चायना येथे दिनांक 1 जुलै ते 10 जुलै दरम्यान पार पडल्या स्पर्धेत भारतातून व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांचेकडून महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोशियन कडे दोन पंचाची मागणी केली होती त्यामध्ये नांदेड येथील पोलीस स्टेशन अर्धापूर येथील अमलदार चंद्रकांत पुलकुटवार व सौरभ रोकडे नागपूर यांची निवड झाली होती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून भारतात परत आल्यावर पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# धुमाळांच्या निर्गमनानंतर उभाठा शिवसेनेत नवे पर्व

## महेश नवले यांच्याकडे तालुकाध्यक्षपदाची धुरा, पुनर्वसनाच्या चर्चांना उधाण!



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

अकोले : (स. गांवकरी)

शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर अकोले तालुक्यातील ठाकरे गटाच्या राजकारणात मोठे बदल घडू लागले आहेत. अनेक वर्षे तालुकाध्यक्षपदावर असलेले मच्छिंद्र धुमाळ शिंदे गटात गेल्यानंतर अखेर ठाकरे गटाने तरुण नेतृत्वाला संधी देत महेश नवले यांच्याकडे तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. त्यामुळे तालुक्यातील पक्ष संघटनेत नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

महेश नवले यांच्या नियुक्तीपूर्वी ज्येष्ठ शिवसैनिक प्रभाकर फापाळे आणि माधवराव तिटमे यांच्या नावांची जोरदार चर्चा होती. मात्र पक्षश्रेष्ठींनी अनुभवी तरुण नेतृत्वावर विश्वास दाखवला. राजकीय वर्तुळात अशीही चर्चा आहे की, फापाळे आणि तिटमे यांना वरिष्ठ पातळीवर महत्त्वाची जबाबदारी देऊन त्यांचा सन्मान केला जाऊ शकतो. पक्षावर टीका झाली की ठामपणे भूमिका मांडणारे आणि संघटनासाठी सातत्याने सक्रिय राहणारे नेते म्हणून या दोघांची ओळख आहे.

मच्छिंद्र धुमाळ यांनी अनेक वर्षे तालुकाध्यक्ष म्हणून पक्षाचे नेतृत्व केले. माजी जिल्हाप्रमुख बाबासाहेब ढमाले यांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना तालुकाध्यक्षपदाची संधी दिली होती. त्यानंतर कारखाना, शिक्षण संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विविध आंदोलने आणि मोर्चांमध्ये धुमाळ यांची भूमिका प्रभावी राहिली. त्यामुळे त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे मोठे आव्हान नव्या नेतृत्वासमोर आहे.

दरम्यान, धुमाळ शिंदे गटात गेल्यानंतर त्यांचे पुनर्वसन कोणत्या पदावर होणार, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. विद्यमान तालुकाध्यक्ष सुशांत गजे यांच्याकडे शिंदे गटाची धुरा असताना धुमाळ यांना पुन्हा तालुकाध्यक्षपदाची संधी मिळेल का, की अन्य महत्त्वाची जबाबदारी दिली जाईल, याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. धुमाळ आणि मारुती मेंगाळ यांच्यातील दीर्घकाळाचा राजकीय दुरावा आता संपुष्टात येणार का, हाही चर्चेचा विषय ठरला आहे.

महेश नवले यांच्याकडे प्रभावी वक्तृत्व, संघटन कौशल्य आणि आंदोलनात्मक नेतृत्वाची ताकद असल्याचे पक्षातील कार्यकर्त्यांचे मत आहे. विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने भूमिका घेतली असून, मोर्चे आणि आंदोलने यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यामुळे तालुक्यात पक्षसंघटना अधिक बळकट करण्याची क्षमता त्यांच्यात असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, अकोले तालुक्यात शिवसेनेचा पारंपरिक मतदार मोठ्या प्रमाणावर आहे. विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांचा इतिहास पाहता शिवसेनेला कायम लक्षणीय मताधिक्य मिळत आले आहे. योग्य नियोजन आणि नव्या नेतृत्वाला संधी मिळाल्यास ठाकरे गटाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नव्याने बळ मिळू शकते, अशी चर्चा आहे.

लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाला मिळालेला जनाधार आणि उद्धव ठाकरे यांच्याबाबत असलेली सहानुभूती अजूनही कायम असल्याचे अनेक कार्यकर्ते सांगतात. दुसरीकडे, शिंदे गटात नव्याने दाखल झालेल्या नेत्यांच्या पुनर्वसनामुळे आधीपासून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही ना, अशीही चर्चा सुरू आहे. माजी खासदार सदाशिव लोखंडे गट आणि खासदार भाऊसाहेब वाकचौरे समर्थक यांच्या समन्वयाचेही मोठे आव्हान शिंदे गटासमोर राहणार आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही शिवसेनांमध्ये पदे, संघटन आणि उमेदवारी यावरून मोठी चुरस निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अकोले तालुक्यातील हे बदल आगामी राजकीय समीकरणांवर निश्चितच प्रभाव टाकणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## ज्ञानप्रसाद ग्लोबल विद्यापीठाचा नानयांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटसोबत करार

पुणे : (स. गांवकरी)



विद्यार्थी देवाणघेवाण, संयुक्त संशोधन आणि जागतिक शिक्षणासाठी नवी संधी

डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या ज्ञानप्रसाद ग्लोबल विद्यापीठाच्या स्कूल फॉर हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझमने सिंगापूरमधील नानयांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या करारामुळे भारत आणि सिंगापूरमधील हॉस्पिटॅलिटी व पर्यटन शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, शैक्षणिक संसाधनांची देवाणघेवाण आणि अध्यापनातील सर्वोत्तम पद्धतींची अंमलबजावणी केली जाणार आहे. या करारावर विद्यापीठाच्या वतीने स्कूल फॉर हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझमचे संचालक डॉ. प्रद्युम्न राठोड, तर नानयांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने उपाध्यक्ष (एसआरए) श्री. खू रेमंड, उपसंचालक सुश्री टॅनी आणि भारतासाठी सहाय्यक देश व्यवस्थापक श्री. हर्ष पगारिया उपस्थित होते. यावेळी प्रो-चान्सलर डॉ. सोमनाथ पी. पाटील म्हणाले, "विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आंतरराष्ट्रीय अनुभव आणि विविध संस्कृतींमध्ये कार्य करण्याची क्षमता मिळावी, यासाठी ही भागीदारी महत्त्वपूर्ण ठरेल. जागतिक हॉस्पिटॅलिटी आणि पर्यटन क्षेत्रातील संधींसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे." मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रोहिणी एस. पाटील म्हणाल्या, "संयुक्त संशोधन, प्राध्यापक सहकार्य आणि विद्यार्थी देवाणघेवाण कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अनुभव अधिक समृद्ध होईल.

## सोनालिकाने २० लाखाव्या ट्रॅक्टरचे केले भव्य अनावरण

पुणे : (स. गांवकरी)




भारतातील ट्रॅक्टर निर्यातीतील आघाडीचा ब्रँड असलेल्या 'सोनालिका ट्रॅक्टर्स'ने नुकताच पंजाबमधील होशियारपूर येथील आपल्या 'जगातील सर्वात मोठ्या एकात्मिक ट्रॅक्टर निर्मिती प्रकल्पा'तून २० लाखाव्या ट्रॅक्टरचे भव्य अनावरण केले. हे नवीन संपादन जागतिक दर्जाच्या नाविन्यपूर्णतेच्या जोरावर शेतकऱ्यांच्या गरजांना प्राधान्य देणारी उत्पादने विकसित करण्याच्या कंपनीच्या ३० वर्षांच्या गौरवशाली वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा दर्शवते आणि जगातील प्रमुख ट्रॅक्टर उत्पादकांमध्ये कंपनीचे स्थान अधिक प्रबळ करते.

सोनालिकासाठी गुणवत्तेचे सर्वोच्च निकष राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि यासाठी कंपनी सातत्याने रोबोटिक्स व ऑटोमेशनवर आधारित प्रगत स्वयंचलित प्रक्रियांचा वापर करते. शेतकऱ्यांचा दीर्घकालीन विश्वास संपादन करण्यासाठी, कामगिरी, टिकाऊपणा आणि विश्वासार्हता यांबाबतच्या सर्वोच्च मानकांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने सोनलिकाचा प्रत्येक ट्रॅक्टर कसून चाचण्या आणि पडताळणीच्या विविध टप्प्यांतून जातो. या ब्रँडच्या प्रचंड उत्पादन क्षमतेचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे, शक्तिशाली ट्रॅक्टरच्या निर्मितीसाठी लागणारा प्रत्येक सुटा भाग स्वतःच्या कारखान्यातच तयार करण्याची पूर्ण क्षमता या सुविधेत आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीपक मित्तल म्हणाले, "आमच्या २० लाखाव्या ट्रॅक्टरचे अनावरण हे भारतीय अभियांत्रिकी कौशल्यावर आणि दूरदृष्टी, नावीन्य व उत्कृष्ट अंमलबजावणीच्या जोरावर विविध भौगोलिक प्रदेश आणि कृषी परिस्थितींमध्ये किती मोठी मजल मारता येते, यावर भर देते. तीन दशकांपूर्वी होशियारपूरमध्ये सुरू झालेला हा प्रवास आज १५० हून अधिक देशांतील शेतकऱ्यांना उत्साह देत आहे, ज्यामुळे सोनालिका एक जागतिक स्तरावर प्रतिष्ठित ब्रँड आणि भारतातील नं.१ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड म्हणून स्थापित झाला आहे. या यशाचा आम्हाला अभिमान वाटत असला तरी आम्ही विकासाला गती देणे, आमचा आंतरराष्ट्रीय ठसा अधिक दृढ करणे आणि नावीन्य, चपळता व उत्कृष्ट अंमलबजावणीच्या जोरावर जागतिक नेतृत्वाचा पुढील अध्याय निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत." होशियारपूर प्लांटमध्ये आयोजित उत्पादनाच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यानिमित्त आयोजित समारंभात बोलताना, 'इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड'चे सह-व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "आमच्या प्लांटमध्ये कच्च्या पोलादावर प्रक्रिया करण्यापासून ते आमच्या ट्रॅक्टर्सद्वारे जगातील सर्वात कठीण भूप्रदेशांवर विजय मिळवण्यापर्यंत, आमच्या कारखान्याचा प्रत्येक क्षण एकाच भावनेने प्रेरित आहे: ती म्हणजे, आम्ही कितीही प्रगती केली तरी, जगाचे पोट भरणाऱ्या हातांची समृद्धी सुनिश्चित करणे हेच आमचे मूळ ध्येय राहील. सर्व घटकांचे १००% उत्पादन स्वतःच्याच कारखान्यात (इन-हाऊस) करत असल्यामुळे, आमच्या प्रत्येक ट्रॅक्टरमध्ये आमच्या अंतर्गत क्षमतांचे सामर्थ्य आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाची अचूकता एकवटलेली असते.

## NAMASTE दिन उत्साहात साजरा; कचरा वेचक व स्वच्छता कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा योजनांशी जोडण्यावर भर

### भिवंडी तालुक्यातील कोन ग्रामपंचायतीत जनजागृती व प्रोफायलिंग उपक्रम संपन्न

ठाणे : (स. गांवकरी)

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार 'NAMASTE Rural (National Action for Mechanised Sanitation Ecosystem)' अभियानांतर्गत NAMASTE दिन मंगळवार, दि. १४ जुलै, २०२६ रोजी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कोन ग्रामपंचायतीमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश कचरा वेचक व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रोफायलिंग करून त्यांना सामाजिक सुरक्षा, आरोग्य संरक्षण, कौशल्य विकास आणि सन्मानजनक उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे हा होता.

NAMASTE Rural ही केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून स्वच्छता कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपाययोजना या योजनेअंतर्गत राबविण्यात येत आहेत. यामध्ये कचरा वेचकांचे सर्वेक्षण व प्रोफायलिंग, क्षमता विकास, सामाजिक सुरक्षा योजनांशी जोडणी, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य संरक्षण तसेच उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे विविध उपक्रमांचा समावेश आहे.

**योजनेअंतर्गत मिळणारे प्रमुख लाभ**

NAMASTE योजनेद्वारे पात्र लाभार्थ्यांना पुढील सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत –

- NAMASTE ओळखपत्र
- वैयक्तिक सुरक्षा साहित्य (PPE Kit)
- आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आरोग्य विमा संरक्षण
- लाभार्थ्यांच्या मुलांसाठी प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती
- व्यावसायिक सुरक्षा व कौशल्य विकास प्रशिक्षण
- District Waste Collection Centres (DWCCs) च्या माध्यमातून उद्योजक म्हणून विकसित होण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी राज्यस्तरावरून प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन, गट विकास अधिकारी, जिल्हा सल्लागार, विस्तार अधिकारी, गट समन्वयक व समूह समन्वयक यांचे आभासी माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत अधिकारी (सर्वेअर) यांचेही ऑनलाइन प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर सर्वेक्षण व जनजागृती अभियान सुरू करण्यात आले आहे. कोन ग्रामपंचायतीत आयोजित कार्यक्रमास सरपंच रेखा पाटील, ग्रामपंचायत अधिकारी नितीन चव्हाण, जिल्हा सल्लागार दत्तात्रय सोळंके, मास्टर ट्रेनर ज्ञानेश्वर चंदे तसेच मोठ्या संख्येने कचरा वेचक व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांना NAMASTE योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली तसेच त्यांचे प्रोफायलिंग करण्यात आले.

## एचडीएफसी बँक परिवर्तनने केली ९.६ लाख लोकांच्या जीवनात सुधारणा

मुंबई : (स. गांवकरी)

HDFC BANK
We understand your world

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँक परिवर्तन या एचडीएफसी बँकेच्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत युवकांची कौशल्ये, ज्ञान आणि संधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करण्यात येत असून भारताच्या सध्याच्या बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. सुरुवातीपासूनच बँकेच्या कौशल्यवृध्दी आणि जीवनव्यापन कार्यक्रमांनी ९.६ लाख लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे. एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन चा दृष्टिकोन हा कौशल्य विकासाची औपचारिक, प्रमाणनावर आधारीत प्रशिक्षण देऊन जीवनव्यापन आणि व्यावसायिक प्रशिक्षण हे स्थानिक स्तरानुसार आहे. त्यांच्या बाजारपेठेतील भागीदार आणि एनएसडीसी प्रमाणित संस्थांच्या सहकार्याने विविध प्रमाणन कार्यक्रमांच्या माध्यमातून १.९६ लाख तरुणांना विविध क्षेत्रातील औपचारिक प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये आरोग्य, रिटेल, वाहतूक, आदरातिथ्य, बँकिंग, विमा, ईव्ही देखभाल, आयटी आणि डिजिटल तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांबरोबरच त्यांना सॉफ्ट स्कील्स, डिजिटल साक्षरता, वित्तीय साक्षरता आणि नोकरीतही सहकार्य केले जाते, ज्यामुळे तरुणांना शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. बँकेने कौशल्याच्या या पध्दतींना सक्षम करत उपक्रमांचे अशा प्रकारे डिझाईन केले आहे ज्यामुळे तरुणाईला रोजगाराच्या संधी मिळतात विशेष करुन गरीब समाजासह तरुण मुलींना याचा अधिक लाभ होतो.

## प्री-रिझर्व्हची सुरूवात

पुणे : (स. गांवकरी)

सॅमसंगच्या आगामी गॅलेक्सी फोल्डेबल डिव्हाईसेसचे ग्राहक प्री बुकिंग आत्ताच करू शकतात, असे कंपनीने जाहीर केले आहे. त्यासाठी ग्राहकांना ९९९ रुपये इतकी रिफंडेबल टोकन रक्कम भरावी लागेल. हे बुकिंग ग्राहक कंपनीच्या संकेतस्थळावर, सॅमसंग एक्सक्लुसिव्ह स्टोअर्स,अॅमेझॉन डॉट इन, फ्लिपकार्टसह भारतातील प्रमुख रिटेल आऊटलेट्समध्ये केले जाऊ शकते. नवीन फोल्डेबल डिवाईसेस प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना ही डिवाईसेस खरेदी केल्यावर २७९९ रुपयांचे फायदे मिळतील. सॅमसंगने आपले फोल्डेबल डिवाईसेस अधिक पातळ, हलकी, शक्तिशाली आणि अधिक सुलभ बनवणे सुरू ठेवले आहे.



# गुलबर्गा येथील मध्यवर्ती कारागृहातून तीन कैदी फरार


## पहाटे ३ वाजता भिंत ओलांडून केले पलायन

सोलापूर : (स. गांवकरी)

गुलबर्गा येथील मध्यवर्ती कारागृहातून तीन कैदी फरार पहाटे ३ वाजता भिंत ओलांडून पलायन केले असल्याची घटना घडली आहे. मध्यवर्ती कारागृहाची उंच संरक्षक भिंत ओलांडून तीन कैदी फरार झाले आहेत, मंगळवारी मध्यरात्री ही घटना घडली आहे. घटने नंतर पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. गुलबर्गा जिल्हा मध्यवर्ती कारागृहाची उंच संरक्षक भिंत ओलांडून तीन कैदी पळून गेल्याची घटना उघडकीस आली. त्यामुळे कारागृह प्रशासन आणि सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पळून गेलेल्या कैद्यांची ओळख मस्तान, संतोष आणि सागर अशी आहे. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, ही घटना मंगळवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास घडली. तुरुंग सुरक्षा कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे लक्ष न वेधता पळून गेलेल्या या तीन कैद्यांचे पलायन तुरुंग विभागासमोर एक मोठे आव्हान बनले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तीन कैद्यांनी तुरुंगाची उंच भिंत ओलांडून पलायन केले. पहाटेच्या सुमारास या घटनेची माहिती मिळताच, तुरुंग प्रशासन आणि कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यात आले आणि तुरुंगाच्या आत व परिसरात कसून शोधमोहीम सुरू करण्यात आली. या घटनेनंतर, फरहताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस आणि कारागृह कर्मचाऱ्यांनी संयुक्त मोहीम सुरू केली आहे. शहराच्या बाहेरील भाग, बस स्थानके, रेल्वे स्थानके आणि प्रमुख रस्त्यांवर कडक तपासणी ठेवण्यात आली आहे. फरार कैद्यांविषयीची माहिती जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांनाही पाठवण्यात आली असून, त्यांना त्वरित अटक करण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. या संदर्भात, वरिष्ठ अधिकारी तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेत असून, या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. फरार कैद्यांना लवकरच अटक केली जाईल, असा विश्वास पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व पाडकामातून निर्माण होणाऱ्या (Construction and Demolition - C&D) कचऱ्याचे निर्मितीपासून अधिकृत प्रक्रिया केंद्रापर्यंत प्रभावी, पारदर्शक आणि शास्त्रोक्त व्यवस्थापन करण्यासाठी ठाणे महापालिकेने C&D Waste Management Portal विकसित केले असून या पोर्टलचे उद्घाटन आज महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...

### फीफा विश्वचषक सामन्याचा थरार अनुभवा एअरटेल वाय-फाय+ सोबत

■ पात्र ग्राहकांना फक्त २४ रुपयांमध्ये सामना पाहण्याची संधी

मुंबई (स. गांवकरी) : फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना आता अगदी जवळ आला असून, देशभरातील देशभरातील फुटबॉल चाहते या मोठ्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. याच पार्श्वभूमीवर एअरटेलने आपल्या वाय-फाय + टीव्ही (आयपीटीव्ही आणि डीटीएच) ग्राहकांना सामना पाहण्यासाठी एक सोपा आणि परवडणारा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, पात्र ग्राहक त्यांच्या सध्याच्या प्लॅनमधूनच फीफा विश्वचषक अंतिम सामन्याचा आनंद घेऊ शकतात किंवा फक्त 24 रुपये प्रति महिना देऊन युनाईट8 स्पोर्ट्स चॅनेल सुरू करू शकतात आणि हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये थेट सामना पाहू शकतात. एअरटेलने ग्राहकांना आवाहन केले आहे की, वेगळे स्ट्रीमिंग किंवा टीव्ही सबस्क्रिप्शन घेण्यापूर्वी एअरटेल ॲपवर जाऊन आपल्या सध्याच्या वाय-फाय + टीव्ही प्लॅनमध्ये कोणते फायदे मिळतात, ते तपासून पाहावेत. कंपनीचे 599 रुपये प्रति महिना पासून सुरू होणारे प्लॅन हाय-स्पीड फायबर ब्रॉडबँड, आयपीटीव्ही, ओटीटी ॲप्सचा प्रवेश आणि एअरटेल ॲपद्वारे सर्व सेवा एकाच ठिकाणी व्यवस्थापित करण्याची सुविधा देतात. त्यामुळे ग्राहकांना क्रीडा स्पर्धांसोबतच विविध मनोरंजनाचाही आनंद घेता येतो.

### नवी मुंबई विमानतळावरून अबू धाबीसाठी थेट सेवा सुरू

मुंबई (स. गांवकरी) : अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड (एएएचएल) संचलित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (एनएमआयए) नियोजित आंतरराष्ट्रीय विमानसेवेला प्रारंभ झाला असून, एअर इंडिया एक्सप्रेस १५ जुलैपासून नवी मुंबई–अबू धाबी मार्गावर आठवड्यातून तीन दिवस थेट उड्डाण सेवा सुरू करणार आहे. २५ डिसेंबर २०२५ रोजी देशांतर्गत सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांतच विमानतळाने आंतरराष्ट्रीय सेवेचा टप्पा गाठला आहे. या सेवेमुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना संयुक्त अरब अमिरातीच्या राजधानी अबू धाबीसाठी थेट आणि अधिक सोयीस्कर हवाई संपर्क उपलब्ध होणार आहे. तसेच, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जच्या अखत्यारीतील सर्व विमानतळ आता आंतरराष्ट्रीय सेवांशी जोडले गेले आहेत. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले की, "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासातील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध यंत्रणा, नियामक संस्था तसेच सर्व भागधारकांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले. पहिल्या आंतरराष्ट्रीय मार्गासाठी एअर इंडिया एक्सप्रेसने दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. येत्या काळात अधिक विमान कंपन्या आणि नव्या आंतरराष्ट्रीय गंतव्यांचा समावेश करत जागतिक दर्जाचा प्रवास अनुभव देण्यावर आमचा भर राहील."

### सीमेन्सने पुण्यात एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअरची केली घोषणा



पुणे (स. गांवकरी) : बीएसएच हाऊसगेरेट जीएमबीएच ची उपकंपनी आणि प्रीमियम होम अप्लायन्सेसमधील जागतिक अग्रणी असलेल्या बीएसएच होम अप्लायन्सेस प्रा. लि. ने आज शेरिल एंटरप्रायझेस प्रा.लि. च्या भागीदारीत पुण्यात आपल्या एक्सक्लुझिव्ह सीमेन्स ब्रँड स्टोअर ची घोषणा केली आहे. सोलिटेअर बिझनेस हब-१, बाणेर येथे स्थित, हे नवीन ब्रँड स्टोअर सिमेन्सची 'इंटेलिजेंट लिव्हिंग'ची संकल्पना पुण्यात आणते. हे एक असे आकर्षक ठिकाण आहे, जिथे अर्थपूर्ण नावीन्य, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक डिझाइन एकत्र येऊन आधुनिक स्वयंपाकघराला एक नवीन ओळख देतात. केवळ एक विक्री केंद्र न राहता, हे स्टोअर घरमालक, वास्तुविशारद आणि डिझाइनर्सना हे अनुभवण्याची संधी देते की, इंटेलिजेंट उपकरणे एकात्मिक परिसंस्थेप्रमाणे एकत्र कशी काम करतात; ती गरजांचा अंदाज घेतात, दैनंदिन कामे सोपी करतात आणि दैनंदिन जीवनाला उन्नत करणारे समृद्ध अनुभव निर्माण करतात. पुणे हे भारतातील सर्वात प्रगत गृहनिर्माण बाजारांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. २०२१ ते २०२५ या काळात येथे ४.२८ लाखांहून अधिक घरांची विक्री झाली, जी देशातील सर्वाधिक आहे. आता नवीन घरांपैकी निम्मी घरे ही प्रीमियम आणि लक्झरी सेगमेंटमधील आहेत, जे ग्राहकांच्या बदलत्या आवडीचे दर्शन घडवते. लोक आता मॉड्युलर किचन आणि कनेक्टेड उपकरणांकडे वळत आहेत, ज्यामुळे किचन केवळ स्वयंपाकाची जागा न राहता एक 'स्मार्ट वातावरण' बनत आहे.

### एथर आपला पहिला मास-मार्केट ईएल प्लॅटफॉर्म स्कूटर सादर करणार

पुणे (स. गांवकरी) : भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी वाहन निर्माता एथर एनर्जी लिमिटेड यांनी आज जाहीर केले की त्यांच्या प्रमुख समुदाय कार्यक्रमाचा चौथा आवृत्ती एथर कम्युनिटी डे 29 ऑगस्ट 2026 रोजी बेंगळुरूमध्ये आयोजित केला जाणार आहे. या वर्षीच्या कार्यक्रमाची थीम आहे "अ न्यू डॉन ऑफ मॅजिक", ज्यामध्ये एथर आपल्या नवीन ईएल प्लॅटफॉर्मवर आधारित पहिला स्कूटर सादर करणार आहे. यामुळे एथर मोठ्या बाजारपेठेतील स्कूटर सेगमेंटमध्ये प्रवेश करणार आहे. नवीन स्कूटरसोबतच एथर तंत्रज्ञान, चार्जिंग आणि संपूर्ण इकोसिस्टममध्ये अनेक नवकल्पना सादर करणार आहे, ज्यामुळे मालकीचा अनुभव अधिक सहज आणि कनेक्टेड होईल.

# सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी ₹८४२ कोटींच्या आराखड्याला मंजुरी

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक आज सर्व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय घेण्यात आला. सर्वप्रथम ११ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या इतिवृत्तावरील अनुपालन अहवालास मान्यता देण्यात आली.

त्यानंतर २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चास मंजुरी देण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण योजनेअंतर्गत ₹७८३ कोटी (१००%), अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत ₹१४७ कोटी (१००%) आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत ₹५.४४ कोटींपैकी ₹५.४३ कोटी (९९.८३%) खर्च करण्यात आला. अशाप्रकारे एकूण ₹९३५.४४ कोटींपैकी ₹९३५.४३ कोटींचा







म्हणजेच जवळपास शंभर टक्के निधी खर्च करण्यात आल्याची नोंद घेऊन त्यास मंजुरी देण्यात आली.

याच बैठकीत २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीच्या जिल्हा वार्षिक आराखड्यालाही मंजुरी देण्यात आली. प्रारंभी राज्य शासनाने ₹६९३.९० कोटींची निधी मर्यादा निश्चित केली होती. त्यानंतर नागरी भागातील विकासकामांसाठी ₹८०.२६ कोटींचा अतिरिक्त निधी तसेच अक्कलकोट व सांगोला या आकांक्षित तालुक्यांसाठी ₹१० कोटींची विशेष तरतूद मंजूर करण्यात आली. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचा अंतिम नियतव्यय ₹८४२ कोटींवर निश्चित करण्यात आला.

याशिवाय राखीव योजनांसाठी एकूण ₹१८२.६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये नाविन्यपूर्ण योजनांसाठी ₹२९.४७ कोटी, मूल्यमापन व संनियंत्रणासाठी ₹४.२१ कोटी, शाश्वत विकास ध्येय (SDG) सूक्ष्म प्रकल्पांसाठी ₹८.४२ कोटी, महिला व बालविकासासाठी ₹२५ कोटी, शालेय शिक्षण व क्रीडासाठी ₹४५ कोटी, दिव्यांग कल्याण व सक्षमीकरणासाठी ₹८ कोटी, गृह विभागासाठी ₹२४ कोटी, गड-किल्ले संवर्धनासाठी ₹२४ कोटी तसेच महसूल विभागाच्या गतिमान प्रशासन व आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ₹१४.५० कोटींची तरतूद करण्यात आली. या निर्णयांमुळे महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा, दिव्यांग कल्याण, नागरी सुविधा, गड-किल्ल्यांचे संवर्धन, आपत्कालीन व्यवस्थापन आणि पायाभूत विकासकामांना मोठी गती मिळणार असून सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी ₹८४२ कोटींचा हा आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# डॉ. बत्राज यांच्याकडून पहिली प्रगत हेअर रिग्रोथ ट्रीटमेंट 'हेअरगेन' सादर

पुणे : (स. गांवकरी)

डॉ. बत्राज हेल्थकेअरने ५० अब्ज एक्सोसोम्सच्या शक्तीवर चालणाऱ्या, भारतातील पहिल्या प्रगत केस पुनर्वाढीच्या उपचाराची, 'हेअरगेन'ची आज घोषणा करून रिजनरेटिव्ह मेडिसिनच्या (पुनरुत्पादक औषधशास्त्र) क्षेत्रात एक नवीन टप्पा गाठला. त्यामुळे केस पुनरुज्जीवनासाठी शस्त्रक्रियाविरहित उपाय शोधणाऱ्या रुग्णांसाठी जगातील सर्वात आश्वासक रिजनरेटिव्ह तंत्रज्ञानांपैकी एक उपलब्ध होत आहे. केस गळणे ही आता केवळ सौंदर्याची समस्या राहिलेली नाही. भारतातील सर्व वयोगटांतील १५ कोटी लोकांसाठी ही एक भावनिक आणि आत्मविश्वास खच्ची करणारी समस्या बनली आहे.'हेअरगेन' हे



केस गळण्याच्या विविध टप्प्यांचा आणि कारणांचा अनुभव येणाऱ्या पुरुष आणि महिलांसाठी विकसित करण्यात आले आहे. यामध्ये आनुवंशिक केसगळती (पुरुष आणि महिलांमधील टक्कल पडणे), प्रसूतीनंतरची केसगळती, रजोनिवृत्तीनंतर केस पातळ होणे, तणावामुळे होणारी केसगळती आणि केस पातळ होण्याच्या सुरुवातीच्या टप्प्याचा समावेश आहे. 'हेअरगेन' टाळूला थेट शक्तिशाली पुनरुत्पादक संकेत देऊन, सुप्त केसांच्या मुळांना उत्तेजित करते, टाळूचे आरोग्य सुधारते आणि शरीरातील नैसर्गिक केस वाढण्याच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देते. त्यामुळे कालांतराने केस अधिक जाड, दाट आणि निरोगी दिसण्यास मदत होते.

# फोनपेने लॉंच केले 'ऑल-इन-वन टॅक्स फाइलिंग सोल्यूशन'

पुणे : (स. गांवकरी)


फोनपे ने आज आपल्या प्लॅटफॉर्मवर एका सर्वसमावेशक 'टॅक्स फाइलिंग' फीचरच्या लॉंचची घोषणा केली आहे. वैयक्तिक करदाते, फ्रीलान्सर्स आणि लहान व्यावसायिक या सर्वांसाठी टॅक्स कंप्लायन्स सोपे करण्यासाठी हे फीचर तयार करण्यात आले आहे. याद्वारे कोट्यवधी फोनपे युजर्स त्यांचे इन्कम टॅक्स रिटर्न (ITR) सहज फाईल करू शकतील आणि ॲपच्या विश्वासार्ह इकोसिस्टममधून थेट मासिक GST कंप्लायन्सचे व्यवस्थापन करू शकतील. भारताचे अग्रगण्य डिजिटल टॅक्स कंप्लायन्स प्लॅटफॉर्म टॅक्सबडी सोबतच्या भागीदारीत लॉंच केलेले हे फीचर सेवांचा एक एकात्मिक संच प्रदान करते. यामध्ये ₹24 पासून सुरू होणारे स्वतंत्र सेल्फ-फाइलिंग, क्लिष्ट टॅक्स परिस्थितींसाठी तज्ज्ञांची मदत मिळणारे प्लॅन्स आणि लहान व्यापाऱ्यांसाठी मासिक GST फाइलिंगचा समावेश आहे. हे इन-ॲप फीचर इतर कोणत्याही बाह्य पोर्टल्सना भेट देण्याची गरज पूर्णपणे संपवते. याद्वारे ITR ऑप्टिमायझेशनसाठी समर्पित तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि अखंडितपणे चालणारे GST फाइलिंग यांसारखी एंड-टू-एंड कंप्लायन्स टूल्स मिळतात, जी ॲपवरील दैनंदिन आर्थिक सेवांसोबतच अत्यंत सोयीस्करपणे उपलब्ध आहेत. या लॉंचवर भाष्य करताना, फोनपे च्या इन-ॲप कॅटेगरीच्या हेड, निहारिका सैगल म्हणाल्या, "फोनपे वर आम्ही आमच्या युजर्सच्या मुख्य उपयुक्तता गरजा पूर्ण करणारी एक सुलभ आणि विना-अडथळा आर्थिक इकोसिस्टम तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत. तज्ज्ञांचा टॅक्स सल्ला आणि परवडणारे फाइलिंग सोल्यूशन्स सर्वांसाठी सहज उपलब्ध करून देऊन, नोकरदार प्रोफेशनल्सपासून ते गल्लीबोळातील व्यापाऱ्यांपर्यंतच्या आमच्या सर्व युझर्सना त्यांचे टॅक्स फाइलिंग सहजतेने आणि आत्मविश्वासाने व्यवस्थापित करण्यासाठी सक्षम करणे हे आमचे ध्येय आहे."

# सोलापुरात तीन पाकिस्तानी संशयिती अतिरेकी

■ १२६ कोटींचे फंडिंग जमा केले आरोपींच्या मोबाईलमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी नंबर मिळाले

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापुरात तीन पाकिस्तानी संशयिती अतिरेकी मिळाले आहेत. मुंबई आणि पुणे एटी एस ने सोलापूर मधून एका संशयित अतिरेक्याला अटक केली असून दोन संशयित अतिरेकी फरार झाले आहेत अशी माहिती सोलापूर येथील विशेष जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी दिली त्यांनी पुढे सांगितले की. या अतिरेक्यांनी बोगस संस्था काढून या संस्थेच्या माध्यमातून १२६ कोटींचे फंडिंग जमा केले आहेत. तर आरोपींच्या मोबाईलमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी नंबर मिळाले आहेत. दहशतवादाशी संबंधित प्रकरणात एकाला अटक करण्यात आली आहे तर, दोघांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले आहेत. दहशतवादाशी संबंधित एका प्रकरणात सोलापूर जिल्ह्यातील तीन आरोपींना जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलासा देण्यास नकार दिला आहे. एका



आरोपीचा नियमित जामीन अर्ज, तर अन्य दोघांचे अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळले. या प्रकरणात संबंधित संघटनेने तब्बल १२६ कोटी ७ लाख ४१ हजार ४५७ रुपयांचा निधी जमा केल्याचा दावा तपास यंत्रणेने केला आहे. तसेच जप्त मोबाईलमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी नागरिकांचे नंबर आढळल्याची माहिती न्यायालयीन युक्तिवादात समोर आली. मुंबई दहशतवाद विरोधी पथकाने तपास करून सोलापूर जिल्ह्यातील तीन आरोपींविरुद्ध बीएनएस कलम ३१६(५), ३१८(४) यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. दस्त नोंदणी आणि धर्मादाय नोंदणीतील तांत्रिक फरकाचा गैरफायदा घेत नागरिक आणि शासनाची जाणीवपूर्वक दिशाभूल करून १० कोटी ५० लाख रुपयांचा अपहार व फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. आरोपींनी संगनमत करून कट रचत देणगीदार, आयकर विभाग, धर्मादाय विभाग, बँका तसेच अन्य संस्था आणि शासनाची फसवणूक करून आर्थिक गैरलाभ मिळविल्याचे तपास यंत्रणेचे म्हणणे आहे.

तपासादरम्यान संबंधित आरोपी एका दहशतवादी संघटनेचे पदाधिकारी असल्याचे आणि त्यांच्या माध्यमातून संस्था चालविली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. संबंधित संघटनेने १२६ कोटींहून अधिक रक्कम जमा केल्याचेही तपासात समोर आल्याचे सांगण्यात आले. पदाधिकाऱ्यांचे मोबाईल जप्त करून तपासणी केली असता व्हॉट्सअॅप ग्रुप आढळून आले. त्यामध्ये ५० पेक्षा अधिक पाकिस्तानी नागरिकांचे मोबाईल नंबर, तर आंतरराष्ट्रीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे ७२ पेक्षा अधिक नंबर आढळल्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणात एका आरोपीने नियमित जामिनासाठी, तर अन्य दोघांनी अटकपूर्व जामिनासाठी जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केले होते. सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग रजपूत यांनी तिन्ही अर्जांना तीव्र विरोध करत सरकार पक्षाची बाजू मांडली.

आरोपींचा पाकिस्तानी नागरिकांशी संपर्क असून आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा दावा सरकार पक्षाने न्यायालयात केला. या पार्श्वभूमीवर आरोपींना जामीन मंजूर करू नये, असा युक्तिवाद ॲड. रजपूत यांनी केला.

सरकार पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायालयाने एका आरोपीचा नियमित जामीन अर्ज आणि अन्य दोघांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावले.

# लष्कराच्या 'इतर कक्क' नोंदीला महसुल मंत्र्यांनी स्थगिती देत नाशिक जिल्हाधिकाऱ्यांना दिले निर्देश

## इगतपुरी तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना दिलासा



इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमीनीच्या ७/१२ वर लष्कराची नोंद होणार असल्याचा आदेश नुकताच झाल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले होते. यात बेलगाव कुऱ्हे, नांदूरवैद्य, नांदगाव बुद्रुक, साकुर, घोटी खुर्द, समनेरे, मालुंजे, धामणगाव, बेलगाव तऱ्हाळे, अडसरे, अधरवड, टाकेद बुद्रुक, टाकेद खुर्द, सोनोशी, बारशिंगवे आदी गावांअंतर्गत येणारे सर्व महसुली वाड्यापाड्यातील गावांतील शेतकऱ्यांच्या हजारो एकर सातबाऱ्यावरील इतर हक्कात लष्करी सरावासाठी नोंद होणार होती. असा आदेश लष्करी अधिकाऱ्यांनी निर्गमित केल्याने हक्कातील नोंदी रद्द करण्यासाठी आमदार हिरामण खोसकर, माजी आमदार जयंत जाधव व मविप्रचे संचालक ॲड. संदीप गुळवे यांच्या नेतृत्वाखाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेवून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडुन निवेदन देण्यात आले. यावेळी मविप्रचे संचालक ॲड. संदीप गुळवे यांनी १९३८ चा कायदा दाखवुन हा कायदा कॉम्पेशेसन घेण्यासाठी आहे. कुठल्याही प्रकारे इतर अधिकारामध्ये किंवा उताऱ्यामध्ये रेव्हेन्यू रेकॉर्डला नोंद घेण्यासाठी या कायद्यात तरतुदच नाही असे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनात आणून दिली. त्यामुळे चुकीच्या माहितीमुळे हा आदेश निघाला होता असे मंत्री बावनकुळे यांच्या निदर्शनात आणून दिल्याने त्यांनी तो आदेश त्वरीत रद्द करून लागलीच नाशिक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना याबाबत ईमेल करून शेतकऱ्यांच्या जमीनीवर इतर अधिकारात लष्कराची नोंद घ्यायची नाही असा फोन केला. यावेळी ॲड. मविप्रचे संचालक ॲड. संदीप गुळवे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनिल वाजे, माजी सरपंच आत्माराम फोकणे, खरेदी विक्री संघाचे संचालक समाधान वारुंगसे, भाजपा तालुकाध्यक्ष भाऊसाहेब कडभाने, पांडुरंग गाढवे, तुकाराम सहाणे, राहुल वारुंगसे, गणेश फोकणे, गोरख वाजे, नागेश गायकर आदी उपस्थित होते.

> अतिशय महत्वाची बाब म्हणून त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश देत ७/१२ उताऱ्यावर इतर अधिकारात कोणतीही महसूली नोंद न करण्याचे निर्देश दिले. आवश्यक वाटल्यास शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची सूचना केली.
>
> **- ॲड. संदीप गुळवे, संचालक मविप्र**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

विश्वबंधुता साहित्य परिषदेतर्फे आयोजित

## तिरंगा महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रकाश रोकडे




पुणे : (स. गांवकरी)

क्रांती दिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या 'विश्वबंधुतेचा तिरंगा महोत्सव'च्या अध्यक्षपदी विश्वबंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांची, तर स्वागताध्यक्षपदी विश्वबंधुता काव्यमंचचे अध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी दिली. रोकडे यांनी नुकतेच २८ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. महोत्सवाच्या नियोजनासाठी प्रा. शरयू पवार, प्रा. भारती जाधव, प्रा. सायली गोसावी, सुलभा निवंगुणे आणि प्रा. प्रशांत रोकडे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे, असेही शंकर आथरे यांनी नमूद केले.

# रुंदीकरणाला शेतकरी कृती समितीचा पुन्हा एल्गार

**मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा.**

इगतपुरी : (स. गांवकरी)

घोटी–त्र्यंबकेश्वर राज्य महामार्ग क्र. 160 अ साठी होणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेत बाधित शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत शेतकरी कृती समितीने पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. शासनाने बैठकीत दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी न करता भूसंपादनाचे निवाडे प्रसिद्ध केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास महामार्गाला कायमस्वरूपी विरोध करून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समितीने दिला आहे.




यापूर्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुंबई मंत्रालयात दोन वेळा बैठका झाल्या होत्या. या बैठकीत घोटी–त्र्यंबकेश्वर महामार्गासाठी संपादित होणाऱ्या जमिनी, घरे, झाडे, विहिरी, बोअरवेल, हॉटेल, गाळे, पोल्ट्री शेड आदी मालमत्तांना योग्य मोबदला देण्याचे तसेच जमिनींसाठी दुप्पट (गुणक २) मोबदला लागू करण्याचे ठरले होते. ज्या गावांचा सरकारी रेडीरेकनर दर जास्त आहे त्यानुसार टप्पे निश्चित करणे आणि कमी दर असलेल्या गावांनाही न्याय्य दर लागू करण्याबाबत बैठकीच्या इतिवृत्तात स्पष्ट नोंद करण्यात आली होती.

मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार भूसंपादन अधिकाऱ्यांनी त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सापगाव व आंबोली गावांचे निवाडे प्रसिद्ध करताना केवळ सरकारी दराच्या गुणक १ प्रमाणेच मोबदला निश्चित केला असल्याचा आरोप शेतकरी कृती समितीने केला आहे. तसेच अनेक मोठ्या झाडांचे मूल्यांकन रोपट्यांप्रमाणे करण्यात आल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार असल्याचे समितीचे म्हणणे आहे.

> "शेतकरी वर्गाची एकही मागणी मान्य होत नसेल, तर या महामार्गाला माझा कायम विरोध राहील. गरज पडल्यास मी आमदार म्हणून आमरण उपोषणालाही बसेन."
>
> **— आमदार हिरामण खोसकर**
>
> "मुंबई मंत्रालयातील बैठकीत शासनाने शेतकऱ्यांना गुणक २ नुसार मोबदला व न्याय्य भरपाई देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्ष निवाड्यात त्या आश्वासनांचा पूर्णपणे भंग झाला आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. शेतकरी कृती समिती पुन्हा एकदा लढा उभारेल. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आम्ही पुन्हा एल्गार करू आणि न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील.
>
> **— नागेश गायकर, अध्यक्ष, घोटी–त्र्यंबकेश्वर राज्य महामार्ग क्र. 160अ बाधित शेतकरी कृती समिती**

या पार्श्वभूमीवर शेतकरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने आमदार हिरामण खोसकर यांच्या उपस्थितीत मुंबई मंत्रालयात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. बैठकीत शासनाला शेतकऱ्यांच्या सर्व मागण्यांची माहिती देत भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या त्रुटी दूर करण्याची मागणी करण्यात आली. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन शेतकरी हिताचे निर्णय घ्यावेत, अन्यथा महामार्ग प्रकल्पाला कायमस्वरूपी विरोध केला जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी आमदार हिरामण खोसकर, ॲड. संदीप गुळवे, शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर, सचिव गोरख वाजे, सोमनाथ क्षीरसागर, ज्ञानेश्वर महाले, अक्षय भोर यांच्यासह अनेक बाधित शेतकरी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### 'बोर्नियो हॉस्पिटल' तर्फे मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर संपन्न.



ठाणे (स. गांवकरी) : 'बोर्नियो मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटल' तर्फे ठाण्यातील लोढा अमारा सोसायटीमध्ये महिला आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हॉस्पिटलच्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, या शिबिरामध्ये ७० हून अधिक महिलांनी सहभाग घेतला. वरिष्ठ सल्लागार स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. वृषाली पिल्लई यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी त्यांनी महिलांच्या आरोग्याविषयी एक माहितीपूर्ण 'आरोग्य जागरूकता सत्र' घेतले. या सत्रादरम्यान डॉ. पिल्लई यांनी महिलांच्या आरोग्यासाठी नियमित तपासणीचे महत्त्व, स्त्रीरोगांचे वेळीच निदान, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची तपासणी, गरोदरपणातील काळजी, रजोनिवृत्तीबाबत जागरूकता आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा यावर विशेष भर देण्यात आला. सदर शिबिराअंतर्गत महिला आरोग्य तपासणी, पॅप स्मीअर चाचणी, बोन मिनरल डेन्सिटी - हाडांच्या घनतेची चाचणी, व्हिटॅमिन डी३ तपासणी, तज्ज्ञांद्वारे वैयक्तिक स्त्रीरोग समुपदेशन आणि आरोग्य मार्गदर्शन करण्यात आले. लोढा अमारा सोसायटीमधील रहिवाशांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. येथील अनेक महिलांनी आरोग्य जागरूकता सत्रात आणि तपासणी मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. या शिबिराचे आयोजन हॉस्पिटलचे मार्केटिंग प्रमुख उमेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आणि संपूर्ण मार्केटिंग टीमच्या समर्पित प्रयत्नांमुळे हे शिबिर अत्यंत सुरळीतपणे पार पडले आणि समाजातील महिलांपर्यंत पोहोचण्यात ते यशस्वी ठरले. अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेचा प्रसार करणे, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, आजारांचे वेळीच निदान व्हावे यासाठी प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण परिसरातील महिलांचे आरोग्य सुधारणे, यासाठी 'बोर्नियो मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटल' कटिबद्ध आहे.

## महिलेवर बहुविभागीय तज्ज्ञांच्या ट्रॉमा शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा

पुणे : (स. गांवकरी)

उंचावरून पडल्यामुळे जीवघेणी दुखापती झालेल्या २९ वर्षीय महिलेवर आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार झाले. तिच्यावर सात तास ३० मिनिटे चाललेल्या विविध बहू तज्ज्ञांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आलेली गंभीर दुखापतीवरील शस्त्रक्रिया आणि अतिदक्षता विभागातील (आयसीयु) उपचारांनंतर तिची उल्लेखनीयरीत्या प्रकृती सुधारली आहे. गंभीर स्वरूपाच्या पॉलीट्रॉमा (अनेक गंभीर दुखापती) असलेल्या या रुग्णांमध्ये तातडीचा ट्रॉमा उपचारांचा प्रतिसाद, विविध वैद्यकीय शाखांमधील समन्वय आणि समर्पित अतिदक्षता उपचार यांमुळे उपचारांचे परिणाम किती चांगले होऊ शकतात, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. ही महिला रोजंदारीवर काम करणारी मजूर असून उंचावरून पडल्यामुळे तिला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्या वरच्या जबड्याला आणि चेहऱ्याच्या हाडांना गुंतागुंतीचे फ्रॅक्चर (ओरल अँड मॅक्सिलोफेशियल फ्रॅक्चर) झाले होते. तसेच बरगड्यांची अनेक हाडे मोडल्यामुळे तिच्या छातीचा काही भाग अस्थिर होण्याची अवस्था ज्याला



वैद्यकीय भाषेत 'फ्लेल चेस्ट' म्हणतात ही जीवघेणी अवस्था निर्माण झाली होती. या स्थितीत बरगड्यांचा एक भाग छातीच्या भिंतीपासून वेगळा होतो. त्यामुळे श्वास घेणे अत्यंत कठीण होते आणि श्वसन निकामी होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. त्यामुळे शस्त्रक्रिया करण्यापूर्वी रुग्णाची प्रकृती तातडीने स्थिर करणे आवश्यक होते. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागाच्या संचालिका डॉ. उर्वी शुक्ला म्हणाल्या, "गंभीर पॉलीट्रॉमा असलेल्या रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया हा उपचारांचा केवळ एक भाग असतो. शस्त्रक्रियेनंतरचा कालावधी तितकाच महत्त्वाचा असतो, विशेषतः फ्लेल चेस्ट आणि अनेक फ्रॅक्चर असलेल्या रुग्णांमध्ये तो महत्त्वाचा असतो. रुग्ण बरा व्हावा यासाठी श्वसन क्रियेला योग्य आधार देणे, संसर्ग रोखणे, पोषण व्यवस्थापन आणि सातत्याने निरीक्षण करणे यावर आमचा भर होता.

## बिलोली बस स्थानकात प्रवासी सुविधांसाठी शिवसेनेचं आगार प्रमुखांना निवेदन

बिलोली : (स. गांवकरी)

महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्याला जोडणारे महत्त्वाचे केंद्र असलेल्या बिलोली बस स्थानकात सध्या प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांना विविध असुविधांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, बिलोली बस स्थानकात तात्काळ विविध मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, या मागणीसाठी शिवसेना शिंदे गट बिलोली शहरप्रमुख लक्ष्मण शेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली बिलोली आगार व्यवस्थापकांना जाहीर निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधून घेत मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

बिलोली हे महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवर असल्यामुळे या स्थानकातून दोन्ही राज्यातील प्रवाशांची अहोरात्र मोठी वर्दळ असते. प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ होत असली, तरी त्या प्रमाणात बस स्थानकाचा विकास आणि सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकडे एसटी महामंडळाचे दुर्लक्ष होत असल्याचा सूर नागरिकांमधून उमटत आहे.



याकडे लक्ष वेधत, आगाराचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी हे निवेदन देण्यात आले असून या निवेदनात विविध मागण्या करण्यात आल्या आहेत ज्या मध्ये अहोरात्र सेवा बजावणाऱ्या चालक व वाहक यांच्यासाठी स्थानकात सुसज्ज विश्रांतीगृह उपलब्ध करून देणे. बिलोली आगाराच्या उत्पन्नात भरीव वाढ होण्यासाठी स्थानक परिसरात आधुनिक शॉपिंग सेंटर उभारण्यात यावे. राजमाता जिजाऊ' योजनेअंतर्गत प्रवाशांच्या सोयीसाठी तात्काळ जादा बसेस उपलब्ध करून देणे.पुर्वी सुरू असलेली आणि प्रवाशांसाठी अत्यंत सोयीची असलेली 'आदमापूर बससेवा' तात्काळ पूर्ववत सुरू करण्यात यावी. लांब पल्ल्याच्या प्रवाशांची उपासमार टाळण्यासाठी बस स्थानकात दर्जेदार कॅन्टीन सुरू करणे. उन्हाळा असो वा पावसाळा, प्रवाशांना पिण्यासाठी शुद्ध आणि थंड पाण्याची व्यवस्था तातडीने कार्यान्वित करणे. अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी शिवसेना शहरप्रमुख लक्ष्मण शंकरराव शेट्टीवार यांच्यासह माजी नगरसेवक विजय कुंचनवार आनंद गुडनलवार मुन्ना पोवाडे शामराव डोंगरे, चंद्रकांत कुडके, देवण्णा तोदरोड आदींसह स्थानिक नागरिक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवेदनाच्या प्रती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक राष्ट्रीय परिवहन महामंडळाचे कार्यकारी अभियंता छत्रपती संभाजीनगर, विभागीय नियंत्रक नांदेड विभाग आणि उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या स्विय सहाय्यकांना पाठवण्यात आल्या आहेत. आता यावर प्रशासन काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण बिलोलीकरांचे लक्ष लागले आहे.

> "बिलोली बस स्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. प्रवाशांकडून कर रूपाने उत्पन्न मिळत असताना त्यांना साध्या पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही या साटी प्रवाशांना भटकंती करावी लागत आहे. प्रशासनाने आम्ही मागणी केलेल्या या विविध मागण्यांची लोकहीतास्तव दखल घेऊन त्यासाटी तात्काळ निधी उपलब्ध करावा, अन्यथा याविरोधात तीव्र लोकआंदोलन उभे केले जाईल."
>
> **- लक्ष्मण शंकरराव शेट्टीवार (शहरप्रमुख, शिवसेना बिलोली)**



# थोडक्यात पण महत्वाचे




## शाहिर योगेश घाणेकर व सागर नावलेंचा कलगी-तुऱ्याचा जंगी सामना

■ हास्यवीर सचिन काळे यांची विशेष उपस्थिती

ठाणे (स. गांवकरी) : कोकणच्या समृद्ध लोकपरंपरेचे वैभव असलेली कलगी-तुरा (शक्ती-तुरा/जाखडी) ही पारंपरिक लोककला पुन्हा एकदा मुंबईकरांच्या भेटीला येत आहे. लोककलेचे जतन,संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत तिचा वारसा पोहोचविण्याच्या उद्देशाने श्री पाणबुडी देवी कलामंच, मुंबई यांच्या वतीने शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता मराठी साहित्य संघ मंदिर, गिरगाव, मुंबई येथे पारंपरिक कलगी-तुऱ्याचा भव्य सामना आयोजित करण्यात आला आहे. कलगीवाले शाहिर योगेश घाणेकर आणि तुरेवाले शाहिर सागर नावले यांच्यात शब्दांची, काव्याची, बुद्धिमत्तेची आणि लोकपरंपरेची रंगतदार जुगलबंदी अनुभवायला मिळणार आहे. ढोलकी, झांज आणि घुंगरूंच्या तालावर रंगणारे प्रश्नोत्तरांचे फड, तर्क-वितर्क, उत्स्फूर्त काव्यरचना आणि सामाजिक आशयाने परिपूर्ण सादरीकरण ही या कलेची खरी ओळख आहे. समाजप्रबोधन, अध्यात्म, लोकजीवन, विनोद आणि सांस्कृतिक परंपरेचा समृद्ध वारसा जपणारी ही कला म्हणून ओळखली जाते. बदलत्या काळात अनेक लोककला नामशेष होण्याच्या मार्गावर असताना त्यांचे जतन करण्यासाठी श्री पाणबुडी देवी कलामंच सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. या भव्य सांस्कृतिक सोहळ्यास लोककलावंतांचे आश्रयदाते दिनेश कुरतडकर यांचे विशेष सहकार्य लाभले असून नवोदित शाहिरांना व्यासपीठ उपलब्ध करून देत कलगी-तुऱ्याची परंपरा अधिक बळकट करण्याचा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. अधिक माहितीसाठी दीपक कारकर ९९३०५७५४५३ संपर्क साधावा.



## एसओजीची मोठी कारवाई : चिकटिया येथून ३४,७०० रुपयांचा गांजा जप्त

डांग,गुजरात (स. गांवकरी) : दक्षिण गुजरातला अमली पदार्थमुक्त करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या "NO DRUGS IN SOUTH GUJARAT" अभियानांतर्गत डांग जिल्हा एसओजी पथकाला मोठे यश मिळाले आहे. आहवा तालुक्यातील चिकटिया गावातून ३४,७०० रुपयांच्या मुद्देमालासह एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. डांग जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली एसओजीचे पीएसआय एम. जी. शेख यांच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चिकटिया गावातील पटेल फळिया येथे छापा टाकला. कारवाईदरम्यान संशयित व्यक्तीची झडती घेतली असता त्याच्याकडून ०.६९२ किलो सुका गांजा (किंमत ३४,६०० रुपये) तसेच रोख रक्कम असा मिळून एकूण ३४,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्या आरोपीची ओळख विकीभाई हरपतभाई पवार (वय २५), रा. चिकटिया पटेल फळिया, ता. आहवा, जि. डांग अशी झाली आहे. त्याच्याविरुद्ध वघई पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५, कलम ८ सी / २० बी ए , २९अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी बयरम टेलर (रा. सालेर, महाराष्ट्र) हा फरार असून त्याला वाँटेड घोषित करण्यात आले आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत. डांग पोलीस अमली पदार्थांचे सेवन, तस्करी आणि विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## आ. भीमराव केराम यांच्या पाठपुराव्याला यश



किनवट (स. गांवकरी) : किनवट–माहूर मतदारसंघातील भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत रब्बी पणन हंगाम २०२५–२६ अंतर्गत मका, ज्वारी, बाजरी व रागी या भरडधान्यांच्या शासकीय खरेदीस ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयासाठी आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा विभाग तसेच पणन मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. किनवट व माहूर तालुक्यात खरेदी प्रक्रिया उशिराने सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांना विहित मुदतीत धान्य विक्री करता आली नव्हती. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन आमदार केराम यांनी मुदतवाढीची मागणी केली होती. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर राज्य शासनाने १५ जुलै रोजी आदेश जारी करून भरडधान्य खरेदीची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढविली. त्यामुळे उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही हमीभावाने आपला माल विकण्याची संधी उपलब्ध झाली असून, या निर्णयाचे शेतकऱ्यांनी स्वागत करत शासन आणि आमदार भीमराव केराम यांचे आभार मानले आहेत.

## सुरोशे यांच्या उमेदवारीबाबत अनिश्चितता; १७ जुलैच्या सुनावणीकडे लक्ष



किनवट (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीसंदर्भातील राजू लक्ष्मणराव सुरोशे यांच्या उमेदवारीविरोधातील याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पुढील सुनावणी १७ जुलै रोजी निश्चित केली आहे. दरम्यान, संचालक पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत १६ जुलै असल्याने या प्रकरणामुळे सुरोशे यांच्या उमेदवारीबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. न्यायालयीन प्रक्रियेचा पुढील निवडणूक प्रक्रियेवर काय परिणाम होणार आणि संबंधितांकडून पुढे कोणती रणनीती आखली जाणार, याकडे सहकार व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# पालखी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

■ हरी आणि हर यांच्या ऐक्याचा संदेश देणारी व दहा दिवसांमध्ये पंढरपूरमध्ये पोहचणारी एकमेव दिंडी

नेवासा : (स. गांवकरी)



"हरि आणि हर"यांच्या ऐक्याचा संदेश देणाऱ्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या मध्यमेश्वर मंदिरातील मध्यमेश्वर भगवान पायी पालखी दिंडीचे श्री मध्यमेश्वर देवस्थानचे महंत बालयोगी श्री ऋषीनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी दि.१५ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले.सर्वात उशिरा निघणारी आणि दहा दिवसामध्ये पंढरपूरमध्ये पोहचणारी दिंडी म्हणून या दिंडीची ओळख आहे.

ब्रम्हलीन योगी मनोहरनाथ बाबा व वैकुंठवाशी हभप नासिकेत महाराज कोरेकर,कै. पंढरीनाथ हारदे गुरुजी यांच्या कृपा आशिर्वादाने निघालेल्या दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे.दिंडीच्या प्रस्थानाच्या पूर्वी महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज यांच्या हस्ते श्री मध्यमेश्वर शिवलिंगास व ब्रम्हलिन योगी श्री मनोहरनाथ बाबांच्या मूर्तीस वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात येऊन पूजन करण्यात आले. यावेळी दिंडीमध्ये चालक हरि भक्त परायण विजय महाराज पवार,गोपीनाथ महाराज कोरेकर,दिनकर महाराज हारदे,गणेश महाराज तनपुरे,शशिकांत महाराज कोरेकर,कैलास महाराज तनपूरे,सुभाष दळवी,बबनराव वाखुरे,सीताराम कोकणे, कैलास तनपूरे,डॉ. मुकुंद हारदे कचरू हेलाडे,राजू चव्हाण,अनिल तनपूरे यांच्यासह सुमारे तीनशे वारकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रसंगी बोलतांना दिंडीचे मार्गदर्शक महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज म्हणाले की ब्रम्हलिन गुरुवर्य श्री योगी मनोहरनाथ बाबांनी शैव व वैष्णव एक व्हावे म्हणून ही दिंडी सुरू केली आहे त्यामुळे हरि आणि हर यांची ऐक्य सांगणारी ही दिंडी समाजाला आदर्शवत संदेश देणारी आहे,व्हावे कल्याण सर्वांचे दुःखी कोणी असू नये ही भावना व्यक्त करत भरपूर पाऊस व्हावा बळीराजा सह सर्व सृष्टी सुखी व्हावी,विश्वात शांती नांदावी हीच प्रार्थना पांडुरंग परमात्म्याच्या चरणी करत त्यांनी दिंडीतील वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. मुंबादेवी मंदिर प्रांगणात दिंडीचे आगमन झाल्यावर महंत योगी बृहस्पतीनाथ महाराज,गोरक्षक संतोष पडूरे, मोहिनीराज सरगैये,विजय यादव व शिवाजीनगर भक्त परिवार व परिसरातील महिलांनी दिंडीतील पालखीचे पूजन करून दिंडीचे स्वागत केले.मध्यमेश्वर दिंडीच्या स्वागत प्रसंगी महिलांनी दारासमोर सडा रांगोळया घालून परिसर सुशोभित केला होता.यावेळी शिवाजीनगर व मध्यमेश्वरनगर परिसरातील भाविकांच्या वतीने दिंडीस अल्पोपहार देण्यात आला.

## अकरावीच्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयांमध्ये गुलाब पुष्प देऊन जंगी स्वागत

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या कला,वाणिज्य, विज्ञान व एमसीव्हीसी शाखे तील विद्यार्थ्यांचे महाविद्याल यामध्ये गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.या स्वागत समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाघमारे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामधून विद्यार्थ्यांनी जीवनामधील असणारे ध्येय आपण या महाविद्यालयांमधून शिक्षण घेऊन पूर्ण करण्याची प्रेरणा घ्यावी.त्यासाठी माझ्या महाविद्यालयातील सर्व प्रशासन व प्राध्यापक वर्ग आपल्याला सहकार्य करण्यासाठी कटीबद्ध आहे. स्वागत समारंभ कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा.समीर श्रीमंते यांनी केले.त्यांनी आपल्या प्रास्ताविकामधून विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने सर्वतोपरी मदत करण्याचे व मिळालेल्या संधीचे सोने करावे असे आव्हान विद्यार्थ्यां ना केले. याप्रसंगी प्रा.गणेश रोकडे,प्रा शिल्पा सोनवणे यांनी स्वागत पर माहिती दिली.संस्थेचे अध्यक्षॲड. संजय शिवाजीराव काळे यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही.बी.कुलकर्णी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी. वाघमारे, उपप्राचार्य डॉ.आर. डी.चौधरी,उपप्राचार्या व समन्वयक प्रा पी.एस. लोढा,एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा.के.जी.नेटके,तसेच इतर विभाग प्रमुख व प्राध्यापकांनी या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता औटी यांनी केले तर आभार प्रा. निलेश आमले यांनी केले.

## पोलीस भरती वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवावी तसेच MPSC परीक्षा ऑफलाईन घ्यावी

मुखेड : (स. गांवकरी)

राज्यातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या लाखो युवक-युवतीचा भविष्याचा प्रश्न गंभीर बनला असून, पोलीस शिपाई सरळसेवा भरतीची वयोमर्यादा सरसकट ५ वर्षांनी वाढवावी तसेच MPSC परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्यावी, अशी मागणी राजे छत्रपती अकॅडमी, मुखेडचे संचालक तथा सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील डूमणे यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन मुखेड-कंधार मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड साहेब यांना भेटून सादर केले. ाज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले असंख्य पोलीस भरती उमेदवार 22 जून पासून मुंबईच्या आझाद मैदानावर लाखो तरुण-तरुणी वयोमर्यादा वाढीसाठी उपाशीपोटी आंदोलन करत असून, ऊन-पाऊस सहन करत न्यायाच्या आशेने शासनाकडे पाहत आहेत. त्यांच्या संघर्षाची दखल घेऊन शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच एम पी एस सी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांनी विराट मोर्चा काढून शासनाचे लक्ष वेधले होते.ऑनलाइन परीक्षेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी व संगणक सुविधांच्या अभावाचा सामना करावा लागत असल्याने MPSC परीक्षा ऑफलाईन घेणे अधिक पारदर्शक व विद्यार्थीहिताचे ठरेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. राज्यातील १५ ते १७ लाखांहून अधिक युवक-युवती अनेक वर्षांपासून पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम घेत आहेत. मात्र विलंबामुळे हजारो उमेदवारांचे पोलीस दलात सेवा करण्याचे स्वप्न धोक्यात आले असून, ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील तरुणांसाठी पोलीस भरती ही केवळ नोकरी नसून कुटुंबाचे भविष्य बदलण्याची एक संधी आहे.

## बोगस सोयाबीन कंपन्यावर कारवाई करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

बिलोली: (स. गांवकरी)



सोयाबिनच्या विविध नामांकीत कंपन्यानी बाजारात विक्रीसाठी पुरवठा केलेले निकृष्ट दर्जाहीन बोगस बियाणे पेरणी केल्यामुळे बिलोली तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना मोठा जबर फटका बसला आसुन पेरलेले ते सोयाबीन बियाणे उगवलेच नसल्यामुळे अनेक शेतक-यावर दुबारा.. तिबारा पेरणीचे मोठे संकट उभारले आसुन शेतकऱ्यांची फसवणुक करणा-या त्या बोगस सोयाबीन कंपन्यावर कार्यवाही करावी व हवालदील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा अ.भा.भ्र.समितीच्या वतिने अंदोलन छेडण्यात येईल आशा ईशा-याचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तहसिलदार यांच्या मार्फत देण्यात आले आहे .

शेतक-यांना या ना त्या आशा विविध कारणामुळे सतत नैसर्गिक प्रकोपाचा अत्यंत गंभीर सामना करावा लागत आसताना दुस-या बाजुने बाजारात विविध जातीच्या बियाणे कंपन्याचा वाढलेला सुळसुळाट यावर संबंधीत यंत्रणेचे अंकुश नसल्या कारणाने बियाणे व रासायनिक खत तसेच विविध किटक नाशक औषधी कंपन्याकडुन मनमानी दर लादुन शेतकऱ्यांची अर्थिक लुट केली जात आहे. पिक उत्पादन वाढीच्या अपेक्षा बाळगुन घरातील दाग-दागिने विकुन, जमेल त्या पध्दतीने कर्ज काढून बाजारात उपलब्ध आसलेली नामांकीत कंपनीचे महागड्या दराची सोयाबीनची बियाणे व रासायनिक खते विकत घेऊन यंदाची खरीपाची कसीबशी शेतक-यांनी पेरणी केले. परंतु पेरलेले ते सोयाबीन बियाणे उगवलेच नसल्याने या निकृष्ट दर्जाच्या कमकुवत बोगस बियाणामुळे बिलोली तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मोठी फसवणुक झाली आसुन या बोगस बियाणामुळे शेतकऱ्यांवर दुबारा.. तिबारा पेरणीचे मोठे अर्थिक संकट ओढावले आसुन या संदर्भात तात्काळ चौकशी समितीची नेमणुक करून दरवर्षी बोगस बियाणे विक्री करुन शेतक-यांची वारंवार फसवणुक करणाऱ्या बोगस कंपन्यावर कडक कार्यवाही करावी व संबंधीत जबाबदार कृषी विभागाचे अधिकारी तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकावर कार्यवाही करावी. व त्या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अन्यथा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या वतीने दि.२१ जुलै २०२६ रोजी तालुका कृषी कार्यालय बिलोली समोर विविध मार्गाने अंदोलन करण्याचा ईशारा एका निवेदनाद्वारे तहसिलदार गजानन शिंदे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे समितीचे राष्ट्रीय सरचिटणीस राजु पाटील शिंपाळकर जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे, बाबुराव कदम,सय्यद रियाज,संभाजी नरवाडे,अनिल पा. नरवाडे, आत्माराम पाटिल, ईश्वर जाहुरे, परमेश्वर वाघमारे तुकाराम नरवाडे यानी दि. १४ जुलै रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे


## मोहनदरी शासकीय आश्रमशाळा प्रकरणात कारवाई

■ मुख्याध्यापक, शिक्षक व अधीक्षक निलंबित

■ प्रसारमाध्यमे, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

■ आदिवासी विकास विभागाची कठोर भूमिका

कळवण नाशिक : (स. गांवकरी)



कळवण तालुक्यातील मोहनदरी शासकीय आश्रमशाळेतील धक्कादायक घटनेनंतर अखेर आदिवासी विकास विभागाने मोठी आणि कठोर कारवाई करत संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक आणि अधीक्षक यांना निलंबित केले आहे. कळवण प्रकल्प अधिकारी डॉ.कशिमरा संखे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून* , या निर्णयामुळे संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची माहिती समोर आल्यानंतर प्रसारमाध्यमांनी सातत्याने वस्तुस्थिती मांडली, लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला जाब विचारला आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही तीव्र आवाज उठवत दोषींवर कारवाईची मागणी केली होती. वाढत्या जनक्षोभानंतर अखेर प्रशासनाला कठोर निर्णय घ्यावा लागला. विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेत नेमका निष्काळजीपणा कुठे झाला, नियमित तपासण्या आणि देखरेखीत त्रुटी का राहिल्या, तसेच जबाबदार अधिकारी वेळेत सतर्क का झाले नाहीत, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

निलंबन ही केवळ सुरुवात असून, या प्रकरणातील प्रत्येक दोषी व्यक्तीवर कायदेशीर आणि विभागीय पातळीवर कठोर कारवाई व्हावी यां प्रकरणाची माहिती समोर आल्यानंतर प्रसारमाध्यमांनी सातत्याने या घटनेचा पाठपुरावा केला. त्याचबरोबर कळवणच्या लोकप्रतिनिधींनीही प्रशासनाला जाब विचारत कठोर कारवाईची मागणी केली. माजी केंद्रीयमंत्री डॉ. भारतीताई पवार, कळवण-सुरगाणा मतदारसंघाचे आमदार नितीन भाऊ पवार, तसेच दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्कर भगरे सर यां सर्वांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाकडे योग्य कारवाईची मागणी केली. सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि नागरिकांनीही विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणत जबाबदारांवर अखेर कारवाई करावी लागली मोहनदरी आश्रमशाळा प्रकरणाने एक महत्त्वाचा संदेश दिला आहे—जेव्हा प्रसारमाध्यमे निर्भीडपणे प्रश्न उपस्थित करतात, सातत्याने पाठपुरावा करतात, तेव्हा प्रशासनालाही कारवाई करावीच लागते यां घटनेचं उत्तर उदाहरण .

## नेवासा फाटा, शेवगाव, पाथर्डी, अहिल्यानगर शटल बस सुरू करा : बाळासाहेब जोंधळे

नेवासा : (स. गांवकरी)



खेड्यापाडयातून येणाऱ्या प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता नेवासा येथून नेवासा फाटा,शेवगाव,पाथर्डी,अहिल्यानगर अशी शटल बस सुरू करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे कामगार नेते बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी केली आहे. दिलेल्या निवेदनात कामगार नेते बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी म्हटले आहे की नेवासा ते नेवासा फाटा हे ५ किलोमीटर अंतर आहे. या फाटा रस्त्याच्या दरम्यान नेवासा शहर प्रभागातील सेंट मेरीज इंग्लिश स्कूल परिसर अहिल्यानगर,संभाजीनगर, सावतानगर, ज्ञानेश्वर महाविद्यालय, नामदेवनगर, गायत्रीनगर, पावन गणपती मंदिर परिसर, गांधीनगर हा परिसर येतो याच परिसरातील रहिवाशांना शहरात किंवा फाट्याकडे जायचे असेल तर तासन तास थांब्यावर ताटकळत उभे राहण्याची वेळ येते.या ठिकठिकाणच्या भागातील नागरिकांचे व्यवहार नेवासाफाटा व नेवासा शहरात होत असल्याने दैनंदिन कामांसाठी शहरात किंवा नेवासा फाट्यावर यावे लागते. वृध्द नागरिकांना एसटी सवलत असल्याने ते सुद्धा बसची सतत प्रतिक्षा करत असतात. परंतु या नेवासा फाटा रस्त्यावर शटल बस नसल्याने लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल होतात व रस्त्यावर ही तास न तास बसावे लागते.एस टी सवलीतीचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना व्हावा म्हणून बंद पडलेल्या शेवगाव,पाथर्डी,अहिल्यानगर या शटल बस सेवा पूर्ववत सुरू कराव्यात यासाठी लवकरच शिष्टमंडळ शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व परिवहन मंत्र्यांना भेटणार असल्याचे बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी सांगितले.

# राजगुरुनगर नगरपरिषदेकडून नालेसफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू

**नागरिकांच्या तक्रारीनंतर प्रशासनाची तातडीने कारवाई**

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

राजगुरुनगर नगर परिषदेकडून शहरातील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली असून, विविध ठिकाणी जलप्रवाहातील अडथळे दूर करण्यात आले आहेत. नगरपरिषदेने तातडीने सुरू केलेल्या या नालेसफाई मोहिमेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले होते. जलनिस्सारण व्यवस्थेतील त्रुटींमुळे अनेक घरे व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. शहरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या प्राचीन हौद ओढ्यात जलप्रवाहाला अडथळे निर्माण झाल्याने पूरस्थिती निर्माण झाली होती. पुलावरून पाणी वाहू लागल्याने लगतच्या अनेक दुकानांमध्ये पाणी शिरून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या समस्येबाबत राजगुरुनगर नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या सूचनेनुसार स्वच्छता व आरोग्य सभापती सुप्रिया राहुल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेचा आरोग्य विभागाकडून शहरातील नालेसफाई मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील हौद ओढा तसेच केदारेश्वर बंधारा परिसरात वाहून आलेला राडारोडा, गाळ, झुडपे आणि इतर अडथळे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार असून, भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका कमी होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. मनुष्याच्या हस्तक्षेपामुळे तालुक्यातील अनेक भागात नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने पावसाळ्यात सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत आहे.नुकतेच झालेल्या पावसामुळे पुणे नाशिक महामार्गावरील वाकी परिसरातील सखल भागात पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचून काही काळ वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.नुकतेच झालेल्या मुसळधार पावसामुळे ही गंभीर बाब समोर आल्याने खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी पावसाळी अधिवेशन दरम्यान विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता.

महसूल अधिकारी मार्फत नकाशावर असलेल्या ओढे ,नाले यांचे मोजमाप करून जलप्रवाह रोखण्यात कारणीभूत असलेली अतिक्रमणे काढावीत.

**- आमदार ,बाबाजी काळे**

नगरपरिषदेत प्रशासकीय काळात अनेक समस्या कायम राहिले असून, नागरिकांच्या तक्रारीनंतर तातडीने समस्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत आहोत. जलप्रवाहाला अडथळा ठरणाऱ्या राडारोडा काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.नागरिकांना पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांवर तातडीने कारवाई करण्यात येईल

**- मंगेश गुंडाळ, नगराध्यक्ष , राजगुरुनगर नगरपरिषद**

जलप्रवाहातील अडथळ्यांमुळे येथील दुकानात पाणी येऊन मालाचे नुकसान होऊन, व्यवसायावर परिणाम होत होता. मात्र, यंदा नगरपरिषदेने तातडीने दखल घेऊन नालेसफाई व अडथळे दूर केल्याने पाण्याचा निचरा सुरळीत झाल्याने आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे."

**- स्थानिक व्यावसायिक, असिर शेख**

# आश्वासन नव्हे, शासन निर्णयच हवा!

■ अन्नत्याग आमरण उपोषणातून रिंग रोड बाधित शेतकऱ्यांचा सरकारला ठाम इशारा




नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली आजपासून नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली.शेकडो रिंग रोड बाधित शेतकरी या उपोषणात सहभागी झाले असून,शासनाने केवळ आश्वासने न देता अधिकृत शासन निर्णय (GR) अथवा लेखी शासन पत्रक काढून शेतकऱ्यांना न्याय द्यावा,अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे की,मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येतील,असे मंत्री,आमदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शेतकरी शिष्टमंडळाला सांगितले होते. मात्र त्यानंतर दुसऱ्याच दिवशी जिल्हा प्रशासनाकडून "रिंग रोडचे अलाइनमेंट बदलणार नाही,मोबदल्याच्या दरात कोणताही बदल होणार नाही, तातडीने जमीन खरेदीसाठी या, अन्यथा २५ टक्के अतिरिक्त मोबदल्याचाही लाभ मिळणार नाही,अशा प्रकारचे संदेश देण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.त्यामुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. उपोषणकर्त्यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यावर शेतकऱ्यांची दिशाभूल करून सक्तीने जमिनी संपादित करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे.त्यामुळे त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच आंदोलनादरम्यान शेतकरी महिलांच्या घरात घुसून लाठीमार केल्याचा आरोप असलेल्या प्रांताधिकारी पवन दत्ता यांना तात्काळ निलंबित करण्याचीही मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालय किंवा वर्षा निवासस्थानी रिंग रोड बाधित शेतकरी शिष्टमंडळासोबत थेट बैठक घेऊन सर्व मागण्यांवर अंतिम निर्णय घ्यावा आणि त्यासंदर्भातील अधिकृत जीआर किंवा शासन पत्रक तातडीने प्रसिद्ध करावे,अशी मागणी केली आहे. रिंग रोड प्रकल्पासंदर्भात शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये योग्य अलाइनमेंट निश्चित करणे,कोणत्याही शेतकऱ्याचे घर,विहीर, बोअरवेल वस्ती किंवा शेतीचे अनावश्यक नुकसान टाळणे, मागील तीन वर्षांच्या उच्चतम बाजारभावाचा आधार घेऊन योग्य मोबदला निश्चित करणे, तसेच विद्यमान गुणांक १ ऐवजी २ लागू करून न्याय्य भरपाई देणे,या मागण्यांचा समावेश आहे.विकासाला किंवा रिंग रोड प्रकल्पाला विरोध नसून,शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही अशा पद्धतीने प्रकल्पाची अंमलबजावणी व्हावी,अशी भूमिका शेतकऱ्यांनी स्पष्ट केली आहे.

उपोषणकर्त्यांनी सांगितले की, आतापर्यंत ना.गिरीश महाजन, ना.उदय सामंत,ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह अनेक मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सकारात्मक निर्णयाचे आश्वासन दिले. अनेक आंदोलने,मोर्चे,निवेदने आणि बैठका झाल्या;मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या एकाही प्रमुख मागणीची अंमलबजावणी झाली नाही. उलट गावोगावी संभ्रम निर्माण करून शेतकऱ्यांमध्ये मतभेद निर्माण करण्याचे काम प्रशासनाकडून होत असल्याचा आरोपही करण्यात आला. शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की,जोपर्यंत मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेऊन रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या सर्व मागण्यांवर अंतिम लेखी निर्णय होत नाही,तोपर्यंत अन्नत्याग आमरण उपोषण मागे घेतले जाणार नाही.आवश्यक असल्यास हे आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल,असा निर्धारही उपोषणकर्त्यांनी व्यक्त केला.

**या आंदोलनाला आज किसान सभेचे कॉम्रेड राजू देसले,ज्येष्ठ शेतकरी नेते नानासाहेब बच्छाव,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू खैरे,बाळासाहेब लांबे, शिवा तेलंग,नवनाथ शिंदे, सुभाष गायकर,आशिष हिरे, भारत पिंगळे,वैभव दळवी, ज्ञानेश्वर पालखेडे,डॉ.किरण डोखे, शुभम महाले यांच्यासह विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.**

"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे.त्यांनी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन आमच्या मागण्या समजून घ्याव्यात. विकासाला किंवा रिंग रोडला आमचा विरोध नाही.मात्र योग्य अलाइनमेंट,न्याय्य मोबदला आणि गुणांक 'एक्स' ऐवजी 'दोन' लागू करण्याबाबत सकारात्मक निर्णय व्हावा. आता आमचा कुठल्याही मंत्री किंवा अधिकाऱ्यांवर विश्वास उरलेला नाही.अंतिम विश्वास हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे.त्यांनी लवकरात लवकर बैठक घेऊन मार्ग काढावा,अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने हे आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल."

**— करण गायकर, संस्थापक अध्यक्ष,छावा क्रांतिवीर सेना,महाराष्ट्र राज्य**

## थोडक्यात पण महत्वाचे



### जिल्हा रुग्णालयाचा दिव्यांगास मदतीचा हात

नाशिक (स. गांवकरी) : शारीरिक आव्हाने असलेल्या दिव्यांग व्यक्तींना साधनांचा आधार घेतल्याशिवाय उभे राहता येत नाही अशा दिव्यांग व्यक्तीस नाशिक जिल्हा रुग्णालयाने मदतीचा हात देऊन त्याला उभे राहून चालण्यास बळ दिले आहे जिल्हा रुग्णालयात इर्शाद शेख नावाचा दिव्यांग युवक हा कुबड्या तुटल्याने काठीला फडके बांधून चालत होता ही बाब दिव्यांग विभागाचे अस्थिरोग तज्ञ डॉक्टर संजय कुटे यांच्या निदर्शनास आली त्यांनी तत्काळ इरशाद यास जिल्हा रुग्णालयाच्या वतीने मोफत दोन कुबड्या देऊन त्याला मदत केल्याने दिव्यांग संघटनांनी त्यांचे कौतुक केले आहे, डॉक्टर हा ही दिव्यांगांच्या प्रती संवेदनशील असतात हे या कृतीतून सिद्ध झाल्याने इर्शाद च्या चेह-यावर हास्य उमटले, या प्रसंगी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या समुपदेशक कविता जुनेजा दिव्यांग कल्याण संघटनेचे अध्यक्ष बबलु मिर्झा उपस्थित होते.

### 'ब्रिक १२ ऑन १२' प्रदर्शनाचे १७, १८ रोजी आयोजन

पुणे (स. गांवकरी) : सातिश मिसाळ एज्युकेशनल फाउंडेशनच्या (एसएमईएफ) ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे 'ब्रिक १२ ऑन १२' या वार्षिक प्रदर्शनाचे आठवे पर्व १७ व १८ जुलै रोजी सारथी सभागृह, भांडारकर रस्ता, शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. वास्तुकला व डिझाइन शिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प, माजी विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचा संगम या दोन दिवसीय कार्यक्रमात अनुभवायला मिळणार आहे. १७ जुलै रोजी दुपारी ३.३० ते रात्री ८ या वेळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रकल्पांचे सादरीकरण होणार असून, त्यानंतर ब्रिक वार्षिक प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. १८ जुलै रोजी माजी विद्यार्थ्यांची सादरीकरणे, समकालीन डिझाइन क्षेत्रावरील परिसंवाद आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्यातीप्राप्त वास्तुविशारद आर्किटेक्ट अजय सोनार यांचे प्रमुख व्याख्यान होणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रकल्पांचे प्रदर्शन दोन्ही दिवस सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. 'एसएमईएफ'च्या अध्यक्षा माधुरीताई मिसाळ, संस्थापक संचालक डॉ. पूजा मिसाळ आणि प्राचार्या डॉ. पूर्वा केसकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर राजीव विश्वासराव अँड असोसिएट्सचे संस्थापक आर्किटेक्ट राजीव विश्वासराव यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. वास्तुकला आणि डिझाइन शिक्षणाचे स्वरूप, त्यातील करिअरच्या संधी आणि बांधकाम क्षेत्रातील वाढते महत्त्व याची माहिती विद्यार्थी, पालक आणि व्यावसायिकांना या उपक्रमातून मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### टाटा मोटर्स-युको बँक यांचा सामंजस्य करार; कर्ज मिळणार अधिक सुलभ



मुंबई (स. गांवकरी) : भारतातील सर्वात मोठी व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनी टाटा मोटर्स आणि सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीची युको बँक यांनी देशातील व्यावसायिक वाहनांसाठी कर्जपुरवठा अधिक सुलभ आणि परवडणारा करण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या करारामुळे देशभरातील ग्राहक, उद्योजक आणि फ्लीट ऑपरेटर यांना आकर्षक व्याजदरात, जलद मंजुरीसह आणि सुलभ प्रक्रियेत वाहन कर्ज उपलब्ध होणार आहे. या सहकार्यामुळे युको बँकेचे व्यापक शाखा जाळे आणि टाटा मोटर्सचा सर्वसमावेशक व्यावसायिक वाहन पोर्टफोलिओ यांचा लाभ ग्राहकांना मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील ग्राहकांपर्यंत संघटित वित्तीय सेवा पोहोचवण्यावर दोन्ही संस्थांचा भर राहणार आहे. करारानुसार वाहन खरेदीसाठी स्पर्धात्मक व्याजदर, जलद कर्ज मंजुरी, कमी कागदपत्रे, उच्च कर्ज-मूल्य (लोन-टू-व्हॅल्यू) सुविधा आणि व्यवसायाच्या गरजेनुसार परतफेडीचे लवचिक पर्याय उपलब्ध करून दिले जाणार आहेत. त्यामुळे वाहन खरेदीसाठी लागणारे प्रारंभिक भांडवल कमी होण्यास मदत होईल. युको बँकेचे जनरल मॅनेजर आणि मुंबई विभागप्रमुख शशिकांत कुमार यांनी सांगितले की, टाटा मोटर्ससोबतचा हा करार ग्राहक-केंद्रित वित्तीय सेवा अधिक मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. या माध्यमातून उद्योजक, फ्लीट ऑपरेटर आणि उद्योगांना वेळेवर व स्पर्धात्मक कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. टाटा मोटर्सच्या ट्रक्स विभागाचे उपाध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख राजेश कौल यांनी सांगितले की, संघटित आणि सहज उपलब्ध होणारे वाहन कर्ज हे ग्राहकांच्या व्यवसायवृद्धीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. युको बँकेच्या देशव्यापी उपस्थितीमुळे अधिकाधिक ग्राहकांपर्यंत या सुविधा पोहोचवता येतील.

## रविवारी 'दिग्गजांच्या मुलाखती' कार्यक्रमाचे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)



प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या संकल्पनेतून 'दिग्गजांच्या मुलाखती' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. येत्या रविवारी (ता. १९ जुलै) सायंकाळी ५ ते ९ या वेळेत श्री गणेश सभागृह, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमात राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह व ज्येष्ठ आयुर्वेद अभ्यासक वैद्य प्रवीण जोशी यांच्याशी संवाद साधण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. आयुर्वेदातील संशोधन, शिक्षण आणि नवोन्मेष यांचा संगम घडवून आणणाऱ्या वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या विविध उपक्रमांनी यंदा अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले आहेत. भारतातील पहिल्या आयुर्वेदिक केश-त्वचा परीक्षण प्रयोगशाळा व संशोधन केंद्र केशायुर्वेद व कायायुर्वेदच्याच्या यशस्वी वाटचालीचा कार्यपूर्तीचा सोहळा, तसेच प्राचीन संहिता गुरुकुलच्या शंभर यशस्वी बॅचेस पूर्ण झाल्याचा अभिमानास्पद क्षण, या सर्वांचा एकत्रित उत्सव म्हणून 'दिग्गजांच्या मुलाखती' या वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांनी आयुर्वेद क्षेत्रात निदान, संशोधन, उपचार आणि शिक्षण या चारही स्तरांवर सातत्याने कार्य केले आहे. केश व त्वचा विकारांच्या आयुर्वेदाधिष्ठित निदानासाठी विकसित करण्यात आलेल्या प्रयोगशाळा, तसेच हजारो विद्यार्थ्यांना व्यावहारिक आयुर्वेदाचे प्रशिक्षण देणारे प्राचीन संहिता गुरुकुल, या उपक्रमांमुळे राज्यासह देशभरातील विद्यार्थी, वैद्यकीय व्यावसायिक आणि रुग्णांमध्ये वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

## 'एआय'ला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन बनवा

### विवेक सावंत यांचे प्रतिपादन; पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव उत्साहात

पुणे : (स. गांवकरी)



"आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) आहे. एआयला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन म्हणून स्वीकारा. तंत्रज्ञान नोकऱ्या संपवत नाही, तर नव्या प्रकारच्या रोजगारसंधी निर्माण करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि करिअरच्या नव्या वाटांचा शोध घेत कौशल्याधारित शिक्षण आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा," असे प्रतिपादन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल)चे संस्थापक-संचालक विवेक सावंत यांनी केले.

पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सवी २५ व्या वर्धापनदिवस सोहळ्यात सावंत बोलत होते. कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात आयोजित सोहळ्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, खजिनदार कृष्णाजी कुलकर्णी, संस्थेचे संचालक सुनील रेडेकर, पौर्णिमा लिखिते, रमेश कुलकर्णी, राजेंद्र कडूसकर, महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य प्रा. रेखा जोशी, प्रा. स्वाती जोशी आदी उपस्थित होते.

विवेक सावंत म्हणाले, "मानवी बुद्धी ही 'यूज इट ऑर लूज इट' या तत्त्वावर कार्य करते. त्यामुळे साचेबंद विचारांमध्ये अडकून न राहता समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि कौशल्ये विकसित करा. यंत्रांसारखे काम करू नका; एआयचा वापर स्वतःची विचारशक्ती अधिक सक्षम करण्यासाठी करा. शिक्षण आणि रोजगार क्षेत्रातील हा संक्रमणाचा काळ आहे. सामाजिक माध्यमांचा अनावश्यक वापर कमी करून मेहनत, संयम, टीम स्पिरिट आणि सॉफ्ट स्किल्स विकसित करा. कौशल्याधारित, उद्योगाभिमुख आणि तंत्रज्ञानस्नेही शिक्षणामुळे भविष्यातील रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतील. समाजासाठी उपयुक्त आणि उत्पादक ज्ञान मिळविण्यावर भर द्या."

डॉ. पराग काळकर म्हणाले, "शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल होत असून पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबरच तंत्रज्ञानयुक्त, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज वाढली आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे ज्ञानाचे कृतीत रूपांतर करण्यावर भर दिला जात आहे. शिक्षणसंस्थांनी पदवी आणि उद्योगातील अनुभव यांचा प्रभावी मेळ घालून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला पाहिजे. नव्या व्यवस्थेच्या गरजा ओळखून सक्षम, कुशल आणि उद्योगस्नेही मनुष्यबळ तयार करणे ही काळाची गरज असून, शिक्षणसंस्थांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा."

## क्युरेटेड लिव्हिंग सोल्युशन्स तर्फे पुण्यात ₹200 कोटींच्या हॉस्पिटॅलिटी क्षेत्रावर आधारित मिश्र-वापर प्रकल्पाची घोषणा

पुणे : (स. गांवकरी)




दिव्यास्री समूहाची कंपनी आणि भारतातील आघाडीच्या व्यवस्थापित निवासी प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या क्युरेटेड लिव्हिंग सोल्युशन्सने (सीएलएस) पुण्यातील आपल्या पहिल्या हॉस्पिटॅलिटी-आधारित मिश्र-वापर प्रकल्पाची घोषणा केली आहे. या घोषणेसह कंपनीने हॉस्पिटॅलिटी क्षेत्रावर आधारित रिअल इस्टेट क्षेत्रात धोरणात्मक प्रवेश केला आहे. ₹200 कोटींच्या या प्रकल्पामध्ये 200 खोल्यांचे हॉस्पिटॅलिटी प्रकल्प, प्रीमियम रिटेल स्पेसेस आणि ब्रँडेड रेसिडेन्सेसचा समावेश असून पूर्व पुण्यातील कोरेगाव पार्क अॅनेक्स परिसरात हा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.

सीएलएस आणि दोन दशकांहून अधिक अनुभव असलेल्या पुण्यातील अरिस्टा डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. अलिव्हा हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स तर्फे दीर्घकालीन मास्टर लीज कराराअंतर्गत या प्रकल्पाचे व्यावसायिक व्यवस्थापन करण्यात येणार आहे. बालेवाडी येथे 'कोडनेम EMI' प्रकल्पाच्या यशस्वी लॉंचनंतर CLSच्या विस्तार धोरणातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा असून, पुण्यातील विकसित होत असलेल्या रिअल इस्टेट बाजारपेठेतील कंपनीची उपस्थिती यामुळे अधिक मजबूत होणार आहे. बालेवाडी येथे 'कोडनेम ईएमआय' प्रकल्पाच्या यशस्वी लॉंचनंतर सीएलएसच्या विस्तार धोरणातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा असून, पुण्यातील विकसित होत असलेल्या रिअल इस्टेट बाजारपेठेतील कंपनीची उपस्थिती यामुळे अधिक मजबूत होणार आहे. पूर्व पुण्यातील कोरेगाव पार्कलगत मुंढवा येथे हा प्रकल्प विकसित करण्यात येत असून खराडी, मगरपट्टा सिटी, हडपसर, कल्याणी नगर, विमान नगर, ईओएन आयटी पार्क, वर्ल्ड ट्रेड सेंटर, पुणे आणि पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाशी या प्रकल्पाची उत्तम जोडणी आहे. व्यवसायानिमित्त प्रवास करणारे, सल्लागार, परदेशी व्यावसायिक आणि दीर्घकाळ मुक्काम करणारे कॉर्पोरेट पाहुणे यांची शहरातील वाढती संख्या लक्षात घेऊन या प्रकल्पाची रचना करण्यात आली आहे. हॉस्पिटॅलिटी सुविधा, रिटेल स्पेसेस आणि ब्रँडेड रेसिडेन्सेस यांचा समावेश असलेली व्यावसायिक व्यवस्थापनाखालील मिश्र-वापर परिसंस्था या प्रकल्पात उभारण्यात येत आहे.

या प्रकल्पाच्या लॉंचसोबतच सीएलएसने 'हॉस्पिटॅलिटी इन्व्हेस्टमेंट प्लॅन' (एचआयपी) ही अभिनव गुंतवणूक संकल्पनाही सादर केली आहे. व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापित हॉस्पिटॅलिटी मालमत्तांमध्ये गुंतवणूक अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने ही कंपनीची स्वतंत्र गुंतवणूक चौकट विकसित करण्यात आली आहे. एचआयपी मॉडेलनुसार गुंतवणूकदार संबंधित हॉस्पिटॅलिटी युनिट्सचे मालक असतील; तर हॉटेलचे दैनंदिन व्यवस्थापन, पाहुण्यांना सेवा, उत्पन्नाचे व्यवस्थापन, देखभाल आणि ब्रँडचे संचालन अलिव्हा हॉटेल्स अँड रिसॉर्ट्सतर्फे करण्यात येणार आहे.

## एसआयआर कार्यक्रमांतर्गत सर्व पात्र मतदारांनी गणना पत्रक भरून द्यावेत

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR-2026) कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्ह्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या माध्यमातून Enumeration Form (EF) चे घरपोच वितरण, संकलन व डिजिटायझेशन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र मतदाराने आपले नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्यासाठी ईएफ (EF) फॉर्म भरून संबंधित बीएलओकडे जमा करणे अनिवार्य आहे. ईएफ फॉर्म भरून जमा न करणाऱ्या मतदारांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत गणनापत्रक भरून निवडणूक विभागास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. ज्या मतदारांची नावे Mapped, Unmapped व Anomalies या प्रवर्गामध्ये आहेत, त्या सर्व मतदारांनीदेखील ईएफ फॉर्म भरणे आवश्यक आहे. Anomalies प्रवर्गातील मतदारांनी ईएफ फॉर्म भरून दिल्यास त्यांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केले जाईल. त्यानंतर दावा व हरकतीच्या कालावधीत सुनावणीदरम्यान भारत निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या 11 प्रकारच्या पुराव्यांपैकी आवश्यक पुरावे सादर केल्यानंतर पात्र मतदारांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात येईल. एसआयआर-२०२६ मोहिमेला अधिक गती देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी स्वतः विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये क्षेत्रीय भेटी देऊन ईएफ फॉर्मचे वितरण, संकलन व डिजिटायझेशनच्या कामाचा आढावा घेत आहेत. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन कामाची गती वाढविण्यावर भर देत आहेत.

# एआय तंत्रज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक वापर करण्यावर भर

## निपुण भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजनबद्ध काम करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



निपुण भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे आणि परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स (PGI) मध्ये नांदेड जिल्ह्याला राज्यात अग्रस्थानी आणण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. बदलत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा शिक्षण प्रक्रियेत प्रभावी वापर करून शिक्षक व विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनविण्यावर भर द्यावा असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे १४ जुलै रोजी शिक्षण विभागाच्या निपुण भारत अभियानाच्या आढावा बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) चे प्राचार्य अमोल निळेकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, डायटचे अधिव्याख्याते, जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी केले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने अधिव्याख्याता शिवाजी साखरे यांनी 'निपुण भारत' विषयावर सादरीकरण केले. तसेच शाळा भेटी व परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स (PGI) संदर्भात ज्येष्ठ अधिव्याख्याता बालाजी शेळके आणि अधिव्याख्याता डॉ. किरण रापतवार यांनी सादरीकरण केले.

मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी तंत्रज्ञानाधारित अध्यापनावर भर देण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंपूर्ण बनविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी शिक्षण विभागाला दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचे आवाहन केले. तसेच शिक्षकांच्या गरजांनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला सूचना दिल्या. विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी निपुण भारत अभियानातील उद्दिष्टपूर्तीसाठी तसेच पीजीआयमधील सर्व मानके व उपमानकांमध्ये अपेक्षित गुणप्राप्तीसाठी शाळांनी नियोजनपूर्वक काम करण्याचे मार्गदर्शन केले. बैठकीचे सूत्रसंचालन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्रीकांत थगनारे यांनी मानले.




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 गुरुवार दि. १६ जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २१६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# वकील संघाच्या निवडणुकीत जहालमतवादी वकील विजयी !

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव वकील संघाच्या आज मोठया उत्साहात संपन्न झालेल्या निवडणुकीत ड.दिलीप चिंतामणी लासुरे हे २०४ पैकी ९६ मते घेऊन विजयी झाले आहे तर दुसऱ्या क्रमांकाची ६२ मते अॅड.रशीद जिलानी शेख यांनी मिळवली असल्याचे उघड झाले आहे. तर महिला उपाध्यक्ष पदांची निवडणूक अॅड.करुणा सुधीर सोनवणे यांनी १२८ मते मिळवून जिंकली आहे.तर त्यांच्या प्रतिस्पर्धी वकील मंजिरी गौतम जोशी यांना ७४ मते मिळवली असल्याचे निवडणूक मुख्य निवडणूक अधिकारी अॅड.एस.एम.गुजर यांनी जाहीर केले आहे.वकिलांनी या निकालाचे जोरदार स्वागत केले आहे.नवीन पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





**कोपराव वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड.दिलीप लासुरे या जहाल मतवादी वकिलांनी मैदान मारले आहे.ते विद्यमान आ.आशुतोष काळे यांचे कट्टर विरोधक आणि त्यांचेच माहेगाव देशमुख येथील रहिवासी आहे.ते आपल्या स्पष्ट वक्तेपणासाठी ओळखले जातात.त्यांनी यापूर्वी आपल्या स्वाभिमानी बाण्यामुळे नोकरीवर लाथ मारून वकील व्यवसायात प्रवेश केला आहे. तर कर्मवीर काळे सहकारी साखर कारखाना निवडणूक त्यांच्या सहकाऱ्यांनी शेपूट गुंडाळले असतानाही स्वबळावर लढवून उच्चांकी मते मिळवून प्रस्थापितांना घाम फोडला होता.तर कृषि उत्पन्न बाजार समितीत आपले नशीब आजमावले होते.त्यांनी शेतकरी संघटनेंत काही काळ काम केले आहे.सामाजिक कार्यात यांचे नेहमी योगदान राहिले आहे.त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

कोपरगाव वकील संघ राज्यात प्रसिद्ध असल्याचे मानले जाते.येथील वकिलांनी अनेक खटले गाजवले आहे.त्यामुळे या निवडणुकीकडे अहिल्यानगरसह रहायचे लक्ष लागून राहत असते.गतवर्षी कोपरगांव वकिल संघ निवडणूकीत नामनिर्देशन मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेकांनी आपल्या तलवारी म्यान केल्याने यात अध्यक्ष पदासाठी अॅड.शरद गुजर यांची बिनविरोध निवड झाली होती.तर यावेळी चौरंगी सामना रंगला आहे.त्यात या पदासाठी अँड.दिलीप लासुरे यांचेसह अनुप ठोळे,अँड.रशीद शेख,अँड. रत्नप्रभा भोंगळे आदी चार जण आपले नशीब आजमावत होते.तर महिला उपाध्यक्ष पदासाठी उमेदवार अँड. करुणा सुधीर सोनावणे व अँड.मंजिरी गौतम जोशी यांनी मैदानात उतरवून एकमेकांना आव्हान दिले होते.त्याचा निकाल आज सायंकाळी ०५ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी ड.शरद गुजर यांनी जाहीर केला आहे.त्यात वकील संघाच्या अध्यक्ष पदी ड.दिलीप लासुरे यांनी मैदान मारले आहे.तर दुसऱ्या स्थानी ड.रशीद जिलानी यांनी आपले स्थान राखले आहे.तर महिला अध्यक्ष पदासाठी अॅड.करुणा सोनवणे यांनी आपला झेंडा फडकवला आहे.दरम्यान या उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत दोन मत पत्रिका शिक्का नसल्याने बाद झाल्या आहे.या निवडणुकीत एकूण २१८ मतदार होते.पैकी २०४ जणांनी आपला मतदानाचा अधिकार बजावला असल्याचे उघड झाले आहे.तर अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत अॅड.अनुप ठोळे यांना ४१ मतांची बिदागी मिळाली आहे तर ड.रत्नप्रभा भोंगळे यांना केवळ ०५ मतांवर समाधान मानावे लागले आहे.मतदार माघार घेण्याचे दिवशी उपाध्यक्ष पदासाठी उमेदवार अँड.निलेश रामभाऊ कातकडे यांचा एकमेव अर्ज शिल्लक राहिल्याने त्यांची निवड बिनविरोध झाली असून तीच बाब सचिव पदासाठी उमेदवार अँड. दिपक जाधव यांचे बाबतीत घडली आहे.याशिवाय सह-सचिव पदासाठी उमेदवार म्हणून अँड.प्रशांत जयवंत मोकळ यांनी तर खजिनदार पदासाठी उमेदवार अँड.राहुल राजाराम वाकचौरे यांनी यापूर्वीच मैदान मारले आहे.त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दरम्यान या निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ड.एस.एम. गुजर यांनी काम पाहिले आहे तर त्यांना सहायक निवडणूक अधिकारी ड.परेश डागा यांनी सहाय्य केले आहे.

# पुनरीक्षण मोहीम : १०० टक्के डिजीटायजेशन केले पूर्ण

## उत्कृष्ट दोन बीएलओंचा केला सत्कार



**राहुरी/प्रसाद मैड (समर्थ गांवकरी)**

भारत निवडणूक आयोगाच्या दि. १४ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत २९ जून २०२६ पासून गणनापत्रक वाटप व डिजीटायझेशनचे काम सुरू झालेले आहे. २२३ राहुरी विधानसभा मतदार संघात एकूण ०३ लाख २९ हजार ८९३ एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदार संख्या सर्व मतदारांना गणना पत्रक देऊन त्यांच्या माहितीचे डिजीटायझेशन दिलेल्या मुदतीत करणे बंधनकारक आहे.

२२३ राहुरी विधानसभा मतदार संघात विशेष कॅम्प घेण्यात आले. मंगळवारी २२३ राहुरी विधानसभा मतदार संघात एकूण १ लाख १५ हजार ९४१ मतदारांचे डिजीटायजेशन करण्यात आले, ही टक्केवारी ३५.१५ टक्के इतकी आहे. २२३ राहुरी विधानसभा मतदार संघातील १०० टक्के डिजीटायजेशन झालेले आहे अशा पहिल्या दोन बीएलओंना जिल्हाधिकारी डॉ पकंज आशिया यांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले. यात श्री. लाजरास अण्णा कासोटे, श्री. संतोष राधाकिसन अल्हाट, यांचा समावेश आहे.

तर कामचुकार कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

काही बीएलओचे डिजीटायजेशनचे प्रमाण खूप कमी आहे. अशा बीएलओच्या कामात प्रगती दिसून न आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला आहे. एसआयअर संबधीत काही अडचणी आल्यास नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदारांनी आपला सर्व तपशील अचूक भरून बीएलओ यांचेकडे तत्काळ दयावा, असे आवाहने जिल्हाधिकारी डॉ पकंज आशिया यांनी केले आहे.

# अहिल्यानगरसह 'या' जिल्ह्यांना मोठा इशारा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

राज्यातील अनेक भागांत आज पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, हवामान विभागाने काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

आज कोकणातील ठाणे, रायगड, मध्य महाराष्ट्रातील नाशिक घाटमाथा, अहिल्यानगर, पुणे घाटमाथा तसेच मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

तसेच ठाणे, मुंबई, नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, पुणे, सातारा घाटमाथा, बीड, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांतील तुरळक ठिकाणीही विजांसह पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

राज्यातील इतर भागांत हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असली, तरी उष्णतेचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# पत्रकारितेतील निर्भीड आवाजाला मोठी जबाबदारी

## अनिल कोळसे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या उत्तर नगर जिल्हाध्यक्ष (अहिल्यानगर) या महत्त्वपूर्ण पदावर पत्रकार अनिल कोळसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी व राज्य संघटक संजय भोकरे यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला असून, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अधिकृत पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली.


पत्रकारिता क्षेत्रात गेली २० ते २२ वर्षे कार्यरत असलेले अनिल कोळसे हे निर्भीड, परखड आणि सामाजिक भान जपणारे पत्रकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत पत्रकारितेची जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे. त्यांचे स्वतःचे 'सार्वमंथन' हे दैनिक असून, त्यांची शासकीय यादीवर असलेली स्वतःची स्वराज प्रिंटिंग प्रेसही कार्यरत आहे. त्यामुळे पत्रकारिता आणि व्यवस्थापन या दोन्ही क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सामाजिक कार्यातही अनिल कोळसे यांचा सक्रिय सहभाग राहिला असून, पत्रकारांच्या विविध समस्यांवर त्यांनी अनेक ठिकाणी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांच्यावर अहिल्यानगर जिल्ह्याची धुरा सोपवली आहे. संघटनेच्या ध्येय-धोरणांच्या अधीन राहून जिल्ह्यात संघटना अधिक बळकट करण्यासाठी ते प्रभावी काम करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

अनिल कोळसे यांच्या या निवडीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पत्रकार क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'सीईटीए' करारामुळे शेतकरी, उद्योजक आणि एमएसएमईंना नवी गती : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**



भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील 'सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार' आणि ऐतिहासिक 'सामाजिक सुरक्षा करार' बुधवारी अधिकृतपणे लागू झाले आहेत. या निर्णयाचे स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याला भारत-यूके भागीदारीतील एक महत्त्वाची घटना असल्याचे म्हटले आहे. हे दोन करार उच्च-स्तरीय राजनैतिक महत्त्वाकांक्षांना प्रत्यक्ष संधींमध्ये रूपांतरित करतील, विशेषतः भारताच्या कृषी क्षेत्रासाठी आणि लघु उद्योगांसाठी, असे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले.

पंतप्रधान मोदींनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, या करारामुळे आर्थिक संबंध अधिक दृढ होतील. सीईटीए करारामुळे आमच्या शेतकऱ्यांना, उद्योजकांना आणि एमएसएमईंना नवी गती मिळेल. अनेक क्षेत्रांना यूकेच्या बाजारपेठेत अधिक चांगली पोहोच मिळेल. तसेच, तंत्रज्ञान, व्यावसायिक सेवा आणि नवनिर्मितीमधील सहकार्य अधिक खोलवर जाईल आणि कुशल भारतीय प्रतिभेच्या गतिशीलता वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान पुढे म्हणाले, सामाजिक सुरक्षा करारामुळे यूकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या भारतीय व्यावसायिकांना अमूल्य आधार मिळेल आणि भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल. हा क्षण आपल्या लोकशाही देशांमधील परस्पर विश्वास आणि व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक व नवनिर्मितीद्वारे चालणारी भविष्याभिमुख भागीदारी निर्माण करण्याचा आमचा संकल्प दर्शवतो. भारत आणि यूके सामायिक समृद्धीसाठी एकत्रितपणे काम करणे सुरू ठेवतील.




# महात्मा फुले कृषी विद्यापीठातील पद भरती प्रक्रिया लवकरच ; मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या २०२५ मध्ये करण्यात आलेली पद भरती प्रक्रिया वेगात पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. मंत्रालयात मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राहुरी कृषी विद्यापीठाशी संबंधित विषयांबाबत बैठक झाली.



या बैठकीस कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार प्राजक्त तनपुरे, कृषी सचिव परिमल सिंह, उपसचिव प्रतीक्षा पाटील, वित्त आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राहुरी येथील कृषी विद्यापीठाचे रजिस्ट्रार राजेंद्र पाटील आणि कुलगुरू डॉ. विलास खर्चे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, महात्मा फुले कृषी विद्यापीठा मधील प्रकल्पग्रस्त प्रतीक्षा यादीतील प्रकल्पग्रस्त कर्मचार्यांना नियुक्त करण्यात आले होते. १ नोव्हेंबर २००५ नंतर शासन सेवेत सामावून घेतले घेतल्यामुळे जुनी पेन्शन लागू झाली नाही, त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल असे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. यावेळी २०२५ मध्ये वर्ग क आणि वर्ग ड मधील पद भरती प्रक्रियेमध्ये आरक्षण पदांवरील नियुक्ती , ई डब्ल्यू एस व एस सी बी सी प्रवर्गातील पदांवरील उम `दवारांची नियुक्तीबाबत बैठकीत प्रामुख्याने चर्चा झाली.

कृषिमंत्री श्री भरणे म्हणाले, विद्यापीठाच्या वर्ग क आणि ड वर्गातील मधील रिक्त पदांसाठी २०२५ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. क वर्ग यादृष्टीने विद्यापीठ प्रशासनाने कार्यवाही करताना गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे, निवड आणि प्रतीक्षा यादीची प्रक्रिया केली जावी असे कृषिमंत्री यांनी यावेळी सांगितले. २००५ नंतर नियुक्त प्रकल्पग्रस्त कर्मचार्यांच्या पेन्शन मागणी बाबत सकारात्मक असून याबाबत सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाकडे कार्यवाही साठी पाठवण्यात यावा, अशी सूचना यावेळी दिली. २०२५ च्या भरती प्रक्रियेमधील वर्ग ड पदांसाठी शासन नियमानुसार निवड प्रक्रिया राबवून १४३ पदांवर नियुक्ती देण्यात आली. परंतु वर्ग क पदांमधील भरती प्रक्रियेसाठी नियमानुसार परीक्षा आयोजित करून उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे. तसेच यातील निवड यादी व प्रतीक्षा यादी अंतिम होणे बाकी आहे, असे बैठकीत यावेळी सांगण्यात आले.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य योजना : उच्च शिक्षणाच्या दिशेने आर्थिक बळ

उच्च शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र अनेक गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षण घेण्यास असम र्थ ठरतात. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या माध्यमातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे ही योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे.

या योजनेचा नझत्रख्रड संकेतांक २२२५-०११२ असून ही योजना दि. १ एप्रिल २०२६ ते दि. ३१ मार्च २०२७ या कालावधीत ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील पाच तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे. जिल्हास्तर तसेच पंचायत समिती स्तरावर समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे ही योजना अंमलात आणत आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश मागासवर्गीय समाजातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा आहे. आर्थिक मदतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व बौद्धिक विकास घडवून त्यांना स्वावलंबी बनविण्यास हातभार लावणे, हे या योजनेचे प्रमुख ध्येय आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. लाभार्थी विद्यार्थी हा अनुसूचित जाती (डउ), अनुसूचित जमाती (ड्ढ) किंवा विमुक्त जाती-भटक्या जमाती (तग/छ्ढ) या प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

तसेच विद्यार्थी इयत्ता बारावी उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षणासाठी प्रवेशित असावा. त्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे नाव दारिद्र्यरेषेखालील (BPL) यादीत असल्यास त्याचा दाखला किंवा वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपर्यंत असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे उत्पन्न प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

याशिवाय विद्यार्थ्याचे आधार कार्ड, वैयक्तिक बँक पासबुक आणि रेशन कार्डाच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडाव्या लागतील. अर्ज ग्रामपंचायत किंवा पंचायत समितीच्या शिफारशीसह समाज कल्याण विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्याचा अधिकार समाज कल्याण समिती किंवा ठराव समितीला राहणार आहे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज किंवा अपूर्ण कागदपत्रांसह सादर केलेल्या अर्जांचा मंजुरीसाठी विचार केला जाणार नाही.

योजनेअंतर्गत गटस्तरावरून प्रस्ताव मागवून पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या स्वरूपानुसार पुढीलप्रमाणे आर्थिक सहाय्य दिले जाते.

अ) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे (एकवेळ) या योजने अंतर्गत

इयत्ता १२ वी नंतर बी.ए. पर्यंतच्या शिक्षणासाठी प्रति विद्यार्थी ₹१०,०००

व्यावसायिक (कोर्स) व इतर शिक्षणासाठी प्रति विद्यार्थी ₹२०,०००

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी प्रति विद्यार्थी ₹४०,०००

वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रति विद्यार्थी ₹४५,०००

ब) इयत्ता ११ वी व १२ वी तील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चक-उएढ एपसळपशशीळपस/ गएए/ छएएढ च्या प्रशिक्षण वर्गाची खाजगी संस्थेला फी ची प्रतिपुर्ती करणे या योजने अंतर्गत

चक-उएढ एपसळपशशीळपस, गएए आणि छएएढ प्रशिक्षण वर्गासाठी प्रति विद्यार्थी ₹७०,००० इतके आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते.

या योजनेअंतर्गत मंजूर अनुदानाचे वितरण दिनांक ५ डिसेंबर २०१६ च्या नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार करण्यात येते. पात्र लाभार्थ्यांना मंजूर झालेले अनुदान प्रथम जिल्हा परिषद स्तरावरून वित्तप्रेषणाद्वारे गटस्तरावर वितरित करण्यात येते. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये उइढ (उ्ळीशलीं इशपशषळीं ढीरपीषशी) प्रणालीद्वारे थेट अनुदान जमा केले जाते.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या या योजनेमुळे मागासवर्गीय समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळत असून त्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात आणि भविष्यात ते सक्षम, स्वावलंबी व सुशिक्षित नागरिक म्हणून घडावेत, हा या योजनेम ागील मूलभूत हेतू आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह या संकेतस्थळावर भेट देऊन https://www.zpthaneschemes.com/ विहित मुदतीत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा तसेच चक-उएढ इयत्ता ११ वी व १२ वी तील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चक-उएढ एपसळपशशीळपस, गएए आणि छएएढ प्रशिक्षण वर्गासाठी खाजगी प्रशिक्षण वर्गाची खाजगी संस्थेला फी ची प्रतिपुर्ती करणे. या योजनेचे अर्ज संकेतस्थळावर स्वतंत्र्य उपलब्ध करण्यात आले आहे, असे आवाहन समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**-रेश्मा सावित्री गंगाराम आरोटे**
**जनसंपर्क अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे**

# चैतन्य गोरक्षनाथ दिंडीचे गडावरून प्रस्थान आ.अक्षय कर्डीले सहभागी




**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाडी दिंडी सोहळाचे प्रस्थान उत्साहात झाले झाले. सकाळी गोरक्षनाथाची पूजा अभिषेक मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,नंतर रथाची पूजा भाविकांच्या हस्ते करून दिंडीचे प्रस्थान झाले,यावेळी आ.अक्षय कर्डीले दिंडीत सहभागी झाले होते.

यावेळी सरपंच सौ कदम,राम महाराज पोते,दिंडीचे अध्यक्ष भाऊसाहेब हरिश्चन्द्रे,सचिव राधाकिसन गांधले, सीमाजीतांबे ,गोरक्षनाथगड मा सरपंच जालिंदर कदम, देवस्थानचे विश्वस्त जयराम कदम,इंद्रभान कदम,मेगधे गुरु आदींसह वारकरी, नाथभक्त,ग्राम स्थ,भाविक मोठया संख्येनें उपस्थित होते.

दिंडीचे हे ४१ वे वर्ष आहे वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली आहे तर दिंडी सोहळा ट्रस्ट कै दादासाहेब जाधव यांनी स्थापन केला आह दिंडी सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ५ श्री पूजा व अभिषेक,पहाटे ५ते ६आरती व दर्शन दुपारी प्रवचन व रात्री कीर्तन नंतर दिंडी प्रवासात अखंड भजन होणार आहे. दिंडी गोरक्षनाथ गडावरून निघाल्यावर पहिला मुक्काम पिंपळगाव माळवी येथे राहणार असून दुसरा मुक्काम नगर मध्ये राहणार आहे दि. १६ जुलै ला दिंडी सोहळा समतानगर येथे डॉ प्रकाश जाधव यांचे येथे सकाळचा नाश्ता घेणार असून रात्रीचा मुक्काम नगर तालुक्यातील दहिगाव येथे राहणार आहे तर दिनांक १९ जुलै रोजी चापडगाव येथे घोड्याचे रिंगण होणार आहे.पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोचणार आहे.द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे.

# टोमॅटो उत्पादकांचे गणित कोलमडले

## अतिवृष्टीचा फटका; उत्पादनात मोठी घट, शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**पारनेर (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे टोमॅटो उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने टोमॅटो पिकावर विविध बुरशीजन्य, विषाणूजन्य व जीवाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी अनेक ठिकाणी टोमॅटोची झाडे पिवळी पडून फळांचे नुकसान होत असल्याने उत्पादनात मोठी घट झाली आहे.

तालुक्यात वासुंदे, शिक्रि, म्हसोबा झाप, पोखरी, देसवडे, खडकवाडी, पळशी, वनकुटे, ढवळपुरी, टाकळी ढोकेश्वर, निघोज, पिंपळनेर, लोणी मावळा, अळकुटी आदी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात टोमॅटो लागवड करण्यात आली आहे. सध्या तोडणीच्या हंगामातच पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अनेक शेतांमध्ये पाणी साचल्यामुळे मुळांना हवा मिळत नसून झाडे सुकू लागली आहेत. काही ठिकाणी फळांना तडे जाऊन ती काळी पडत असल्याने विक्रीयोग्य उत्पादन कमी झाले आहे.

बाजारात टोमॅटोची आवक कमी झाली असली तरी दरांमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. उत्पादन घटल्याने वाहतूक, मजुरी आणि औषध फवारणीचा खर्च वाढला असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

शेतकऱ्यांनी वेळोवेळी औषध फवारणी व पाण्याचा निचरा करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले असले तरी सततच्या पावसामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पारनेर तालुक्यातील टोमॅटो उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

> अतिवृष्टीमुळे टोमॅटो पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. पाऊस थांबला असला तरी शेतात अजूनही पाणी साचलेले आहे. त्यामुळे झाडे पिवळी पडत असून फळांची गुणवत्ता खालावली आहे. उत्पादनात मोठी घट झाल्याने यावर्षी लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. शासनाने नुकसानीचे पंचनामे करून मदत द्यावी.
>
> **- सुरेश सैद (वासुंदे, टोमॅटो उत्पादक)**

# अखेर... त्या स्कुटी शिकत आहेत!



स्कुटी चालवणं अनेकांसाठी रोजचं, साधं काम असेल... पण आमच्या साऊ एकल महिला समितीच्या ताईंसाठी हा फक्त स्कुटी शिकण्याचा प्रवास नाही, तर स्वाभिमान, आत्मविश्वास आणि नव्या आयुष्याकडे टाकलेलं धाडसी पाऊल आहे.

पतीच्या निधनानंतर आयुष्याची सगळी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडली. गायींसाठी चारा आणायचा, डेरीमध्ये दूध घालायचं, मुलांना शाळेत सोडायचं, शासकीय कामांसाठी तालुक्याला जायचं... प्रत्येक वेळी एकच अडचण-गाडी चालवता येत नाही.

मुलं अजून लहान... त्यांच्याकडून गाडी चालवून घेणं कायद्याने चुकीचं. दुसऱ्याच्या गाडीवर बसलं की समाजाच्या नजरा आणि टोमणे वेगळेच.

एक दिवस समितीच्या बैठकीत ठरलं...

आता रडायचं नाही... लढायचं!

पण लगेच प्रश्न उभा राहिला...

आपल्याला साधी सायकलही चालवता येत नाही, मग स्कुटी कशी शिकणार?

याच वेळी विरा स्कुटी क्लासच्या विजया कोल्हे ताई देवदूतासारख्या संगमनेरहून खास प्रशिक्षणासाठी स्कुटी घेऊन अकोल्यात आल्या.

या उपक्रमासाठी साऊ एकल महिला समितीने २४ एकल ताईंच्या प्रशिक्षण शुल्कासाठी सहकार्य केलं आणि अनेक महिलांच्या स्वावलंबनाच्या प्रवासाला बळ दिलं.

आज त्या स्कुटीवर फक्त रस्ता पार करत नाहीत...

त्या भीतीवर मात करत आहेत, आत्मविश्वास जिंकत आहेत आणि आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी नवी वाट तयार करत आहेत.

ही फक्त स्कुटी नाही...

ही त्यांच्या स्वाभिमानाची चावी आहे.

ही त्यांच्या स्वातंत्र्याची सुरुवात आहे.

आणि प्रत्येक वळणावर त्या जगाला सांगत आहेत-

आम्ही थांबणार नाही... आम्ही पुढे जाणार!

प्रतिमा हेरंब कुलकर्णी,८५५२८८५२१५

साऊ एकल महिला समिती,अकोले

# संत शेख महंमद महाराजांच्या पालखी सोहळ्याला भक्तिमय वातावरणात प्रारंभ

## संतांचे कार्य व मोठेपण घराघरात पोहोचविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा : आमदार विक्रम पाचपुते






**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

संत शेख महंमद महाराजांच्या पालखी सोहळ्याला आज श्रीगोंदा येथे अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. संत शेख महंमद महाराजांचे कार्य, विचार आणि मोठेपण घराघरात पोहोचले, तर समाजात समता, बंधुभाव आणि मानवतेचे मूल्य अधिक दृढ होईल, असे प्रतिपादन श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी यावेळी केले.

पालखी प्रस्थान सोहळ्यावेळी हजारो वारकरी, भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड जयघोषात आणि विठ्ठलनामाच्या भक्तिरसात पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली.

यावेळी आमदार पाचपुते यांनी संत शेख महंमद महाराजांनी दिलेला हिंदू-मुस्लिम ऐक्य, सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. संतांच्या विचारांचा प्रसार प्रत्येक घरापर्यंत झाला, तर समाज अधिक सुसंवादी आणि संस्कारित होईल, असेही त्यांनी नमूद केले.

पालखी सोहळ्यात विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी, वारकरी संप्रदायाचे पदाधिकारी तसेच भाविक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. भक्तिमय वातावरणात पालखीचे प्रस्थान होताच संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला.


**विशेष वसुली व विक्री अधिकारी मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने.**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे**
गाळा नं. १०२/१०३/११३, अशोक सर्व्हिस इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरीमंदिरा समोर, एल.बी.एस. मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना झेड)**

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१(१) प्रमाणे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था ठाणे, शाखा-माजिवाडा, गाळा नं. १०२/१०३/११३, अशोक इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस. मार्ग, नवनीत मोटार शेजारी, गोकुळनगर, ठाणे(प) ४००६०१ यांनी मा. उपनिबंधक/मा. सहायक निबंधक यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचेकडून त्यांचे असणारे कर्ज वसुलीकरिता लवादी दाखले प्राप्त केलेले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७(११) (ड-१) (पहिली सुधारणा नियम २०१४ दि. ३०/०८/२०१४ ची अधिसूचना) प्रमाणे सौ. सीमा मयुर कदम (विशेष वसुली व विक्री अधिकारी, ठाणे) यांचा आदेश जा.क्र. २०५७/दिनांक-०४/०३/२०२६ या दिवशी खालील थकबाकीदार यांच्या निम्नलिखित स्थावर मालमत्तेचा या नोटीशीन्वये ताबा घेतला आहे आणि या नोटीशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्तेचा तबदील केल्यास, कोणतेही खासगी हस्तांतरण, स्विकृत करण्यास किंवा बोजा निर्माण करण्यास अथवा तारण देण्यास या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव/वसुली दाखला क्र. व दि. | मिळकतीचे वर्णन, क्षेत्रफळ व मिळकतीचे चतु:सिमा |
|---|---|
| कर्जदार- श्री. भाऊ दशरथ नवले जामिनदार- १) श्री. निहाल बाळू भालेराव २) सौ. शारदा दिलीप वाघमारे वसुली दाखला / अर्ज क्र. १६८ उ.प.नि. (प.से.) /१०१/ ३६४/२०२१ दि. १३/१०/२०२१ | शेतजमीन १) शेत जमीन गट क्र. १०५१/३, खाते क्र. ५६९ क्षेत्र १.३४.०० आकार १.०९, पो.ख. ०.२४.०० तसेच फेरफार क्र. ७५२, मु.पो. नळावणे, ता. जुन्नर, जि. पुणे, वरील मिळकतीपैकी श्री. भाऊ दशरथ नवले (मूळ कर्जदार) यांची वडीलोपार्जित, स्वतः च्या मालकीची त्यांच्या हिस्स्यापुर्ती/वाटणीस आलेली शेतजमीन |

सदर मालमत्तेचा ताबा नोटीस दि. ०४/०३/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

**दि. १५/०७/२०२६**

**सौ. सीमा मयुर कदम**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ठाणे**



**विशेष वसुली व विक्री अधिकारी मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने.**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे**
गाळा नं. १०२/१०३/११३, अशोक सर्व्हिस इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरीमंदिरा समोर, एल.बी.एस. मार्ग, गोकुळनगर, नवनीत मोटार शेजारी, ठाणे(प.), पिन कोड-४००६०१

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना झेड)**

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१(१) प्रमाणे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था ठाणे, शाखा-माजिवाडा, गाळा नं. १०२/१०३/११३, अशोक इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी मंदिरासमोर, एल.बी.एस. मार्ग, नवनीत मोटार शेजारी, गोकुळनगर, ठाणे(प) ४००६०१ यांनी मा. उपनिबंधक/मा. सहायक निबंधक यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचेकडून त्यांचे असणारे कर्ज वसुलीकरिता लवादी दाखले प्राप्त केलेले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७(११) (ड-१) (पहिली सुधारणा नियम २०१४ दि. ३०/०८/२०१४ ची अधिसूचना) प्रमाणे सौ. सीमा मयुर कदम (विशेष वसुली व विक्री अधिकारी, ठाणे) यांचा आदेश जा.क्र. २१०५/दिनांक-२४/०२/२०२६ या दिवशी खालील थकबाकीदार यांच्या निम्नलिखित स्थावर मालमत्तेचा या नोटीशीन्वये ताबा घेतला आहे आणि या नोटीशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्तेचा तबदील केल्यास, कोणतेही खासगी हस्तांतरण, स्विकृत करण्यास किंवा बोजा निर्माण करण्यास अथवा तारण देण्यास या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव/वसुली दाखला क्र. व दि. | मिळकतीचे वर्णन, क्षेत्रफळ व मिळकतीचे चतु:सिमा |
|---|---|
| **कर्जदार-** श्री. किरण युवराज डामसे **जामिनदार-** १) श्री. सुरेश दत्तु लोहकरे २) श्री. तानाजी लक्ष्मण शेंगाळ वसुली दाखला १०१/ जा.क्र. ३४१/२०२१ दि. १३/१०/२०२१ | १) गट क्र. ७१ तसेच खाते क्र. ४३०, क्षेत्र ०.२३.०० आकार ०.३४ तसेच फेरफार क्र. ०१, गाव इंगळुन, ता.जुन्नर, जि.पुणे वरील मिळकतीपैकी श्री. किरण युवराज डामसे (मूळ कर्जदार) यांची वडीलोपार्जित, स्वतःच्या मालकीची त्यांच्या हिस्स्यापुर्ती/ वाटणीस आलेली शेतजमीन |

सदर मालमत्तेचा ताबा नोटीस दि. ०२/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

**दि. १५/०७/२०२६**

**सौ. सीमा मयुर कदम**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ठाणे**



**अगस्ति सहकारी साखर कारखाना लि, अगस्तिनगर**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**
दुरध्वनी: ०२४२४-२२२७७५, २९७१२६ email : agastisakhar@gmail.com

**- पाहिजेत -**

आमचे दैनंदिन ३५०० मे.टन गाळप क्षमतेच्या साखर कारखाना व अत्याधुनिक ३० के.एल.पी.डी. मल्टीप्रेशर डिस्टीलरी व इथेनॉल प्रकल्पासाठी खालील जागा त्वरीत भरावयाच्या आहेत. तरी पात्र व अनुभवी उमेदवारांनी आपले अर्ज संपुर्ण नांव, पत्ता, शैक्षणिक पात्रता, वय अपेक्षीत पगार, संपर्क क्रमांक व अनुभवाचे दाखले इ. तपशिलासह १० दिवसांचे आत कारखाना कार्यालयात पोहचतील अशा पध्दतीने किंवा ई-मेल द्वारे पाठवावेत. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती पाठवाव्यात.

| अ. | पदाचे नांव | जागा | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | चिफ केमिस्ट | १ | बी.एस्सी/ एम.एस्सी. ए.व्ही.एस.आय.कोर्स पुर्ण | सदर पदावर प्रत्यक्ष ५ ते ७ वर्षे काम केल्याचा अनुभव |
| २ | मॅन्यु केमिस्ट | १ | बी.एस्सी/ एम.एस्सी. ए.व्ही.एस.आय.कोर्स पुर्ण | सदर पदावर प्रत्यक्ष ५ ते ७ वर्षे काम केल्याचा अनुभव |
| ३ | डिस्टीलरी केमिस्ट | १ | बी.एस्सी/ एम.एस्सी. केमिस्ट्री, ए.एन. एस.आय./व्ही.एस.आय. (अल्कोहोल टेक कोर्स) | प्रत्यक्ष ५ ते ७ वर्षे काम केल्याचा अनुभव |
| ४ | वेअर हाऊस अटेंडंट | १ | बी.कॉम/ एम.कॉल. संगणक ज्ञान आवश्यक | सदर पदावर प्रत्यक्ष ५ ते ७ वर्षे काम केल्याचा अनुभव |

टिप - १) मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

**कार्यकारी संचालक** **व्हा. चेअरमन** **चेअरमन**



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### मंथन परीक्षेत आयुष कराळे जिल्ह्यात व्दितीय व राज्यात सातवा



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर मध्ये नुकताच मंथन सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ (चरपींहरप ऋध एरा) चा जिल्हास्तरीय पारितोषिक वितरण व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात पार पडला. मंथन वेल्फेअर फाऊंडेशनच्या (Manthan Welfare Foundation) माध्यमातून हा पुरस्कार सोहळा आयोजित केला जातो.

चिरंजीव आयुष रवींद्र कराळे याने इयत्ता पहिली गटात जिल्ह्यात व्दितीय व राज्यात सातवा क्रमांक प्राप्त करून शाळेचे,गावाचे व तालुक्याचे नाव उज्वल केले या उल्लेखनीय यशाबद्दल त्याला ट्रॉफी व प्रशस्ती पत्रक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार श्री राहुल शिर्के साहेब (सहाय्यक आयुक्त – आयुक्त कार्यालय ठाणे) व आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा क्षण म्हणजे आई–वडिलांसाठी अत्यंत अभिमानाचा ठरला.

आयुषच्या यशामागे त्याची मेहनत, नियमित अभ्यास व त्याला मार्गदर्शन करणारे आजी– आजोबा तांभोळ जि.प. शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री कचरू किसन कराळे ,आई–वडील व मार्गदर्शक करणाऱ्या शिक्षिका श्रीमती सरला चौधरी मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन पालकांचे प्रोत्साहन आणि सहकार्य महत्त्वाचे ठरले. चि.आयुषच्या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब दोरगे साहेब,देवठाण बीटाचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री अनिलजी गायकवाड साहेब, कुंभेफळ केंद्राचे केंद्रप्रमुख श्री बाळासाहेब आरोटे साहेब,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांभोळ शाळेचे मुख्याध्यापक श्री.बाळासाहेब बिन्नर व शिक्षक वृंद , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास माने, उपाध्यक्ष श्री नारायण चव्हाण व सन्मानीय सदस्य, मित्रपरिवार व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

### श्रीगोंदा–पंढरीच्या वाटेवर भक्तीचा जल्लोष; संत शेख महंमद महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

आषाढी वारीच्या पवित्र पर्वानिमित्त श्रीगोंदा येथून संत शेख महंमद महाराजांची पालखी भक्तिमय वातावरणात पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाली. ज्ञान, भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देणारी ही परंपरा यंदाही हजारो वारकरी, भाविक, महिला, युवक आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जल्लोषात पार पडली.

ज्ञानोबा–तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या अखंड नामघोषाने श्रीगोंदा नगरी दुमदुमून गेली. टाळ–मृदुंगाच्या गजरात, भगव्या पताका आणि दिंड्यांच्या शिस्तबद्ध संचलनाने संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले.

संत शेख महंमद महाराजांनी आपल्या विचारातून समाजात समता, बंधुता, सर्वधर्मसमभाव आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या पालखी सोहळ्याला हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून विशेष महत्त्व असून, विविध समाजघटक एकत्र येऊन या परंपरेत सहभागी होतात. ही वारी सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रेरणादायी संदेश देणारी ठरते.

पालखी मार्गावर विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांनी वारकऱ्यांसाठी पाणी, फळे, अल्पोपहार व वैद्यकीय सेवांची व्यवस्था करून सेवाभावाचे दर्शन घडविले. भक्ती, सेवा, समता आणि ऐक्याचा संदेश देत संत शेख महंमद महाराजांची पालखी आता विठुरायाच्या भेटीसाठी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली असून, भाविकांमध्ये मोठा उत्साह आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

### दूध भेसळ प्रकरणातील १३ आरोपी अद्याप फरार; तपासाच्या गतीवर प्रश्नचिन्ह

मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)

मंचर येथील गाजलेल्या दूध भेसळ प्रकरणात गुन्हा दाखल होऊन आठ दिवस उलटले तरी एकूण २६ आरोपींपैकी १३ आरोपी अद्यापही पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. सुरुवातीच्या कारवाईत मंचर पोलिसांनी १३ आरोपींना अटक केली होती. मात्र उर्वरित आरोपी फरार असल्याने तपासाच्या गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या प्रकरणाची चर्चा राज्यभर सुरू असून विधानसभेतही हा मुद्दा गाजला आहे. विविध समाजमाध्यमांवर फरार आरोपींना अद्याप अटक का झाली नाही, आरोपींना नेमके कोणाचे संरक्षण आहे का, तसेच तपासात विलंब का होत आहे, अशा प्रश्नांची चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे पोलिसांच्या तपास पद्धतीबाबत नागरिकांकडूनही शंका व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध सुरू असल्याचे सांगितले जात आहे. विविध ठिकाणी पथके रवाना करण्यात आल्याची माहिती समोर येत असली, तरी प्रत्यक्षात आरोपी अद्यापही पोलिसांच्या आवाक्याबाहेर असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. दूध भेसळसारख्या गंभीर प्रकरणात उर्वरित आरोपींना तातडीने अटक करून तपास पूर्ण करावा, अशी मागणी आता सर्वसामान्य नागरिकांसह विविध संघटनांकडून होत आहे. या प्रकरणातील पुढील कारवाईकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलची उल्लेखनीय कामगिरी; गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

## मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेबजी भोस यांच्याकडून शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला.

इयत्ता पाचवीतील ऋग्वेद साकेत कारंजकर (२२२ गुण), प्रणवी ज्ञानेश्वर कुमकर (२१८ गुण), अथर्व अंकुश शिंदे (२०६ गुण) आणि श्लोक मनोज चाकणे (२०२ गुण) यांनी उत्कृष्ट गुणांसह शिष्यवृत्ती प्राप्त केली. तसेच इयत्ता आठवीतील मयुरेश विकास क्षीरसागर (२२० गुण) यानेही शिष्यवृत्ती मिळवत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेबजी भोस आणि महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी बोलताना बाबासाहेबजी भोस यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि सांघिक प्रयत्न असल्याचे सांगत सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही सातत्याने गुणवत्तापूर्ण यश संपादन करून विद्यालयाचे नाव अधिक उंचावावे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका शेख एस. ए., शिष्यवृत्ती विभाग प्रमुख एस. बी. कोळपे, विषय शिक्षक आशा उंडे, पुनम जाधव, सारिका जमदाडे, काझी शब्बीर, स्वाती तरटे, चैताली शेंडगे, प्रतीक्षा डांगे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेतील पदक विजेत्यांचाही गौरव

नुकत्याच अहिल्यानगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत कांस्यपदक पटकावत विद्यालयाचा नावलौकिक उंचावणारे विद्यार्थी चैतन्य बोरुडे आणि यश बोरुडे यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या क्रीडा यशाबद्दल उपस्थितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





## महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलकडून दिंडीतील वारकऱ्यांना फळांचे वाटप

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

संत शेख मुहम्मद महाराज यांच्या पायी दिंडीचे आज सकाळी श्रीगोंदा येथून भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान झाले. या पवित्र सोहळ्याचे औचित्य साधत महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीगोंदा यांच्या वतीने दिंडीतील वारकरी, भाविक आणि सेवेकऱ्यांना फळांचे वाटप करून सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून हा उपक्रम पार पडला. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाच्या परंपरेचा सन्मान करत भाविकांना फळांचे वितरण करण्यात आले. या माध्यमातून विद्यालयाने सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि सेवाभावाचे मूल्य जपण्याचा संदेश दिला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख एस. ए., महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य श्री डी. डी. भुजबळ, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री बाबासाहेब भोस, ज्येष्ठ पत्रकार श्री पिटर रणसिंग, श्री रवीशेठ दंडनाईक तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विद्यालयाच्या या सेवाभावी उपक्रमाबद्दल वारकरी आणि भाविकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य, सामाजिक उत्तरदायित्व आणि संस्कारमूल्ये रुजविण्याचा विद्यालयाचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

## आई-वडिलांचा स्पर्शच सुरक्षित; अनोळखी व्यक्तींच्या आमिषाला बळी पडू नका : डॉ. स्नेहल गायकवाड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

आपले शरीर हे आपले असून त्यावर आपलाच हक्क असतो. आपल्या परवानगीशिवाय कोणालाही आपल्याला स्पर्श करण्याचा अधिकार नाही. आई–वडिलांचा प्रेमळ स्पर्श, मिठी किंवा मायेचा स्पर्श हा सुरक्षित असतो. मात्र अनोळखी व्यक्तींशी अनावश्यक ओळख वाढवू नका आणि त्यांच्या आमिषाला बळी पडू नका. अशा गोष्टींमुळे तुमच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो, असे प्रतिपादन लोणी व्यंकनाथ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल गायकवाड यांनी केले.



मढेवडगाव येथील जिल्हा परिषद उंडेमळा शाळेत किशोरवयीन मुली, विद्यार्थिनी तसेच माता–पालकांसाठी आयोजित बालप्रबोधन, समुपदेशन व निरोगी आरोग्य जनजागृती व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक रामदास ठाकर यांनी केले.

## निलेश खोडदे यांची युवासेनेच्या जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती

### शिवसेना नेते तथा खासदार संजय राऊत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र



पारनेर (समर्थ गांवकरी)

उबाठा शिवसेनेच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा युवासेनेच्या जिल्हाप्रमुखपदी पारनेर येथील युवा उद्योजक निलेश खोडदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली युवकांचे संघटन अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली असून, त्यामुळे जिल्ह्यातील शिवसैनिक आणि युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा खासदार संजय राऊत यांच्या हस्ते निलेश खोडदे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संपर्कप्रमुख सुनील शिंदे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, पारनेर तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, उद्योजक लहु मुळे, उपतालुकाप्रमुख संदीप मोढवे, सोशल मीडिया गटप्रमुख शुभम पाडळे, माधव मुडाळकर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिक उपस्थित होते.

निलेश खोडदे हे सामाजिक, व्यावसायिक आणि संघटनात्मक क्षेत्रात सक्रिय असून युवकांमध्ये त्यांचा व्यापक संपर्क आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने सहभाग घेतला असून, युवकांना संघटित करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर जिल्हाप्रमुखपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.

नियुक्तीनंतर बोलताना निलेश खोडदे यांनी पक्षाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांनुसार युवकांचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि जिल्ह्यात युवासेनेचा विस्तार करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या नियुक्तीमुळे पारनेर तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील युवा शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात संघटनात्मक बळकटीसाठी ही नियुक्ती महत्त्वाची ठरणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# वाघुंडे बुद्रुक येथे महिला बचत गटांना २५ लाखांचे कर्ज वाटप; महिला सक्षमीकरणाला नवी दिशा

## महिला सक्षमीकरणासाठी सोशल सेंटर,नाबार्ड संस्था व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या माध्यमातून कर्ज : राजेश्वरी कोठावळे-दिवटे

पारनेर/प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने वाघुंडे बुद्रुक येथे आयोजित कार्यक्रमात ९ महिला बचत गटांना एकूण २५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. हे कर्ज सोशल सेंटर व नाबार्ड यांच्या माध्यमातून मिळाले बँक ऑफ महाराष्ट्राने कर्ज दिले आहे या कर्जाला २५% टक्के सबसिडी मिळाली आहे. या उपक्रमामुळे गावातील महिलांना स्वावलंबी होण्यासाठी तसेच विविध लघुउद्योग व व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठे आर्थिक बळ मिळाले आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या राजेश्वरी कोठावळे–दिवटे यांनी या कर्जप्रकरणी विशेष पाठपुरावा केला. तब्बल दहा वर्षांपासून महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राजेश्वरी कोठावळे–दिवटे यांच्या प्रयत्नांमुळे विविध बचत गटांना बँकांकडून कर्ज मंजूर होऊन त्याचे वितरण शक्य झाले. त्यांच्या या कार्याबद्दल महिलांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमात अष्टविनायक, गणराज, समर्थ, सावता माळी, स्वामिनी, श्री स्वामी समर्थ, राधाराणी, शिव पार्वती आणि क्रांती ज्योती या महिला बचत गटांना कर्जाचे वाटप करण्यात आले. या कर्जाच्या माध्यमातून महिलांना किरकोळ व्यवसाय, दुग्धव्यवसाय, शेतीपूरक उद्योग, गृहउद्योग तसेच इतर उत्पन्नवाढीच्या उपक्रमांना चालना देण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाला सोशल सेंटरच्या नलिनी मॅडम, सोशल सेंटर व नाबार्ड संस्थेच्या सविता ढवळे, बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा व्यवस्थापक राकेश सर, अविनाश सर, पठण सर तसेच दौंड मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी महिला बचत गटांच्या कार्याचे कौतुक करताना बचत, शिस्त आणि सामूहिक प्रयत्नांच्या जोरावर महिलांनी आर्थिक प्रगती साधल्याचे सांगितले. तसेच अशा उपक्रमांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत असून महिलांचा समाजातील सहभाग अधिक प्रभावी होत असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी अनेक महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळाल्याचे तसेच व्यवसाय उभारणीसाठी आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले. कर्जामुळे रोजगारनिर्मितीबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय कुटुंब आणि गावाचा विकास होऊ शकत नाही. या कर्जाच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळेल. बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन व्यवसाय वाढवावा, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.

**–राजेश्वरी कोठावळे–दिवटे**

# समन्वयातून केंद्रपुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करा

**अहमदनगर/खा.भाऊसाहेब वाकचौरे (समर्थ गांवकरी)**

केंद्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी तत्काळ निदर्शनास आणून द्याव्यात.केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करून त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत व पारदर्शकपणे मिळावा,यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करत संवाद-समन्वयातून केंद्रपुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी,असे निर्देश खासदार तथा दिशा समितीचे अध्यक्ष खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी नुकतेच अहिल्या नगर येथील एका बैठकीत दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा विकास समन्वय व नियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत ते बोलत होते.या बैठकीस समितीचे सहअध्यक्ष तथा खासदार निलेश लंके,आ. विवेक कोल्हे,जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी,महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे,उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक,प्रकल्प संचालक मंजुषा ठवकर तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

खा.भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले की,योजनांच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचणी असल्यास त्या तत्काळ समितीच्या निदर्शनास आणून द्याव्यात.केंद्र शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून त्या दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. प्रधानमंत्री कुसुम (पीएम-कुसुम) योजनेतील प्रलंबित अर्जांचा जलदगतीने निपटारा करून पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळेल,याची दक्षता घ्यावी. नादुरुस्त रोहित्रांमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा होत नाही. अखंड वीजपुरवठ्यासाठी रोहित्रांची तातडीने दुरुस्ती करावी तसेच मागणीनुसार नवीन रोहित्रे उपलब्ध करून द्यावीत.भविष्यातील वाढती वीजगरज लक्षात घेऊन जिल्ह्यात सौरऊर्जा प्रकल्पांना प्राधान्य द्यावे.शासकीय कार्यालये,जिल्हा परिषद शाळा व ग्रामीण भागात सौरऊर्जा प्रणाली उभारण्यासाठी विशेष नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करावी.तसेच या कामांचा स्वतंत्र आढावा घेण्यासाठी विशेष बैठक आयोजित करावी. ग्रामीण भागातील नागरिकांच्या बँकिंग व्यवहारांबाबत संवेदनशीलता ठेवून बँकांनी कर्ज वितरणासह इतर सेवा सुलभ कराव्यात.नागरिकांना किरकोळ कामांसाठी बँकांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत,यासाठी प्रभावी कार्यपद्धती विकसित करावी.तसेच विविध योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात दर्जेदार,मजबूत रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करावा,असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रलंबित कामांना गती द्या

समितीचे सहअध्यक्ष तथा खासदार निलेश लंके म्हणाले की,जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामांना गती द्यावी तसेच मंजूर योजनांची वेगाने अंमलबजावणी करावी.महानगरपालिका क्षेत्रातील पाईपलाईनद्वारे गॅस जोडणीच्या कामांना चालना देण्यात यावी.जिल्ह्यात मंजूर झालेल्या विद्युत उपकेंद्रांची कामे निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी विशेष प्रयत्न करावेत.ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कामांचा वेग वाढवून नागरिकांना नियमित व शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे.लाभार्थी तसेच बेरोजगार युवकांना विविध योजनांसाठी कर्ज मिळण्यात अनेक अडचणी येत आहेत.बँकांनी सकारात्मक भूमिका घेत पात्र लाभार्थ्यांना सुलभपणे कर्ज उपलब्ध करून द्यावे.शासनाच्या विविध योजनांअंतर्गत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणाऱ्या अनुदान अथवा लाभाच्या रकमेतून कर्जाची रक्कम थेट कपात करू नये. शासनाचा निधी लाभार्थ्यांपर्यंत पूर्णपणे पोहोचेल,याची बँकांनी दक्षता घ्यावी,असे निर्देश त्यांनी दिले.बैठकीत विविध केंद्रपुरस्कृत योजनांच्या प्रगतीचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे,अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या दुचाकी चालविण्यावर कठोर कारवाईची मागणी; हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे तहसीलदारांना निवेदन

**मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यात अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून सर्रास दुचाकी वाहने चालविली जात असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असून अनेक विद्यार्थ्यांचा मृत्यू किंवा गंभीर दुखापतीच्या घटना घडत आहेत.या पार्श्वभूमीवर अल्पवयीन वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी महाळुंगे पडवळ ता.आंबेगाव येथील हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानने तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात विशेष वाहन तपासणी मोहीम राबविणे, वाहन चालविताना आढळणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्यांवर तसेच रोडरोमिओंवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करणे, संबंधित पालक व वाहनमालकांवर दंडात्मक कारवाई करणे, वाहतूक पोलिसांकडून नियमित तपासणी करणे आणि शाळा-महाविद्यालयांमार्फत विद्यार्थी व पालकांसाठी रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत जनजागृती अभियान राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांचे अमूल्य जीवन वाचविण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

### रामभाऊ गायकवाड यांचे निधन

**संवत्सर (समर्थ गांवकरी)**

नाशिक येथील प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी कार्यालयातील सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी गोपीनाथ रामभाऊ गायकवाड यांचे पिताश्री रामभाऊ वामनराव गायकवाड (वय-९६)यांचे सोमवार दि.१३ जुलै रोजी दुपारी २ वाजेच्या दरम्यान निधन झाले आहे.नाशिक येथील पंचवटी अमरधामध्ये गोदावरी काठावर त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.या प्रसंगी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कै.रामभाऊ हे अत्यंत मनमिळाऊ व धार्मिक स्वभावाचे म्हणून परिचित होते.स्व.रामभाऊ गायकवाड हे रामवाडी (संवत्सर) येथे अनेक वर्षे वास्तव्यास होते.कै.दशरथ आचारी यांच्याकडे शिवणकाम करीत होते.त्यावेळी नेहरु शर्ट शिवण्यात ते तरबेज मानले जात होते.अनेक पुढारी मंडळी त्यांच्याकडून नेहरु शर्ट शिवून घेत असत.त्यांचे चिरंजीव गोपीनाथ गायकवाड यांचे बालपण रामवाडी परिसरात गेले.शिक्षणही रामवाडी व जनता इंग्लिश स्कूल येथेच झाले होते.

### ३१ जुलैपर्यंत पीक विमा योजनेत सहभागी व्हा; शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

**मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)**

खरीप हंगाम २०२६ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत असून आंबेगाव तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन आंबेगाव तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे यांनी केले आहे.नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी) तसेच डिजिटल पीक सर्वेक्षणामध्ये पिकांची नोंद अनिवार्य करण्यात आली आहे.कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक आहे.भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार सादर करणे आवश्यक राहील.खरीप पिकांसाठी विमा हप्ता केवळ दोन टक्के ठेवण्यात आला आहे.आंबेगाव तालुक्यात

**नैसर्गिक आपत्ती,बदलते हवामान, कीड रोग यांसारख्या बाबींमुळे शेतपिकांचे नुकसान होऊन उत्पादनात घट आल्यास शेतकऱ्यांना पीक विम्याच्या माध्यमातून संरक्षण मिळते. त्यामुळे तालुक्यातील जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी योजनेत सहभागी व्हावे. सिद्धेश ढवळे,तालुका कृषी अधिकारी आंबेगाव.**

भात, बाजरी, नाचणी, भुईमूग आणि सोयाबीन ही पिके अधिसूचित करण्यात आली आहेत.विमा संरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी आधार संलग्न बँक खाते, सातबारा उतारा, पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील. शेतकरी स्वतः पीक विमा संकेतस्थळावर, ई-सेवा केंद्र, बँक किंवा वित्तीय संस्थेमार्फत अर्ज करू शकतात. कृषी विभागाने शेतकऱ्यांना मुदतीची वाट न पाहता तातडीने नोंदणी करून पीक विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## डिंभे धरणातील पाणीसाठा वाढीचा वेग मंदावला; पाऊस उघडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली



**डिंभे धरण क्षेत्रातील पावसाचा जोर कमी झाल्याने सध्या धरणातील पाण्याची आवक मंदावली आहे. पुढील काही दिवसांत समधानकारक पाऊस झाल्यास पाणीसाठ्यात पुन्हा वेगाने वाढ होण्याची अपेक्षा आहे, गणेश नान्नोर,कार्यकारी अभियंता कुकडी प्रकल्प.**

**मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव, जुन्नर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतीला जीवनदायी ठरणाऱ्या हुतात्मा बाबू गेनू सागर (डिंभे) धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होण्याचा वेग मंदावला आहे. धरण क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाल्याने धरणात होणारी आवक घटली असून पाणीसाठ्यात फारशी वाढ होत नसल्याचे चित्र आहे.बुधवार दि.१५ रोजी सकाळी आठ वाजेपर्यंत डिंभे धरणात ५०.२७ टक्के पाणीसाठा नोंदविण्यात आला. गतवर्षी याच दिवशी धरणात ७२.६२ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे यंदा अद्यापही धरण साठा मागे असल्याचे दिसून येत आहे.

आठवडाभरापूर्वी धरणात अवघा २५ टक्के पाणीसाठा होता. त्यानंतर धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे केवळ चार दिवसांत जवळपास २५ टक्क्यांनी साठ्यात वाढ झाली होती. त्यामुळे खरीप हंगामासाठी पाणी उपलब्ध होण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.मात्र, सध्या पाऊस उघडल्याने धरणातील आवक कमी झाली असून पुढील काळात पावसाचा जोर कायम राहणार की नाही, याबाबत शेतकरी चिंतेत आहेत. आता आगामी काही दिवसांत होणाऱ्या पावसावर धरणातील पाणीसाठ्याची स्थिती आणि खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.असा अंदाज जलसंपदा विभागाचे अधिकारी दत्ता कोकणे यांनी व्यक्त केला.

## उभ्या पिकात ट्रॅक्टर घातला,हाणामारी,अस्ट्रॉसिटीची धमकी !

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव तालुक्यातील हिंगणी ग्रामपंचायत हद्दीत आज सकाळी ११ बाजेच्या सुमारास आरोपींनी उभ्या पिकात ट्रॅक्टर घालून पिकांची नासाडी केल्या प्रकरणी दोन गटात हाणामारी झाली असून आरोपींनी अस्ट्रॉसिटीची धमकी दिली असल्याचे बाब उघड झाली आहे.या प्रकरणी मुक्ताबाई उत्तम गंगावणे (वय- ५५) यांनी कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात आरोपी दशरथ विश्वनाथ पवार,दगडी दशरथ पवार,रेणुका अशोक पवार,लहानबाई सूर्यभान माळी यांचेसह ११ ते १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.त्यामुळे हिंगणीसह कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की,वर्तमानात कोपरगाव तालुक्यात बऱ्यापैकी पर्जन्य झाला असून पेरण्या झाल्या असून काही सुरू आहे.त्यामुळे शेतात शेतकऱ्यांनी आपला राबता वाढवला आहे.या शिवाय शेतकऱ्यांनी आपल्या शेतीला जोडधंदा म्हणून दुधाळ जनावरे वाढवली असून त्यासाठी चारा पिके घेतली जात आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांना शेतात रोज चारा आणण्यासाठी जावे लागते आहे.परिणामी ग्रामीण भागात वादविवाद वाढत असताना दिसून येत आहे.अशीच घटना आज सकाळी ११ वाजता घडली आहे.यापूर्वी ११ जुलै रोजी किरकोळ वादविवाद झाला होता त्यातून त्याची पायाभरणी झाली होती.आज त्याचे थेट हाणामारीत रुपांतर झाले आहे.

यातील फिर्यादी महिला मुक्ताबाई गंगावणे या व त्यांचे पती उत्तम रंगनाथ गंगावणे मुलगी संपदा दीपक इंगळे आदी आपल्या हिंगणी ता कोपरगाव शिवारातील शेत गट नं.१/२ मध्ये गवत घेत असतांना आरोपी दशरथ विश्वनाथ पवार,दगडी दशरथ पवार,रेणुका अशोक पवार,रा. धानोरे तालुका येवला,लहानबाई सुर्यभान माळी,रावसाहेब सुर्यभान माळी,चिलाजी एकनाथ पवार,भाऊराव भोर (पुर्ण नाव माहित नाही),शुभम राजेंद्र चंदनशीव,मच्छींद्र लक्ष्मण चंदनशीव,सुनिल ऊर्फ अनिल मारुती गोधडे व इतर ११ ते १२ सर्व रा.हिंगणी आदींनी संगनमत गैरकायदयाची मंडळी जमवुन शेतातील पिकाची नुकसान करुन त्यावर फिर्यादी यांनी, आमचे शेत नांगरु नका,पिकाची नुकसान करु नका असे म्हणाले असता आरोपी दशरथ पवार आणि त्यांचे अन्य सहकारी आदीनी फिर्यादी तसेच फिर्यादीचे पती तसेच मुलगी यांना वाईट वाईट शिवीगाळ करुन,लाथाबुक्याने मारहाण केली तसेच, तुम्हा सर्वांना ट्रॅक्टरच्या खालीच मारुन टाकतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली तसेच तुमच्यावर सर्वांवर अॅट्रॉसीटीचा गुन्हा दाखल करतो असे म्हणुन दमदाटी केली असल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान याबाबत कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदणी क्रं.-१६५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८(१),११५(२),३५२(३)(५) अन्वये आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान पुढील तपास पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस हे.कॉन्स्टेबल हे करीत आहेत.

## एक तोळ्याचे मंगळसूत्र लांबवले,शहरात गुन्हा दाखल

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव शहरात आणि तालुका पोलिस ठाण्यात नवीन पोलिस अधिकारी आपल्या कर्तव्यावर रुजू झाले असताना दोन भुरट्या चोरट्यांनी दुचाकीवर येत काल रात्री एका महिलेच्या गळ्यातील ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने ओढुन घेऊन निवारा कोपरगाव रोडने भरधाव वेगात पोबारा करून पोलिसांना आव्हान दिले आहे.त्यामुळे मधील काळात बऱ्यापैकी बंद झालेल्या चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असल्याचे शहरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कोपरगाव शहरात गुन्हेगारी आणि तिचा वाढता आलेख हा कायम चिंतेचा विषय राहिला आहे.वाळूचोर,रेशन चोर,गावठी कट्टे विकणाऱ्या टोळ्या,भ्रष्टाचार आदी प्रश्नांनी जनतेची झोप उडवली आहे.त्यामुळे हा प्रश्न हाताबाहेर गेल्याने कोपरगावचे आ.आशुतोष काळे यांनी मागील उन्हाळी अधिवेशनात हा प्रश्न विधानसभेच्या पटलावर उपस्थित करून मुख्यमंत्री आणि राज्याचे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधून घेतले होते.त्यानंतर जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी शहर आणि तालुका पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत.मात्र यानंतर काही तरी बदल घडेल अशी आशा निर्माण झाली असताना काल रात्री पुन्हा भुरट्या चोरट्यांनी डोके वर काढले आहे.सायंकाळच्या सुमारास महिला आणि ज्येष्ठ नागरिक जेवणानंतर शत पावली करण्यात बाहेर पडतात याची नेमकी संधी साधत भुरटे चोरटे आपली हात सफाई दाखवून जेष्ठ नागरिक आणि महिलांना वेठीस धरतात.अशीच एक घटना काल रात्री ८.३० वाजता घडली आहे.यातील इंदिरापथ,कोपरगाव येथील रहिवासी फिर्यादी महिला जया दिलीप शर्मा (वय -५५) या गोकुळ नगरी येथील खंदक नाल्याजवळील महावितरणच्या विद्युत रोहित्रा समोरील रोडवर समता बाल उद्यान येथुन आपल्या नातवाला घेवुन घराकडे जात असताना समोरुन एका मोटारसायकल वरुन दोन अज्ञात चोरटे यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने ओढुन घेऊन निवारा कोपरगाव रोडने भरधाव वेगात निघुन पोबारा केला आहे.यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान त्यांनी याबाबत बराच आरडाओरडा केला असता त्याचा काहीही उपयोग झाला नाही.चोरट्यांनी बजाज पल्सर गाडीचा वेगावर स्वार होऊन पोबारा केला आहे.त्यामुळे त्यांचा शोध घेणे अवघड गेले आहे.दरम्यान याबाबतची माहिती पोलिसांना मिळाली असता शिर्डी उपविभागाचे पोलिस अधिकारी अमोल भारती,पोलिस निरीक्षक उध्दव डमाळे यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. दरम्यान याबाबत शहर पोलिस ठाण्यात फिर्यादी जया शर्मा यांनी गुन्हा नोंदणी क्रं.-३८३/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे दोन अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान पुढील तपास पोलिस निरीक्षक उध्दव डमाळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस हे.कॉन्स्टेबल पी.डी.सोनवणे हे करीत आहेत.

## भरधाव दुचाकी घसरून सहा वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू; एक जखमी

**मंचर/संतोष वळसे पाटील(समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील कळंब गावच्या हद्दीत पुणे-नाशिक महामार्गावर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात सहा वर्षीय इंद्रा काजल कर्माकर याचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर प्रभात कुमार सिंग (वय ३०) हे गंभीर जखमी झाले. या प्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात दुचाकी चालक काजल सुशांत कर्माकर (वय ३१, रा. भोलेश्वर मंदिर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे) याच्याविरुद्ध अपघातात त्यांच्या मुलाचा मृत्यू झाल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मंचर पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार दि. १४ रोजी दुपारी दोनच्या सुमारास कळंब गावाजवळील सृष्टी खानावळ समोरील पुणे-नाशिक महामार्गावर ही घटना घडली. काजल सुशांत कर्माकर हे हिरो ग्लॅमर (एमएच १४ एनसी ७३२८) या दुचाकीवर सहा वर्षीय मुलगा इंद्रा कर्माकर आणि त्यांचा मित्र प्रभात कुमार सिंग यांना घेऊन जात असताना दुचाकी घसरली. तिघेही रस्त्यावर पडल्याने गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान इंद्रा कर्माकर याचा मृत्यू झाला.या प्रकरणी दुचाकी चालक काजल कर्माकर यांचे सासरे नंदू नामदेव कदम (रा. पिंपरी लौकी अजमपूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चालक काजल कर्माकर भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानुसार मंचर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सुमित मोरे पुढील तपास करीत आहेत.

## सोन्याची पोत ओढून चोरट्यांचा पोबारा,गुन्हा दाखल !

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव शहरात आणि तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन भुरट्या चोरट्यांनी दुचाकीवर येत एका महिलेच्या गळ्यातील एक तोळ्याचे सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने ओढुन घेऊन निवारा कोपरगाव रोडने पोबारा केला असताना आज पुन्हा एक घटना उघडकीस आली असून यात फिर्यादी गृहिणी महिला साधणा प्रविण पापडीवाल (वय-६० ) रा.विवेकानंदनगर,कानडे बिल्डींग या सकाळी फिरत असताना महावितरण कंपनीच्या पॉवर हाऊस समोर दुचाकीवरून आलेल्या दोन भामट्यांनी त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची पोत ओढून पोबारा केला असल्याचा गुन्हा दाखल केला आहे.त्यामुळे पुन्हा एकदा महिलांची साडेसाती सुरू झाल्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

कोपरगाव शहरात पुन्हा एकदा गळ्यातील सोन्याची पोत (मंगळसूत्र अथवा चैन) हिसकावून पळून जाण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ चिंताजनक आहे.वर्दळीच्या ठिकाणी महिलांना टार्गेट करून गुन्हेगार पसार होत आहेत.या वाढत्या गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरले असून,सतर्कता बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.याबाबत कोपरगावचे आ.आशुतोष काळे सतर्क झाले असले तरी पोलिस अधिकारी सतर्क होणार का ? असा गंभीर सवाल निर्माण झाला आहे.यापूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या काळात शहर आणि तालुक्यात कमालीचे गुन्हे वाढले होते.त्या बाबत आ.काळे यांनी हा प्रश्न उन्हाळी अधिवेशनात मांडला होता व राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधून घेतले होते.परिणामी कोपरगाव शहर आणि तालुक्यातील पोलिस अधिकाऱ्यांना वरिष्ठांनी त्याचे फळ म्हणून त्यांच्या हाती निरोपाचा नारळ ठेवला होता.आता शहर आणि तालुका पोलिस ठाण्यात दोन्ही ठिकाणी पोलिस अधिकारी बदलले आहे.त्यामुळे परिणाम आवश्यक असताना त्यांना चोरट्यांनी पहिल्याच दमात वाकुल्या दाखविण्यास सुरुवात केली असल्याचे दिसून येत आहे.त्यात पहिल्या घटनेत चोरट्यांनी कोपरगाव येथील रहिवासी फिर्यादी महिला जया दिलीप शर्मा (वय -५५) या गोकुळनगरी येथील खंदक नाल्याजवळील महावितरणच्या विद्युत रोहित्रा समोरील रोडवर समता बाल उद्यान येथुन आपल्या नातवाला घेवुन घराकडे जात असताना समोरुन एका मोटारसायकल वरुन दोन अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने ओढुन घेऊन निवारा कोपरगाव रोडने भरधाव वेगात निघुन पोबारा केला होता.त्या बातम्यांची शाई वाळते न वाळते तोच दुसरी घटना नागरिकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना कळवली आहे.

त्यात फिर्यादी महिला साधना पापडीवाल या मॉर्निंग वाक् करून घरी परतत असताना ६.१५ वाजेचे सुमारास त्यांचे समोरुन एक मोटार सायकल आली त्यावर दोन इसम होते त्यापैकी मागे बसलेल्या एका इसमाने त्यांच्या गळ्यातील जुनी वापरती सुमारे ३० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन ओढुन घेतली त्यामुळे त्या खाली पडल्या होत्या.त्यानंतर त्या सुदेश टाकी कोपरगावच्या दिशेने भरधाव वेगाने निघुन गेले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.मोटार सायकवरील दोन इसमांनी डोक्यात कॅप घातलेली व अंगात काळ्या रंगाचे जॅकेट घातलेले होते व दोघांनीही तोंडाला रुमाल बांधलेला होता.मोटार सायकल वरील इसम हे भरधाव वेगात असल्याने त्यांना मोटार सायकलचे वर्णन सांगता आले नाही.त्यांनी या प्रकरणी कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान या घटनेचा पुढील तपास कोपरगाव शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक उध्दव डमाळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.या घटनेने महिला असुरक्षित वाटू लागले असून त्यांच्यात या चोरट्याबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पोलिसांनी या प्रकरणी चोरट्यांचा तातडीने शोध लावावा अशी मागणी महिलांनी आणि विविध संघटनांनी आमच्या प्रतिनिधीसोबत बोलताना केली आहे.